
उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक



टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी रवाना

# गांवकरी

ऑस्कर २०२५ मध्ये हृतिक रोशनचा जलवा



■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : १५३ ■ नाशिक, सोमवार, दि. १७ फेब्रुवारी २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

# लव्ह जिहाद विरोधात कडक कार्यवाही

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा इशारा

**नागपूर :**

लव्ह जिहाद विरोधात कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने शुक्रवारी (दि.१४) राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या नेतृत्वाखाली सात सदस्यांची समिती स्थापन केली. राज्य सरकारने काढलेल्या शासन निर्णयात ही घोषणा करण्यात आली असून, समितीचे सदस्य कोण असतील, त्याची कार्यपद्धती कशी असेल? याबाबतही सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानंतर रविवारी (दि.१६) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल समिती स्थापन करण्याचे कारण आणि या कायद्याची गरज का आहे? हे सांगितले. नागपूर येथे पत्रकारांशी बोलत असताना फडणवीस यांनी लव्ह जिहाद विरोधात महायुती सरकार कडक कार्यवाही करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, लव्ह जिहाद याची वास्तविकता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात आली आहे. केरळ उच्च न्यायालयानेही याचा उल्लेख केला आहे. एका धर्मातील व्यक्तीने दुसऱ्या धर्मातील व्यक्तीशी लग्न करण्यात गैर काही नाही. पण खोटे बोलून, खोटी ओळख तयार करून, फसवणूक करून लग्न करायचे आणि मुले जन्माला घालून सोडून द्यायचे, ही प्रवृत्ती समाजात पसरत आहे. जाणीवपूर्वक खोटारडेपणा करणे योग्य नाही. त्यामुळे यासंदर्भात जी काही कार्यवाही असेल ती राज्य सरकारकडून केली जाईल. बळजबरीने होणारे धर्मांतर, विशेष करून आंतरधर्मीय लग्नाच्या माध्यमातून होणारे धर्मांतर (लव्ह जिहाद) रोखण्यासाठी लवकरच कायदा करू, असे सूतोवाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागच्या काळात केले होते. अशाप्रकारचा कायदा याआधी उत्तर प्रदेश आणि इतर काही राज्यांत अस्तित्वात आलेला आहे.

### शासन निर्णयात काय म्हटले आहे?

राज्यातील विविध संघटना व काही नागरिकांनी लव्ह जिहाद व फसवणूक करून किंवा बळजबरीने केलेले धर्मांतरण रोखण्यासाठी कायदा करण्याबाबत निवेदने सादर केली होती. भारतातील काही राज्यांत लव्ह जिहाद विरोधात कायदा करण्यात आला आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्रातील विद्यमान परिस्थितीचा अभ्यास /-...४

### 'धस-मुंडे भेटीने फरक पडत नाही'

भाजपचे आमदार सुरेश धस यांनी राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतल्यानंतर एकच खळबळ उडाली. धस यांच्यावर ते मॅनेज झाले, ते फितूर झाले, अशी टीका होऊ लागली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या भेटीत गैर काय? एखाद्या आजारी व्यक्तीला भेटायला जाऊ नये का? असे म्हणत धस यांचा बचाव केला. त्यानंतर आता मुख्यमंत्री यांनीही धस यांनी घेतलेल्या भेटीने काही फरक पडत नसल्याचे सांगत ही विरोधकांची पोटदुखी असल्याचे म्हटले आहे. धनंजय मुंडे हे राज्याचे मंत्री आहेत. एखादा आमदार एखाद्या मंत्र्याला भेटल्याने कुठलाही फरक पडत नाही. सुरेश धस यांनीदेखील सांगितले आहे की, भेट घेतली तरी हेतू एकच आहे की सरपंच देशमुख यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे. तोच हेतू घेऊन सुरेश धस काम करत आहेत.

# राजीनामा द्यावा की नाही हे धनंजय मुंडे यांनीच ठरवावे

## उपमुख्यमंत्री अजित पवारांचे सूचक विधान

**नाशिक : प्रतिनिधी**

बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराडचे नाव आले असून, त्याला अटक करण्यात आली आहे. वाल्मीक कराडशी जवळचे संबंध असल्याने विरोधकांकडून मंत्री धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. अशातच आता मंत्री मुंडेंच्या राजीनाम्याबाबत पक्षाचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोठे विधान केले आहे. सिंचन घोटाळ्याच्या आरोपावेळी मी राजीनामा दिला होता. त्यामुळे राजीनामा द्यायचा की नाही हे धनंजय मुंडे यांनीच ठरवावे, असे म्हणत अजित पवारांनी राजीनाम्याचा विषय धनंजय मुंडेंच्या कोर्टात ढकलला आहे.

अजित पवार हे विविध विकासकामांच्या उद्घाटनासाठी नाशिक दौऱ्यावर आले असता



त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मी सांगितले आहे की, जी घटना बीडला घडली, ती अतिशय निंदनीय आहे. माणुसकीला काळिमा फासणारी आहे. त्यामुळे त्यात जे कोणी दोषी असतील त्यांना शिक्षा केली जाईल. कुणालाही सोडले जाणार नाही. मुख्यमंत्र्यांनी त्वरित एसआयटी, सीआयडी नेमली असून, न्यायालयीन चौकशी देखील सुरू आहे, असे अजित पवारांनी म्हटले.

तसेच धनंजय मुंडे राजीनामा देण्याची नैतिकता का दाखवत नाही? असा प्रश्न अजित पवारांना माध्यम प्रतिनिधींनी विचारला असता ते म्हणाले की, धनंजय मुंडे यांचे म्हणणे आहे की, माझा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही. त्यामुळे आता मंत्री धनंजय मुंडे खरंच मंत्रिपदाचा राजीनामा देणार का? असा सवाल उपस्थित होत आहे. पुढे ते म्हणाले की, २०१० च्या दरम्यान माझ्यावर सिंचनाच्या भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते, तेव्हा मी राजीनामा दिला होता. कारण माझ्या बुद्धीला ते पटले नाही. मी स्वच्छ पद्धतीने काम केले होते. मी गेल्या ३४ वर्षांपासून अनेक खाती सांभाळली आहेत. १९९२ सालापासून आजपर्यंत काम करताना मलादेखील बदनाम करण्यात आले. माझी जनमानसात प्रतिमा मलिन करण्यात आली. त्या बातम्या बघितल्यानंतर मला वाटले की, आपण इतक्या व्यवस्थितपणे काम करत असताना आरोप होत आहेत. त्यानंतर मी राजीनामा दिला होता, असे अजित पवारांनी म्हटले.

## महत्त्वाचे



### गडकरी यांनी कुटुंबासह महाकुंभात केले स्नान

**प्रयागराज :** केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी त्यांच्या पत्नी आणि कुटुंबासह महाकुंभात पोहोचले. त्यांनी संगमात स्नान केले आणि पूजा केली. प्रयागराज विमानतळावर मुख्यमंत्री योगी यांनी त्यांचे स्वागत केले. गडकरी म्हणाले, येथील प्रशासन, पोलिस आणि कर्मचाऱ्यांनी अभूतपूर्व व्यवस्था केली आहे. आपण सर्वांना गंगामातेचे आशीर्वाद मिळोत. नक्कीच, जगाचे कल्याण झाले पाहिजे, सर्वांचे कल्याण झाले पाहिजे, ही आपली भावना आहे. संगम स्नानाबद्दल आनंद व्यक्त करताना गडकरी म्हणाले, महाकुंभ महापर्व हा संपूर्ण देशाच्या श्रद्धेचे केंद्र आहे.

### नागपूरच्या कंपनीत स्फोट, दोघांचा मृत्यू

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्याच्या कोतवालबड्डी येथील एशियन फायर वर्क्स कंपनीत स्फोट झाला. यानंतर कंपनीत आग लागली. या दुर्घटनेत दोन कामगारांचा मृत्यू झाला. कंपनीचा काही भाग जळून खाक झाला. रविवारी १६ फेब्रुवारी रोजी दुपारी दोनच्या सुमारास ही घटना घडली. स्फोटाचे हादरे सुमारे २० किमी परिसरात जाणवले. कंपनीच्या एका भागातील छत कामगारांच्या अंगावर कोसळले. घटनेची माहिती मिळताच पोलीस, अग्निशमन दलाचे पथक, वैद्यकीय पथक घटनास्थळी पोहोचले. स्फोट प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे. स्फोटाचे नेमके कारण अद्याप समजलेले नाही.

### 'आप'च्या नेत्यावर दरोडेखोरांचा हल्ला

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाचे नेते अनोखे मित्तल आणि त्यांची पत्नी मानवी उर्फ लिप्सी मित्तल यांच्यावर काही दरोडेखोरांनी हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. धारदार शस्त्राने लुधियानाच्या डेहलोन भागात शनिवारी हा हल्ला करण्यात आला. दरम्यान, चेहऱ्यावर आणि मानेवर चाकूने वार केल्याने महिलेचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. लुटारू या जोडप्याची कार, तसेच महिलेने अंगावर घातलेले दागिने घेऊन पसार झाले. उद्योगपती असलेले अनोख मित्तल हे जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### संदीप क्षीरसागर, अजित पवार भेट?

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेत गुप्त चर्चा केली. ही भेट पुण्यातील जुन्नरमध्ये झाली. त्यानंतर राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले. संदीप क्षीरसागर हे जुन्नरमध्ये येऊन संदीप क्षीरसागर यांना का भेटले असावेत? असा सवाल देखील उपस्थित केला जात आहे. मात्र, या सर्व चर्चांवर खुद्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतित्युत्तर दिलं आहे.

### राज्यात यंदा फेब्रुवारीत उष्णतेचा तडाखा

**मुंबई :** यंदा जानेवारीपासूनच हवामानात मोठे बदल दिसून येत आहेत. फेब्रुवारी महिन्यात उत्तर भारतात तापमान चढू लागले असून, दिवसा तीव्र उष्णता आणि रात्री गारवा जाणवत आहे. नेहमी एप्रिल-मे महिन्यात जाणवणाऱ्या उष्णतेचा अनुभव यंदा फेब्रुवारीतच येत आहे. मध्य महाराष्ट्रातही तापमानाचा मोठा चढ-उतार सुरू आहे. सकाळी गारवा आणि दुपारी कडक ऊन असे विचित्र हवामान पाहायला मिळत आहे.

# हिंदू समाजाला एकत्र करणे हेच संघाचे उद्दिष्ट : भागवत



**कोलकाता : देशासाठी जबाबदार असलेला समाज हा हिंदू आहे. त्यामुळेच संघाचे उद्दिष्ट फक्त हिंदू समाजाला एकत्र करणे आहे, असे ठाम मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी मांडले.**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी पश्चिम बंगालमध्ये १० दिवसांचा दौरा केला. त्याच दौऱ्याची रविवारी जाहीर सभेने सांगता झाली आहे. या सभेला संबोधित करताना भागवत पुढे म्हणाले की, देशभरात १ लाख ३० हजारांहून अधिक स्वयंसेवक आहेत. तो कोणाकडूनही पैसे घेत नाही, तो स्वतः काम करतो. म्हणूनच आम्ही म्हणतोय की, आम्ही हे प्रसिद्ध होण्यासाठी करत नाही आहोत, तर भारताच्या प्रगतीत अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी आम्ही हे करत आहोत.

पुढे ते म्हणाले, भारताला एक निसर्ग आहे आणि ज्यांना वाटले की, ते त्या निसर्गासोबत राहू शकत नाहीत. त्यांनी स्वतः चा वेगळा देश निर्माण केला. हिंदू जगाच्या विविधतेचा स्वीकार करून पुढे जातात. आजकाल आपण विविधतेत एकता म्हणतो, हिंदूंचा असा विश्वास आहे की, एकतेत विविधता आहे.

रामायणातील दाखले देत संघप्रमुख म्हणाले की, इथे राजे आणि सम्राटांची आठवण कोणालाच नाही, पण तो राजा आठवतो ज्याने आपल्या वडिलांसाठी १४ वर्षे वनवासात घालवला आणि ज्याने आपल्या भावाची चप्पल ठेवली आणि परतल्यावर आपल्या भावाला राज्य दिले.

### संघटन बळकट करण्याच्या सूचना

मोहन भागवत यांनी पश्चिम बंगालच्या दहा दिवसांच्या दौऱ्यात त्यांनी संघाच्या अनेक नेत्यांसोबत अनेक बैठका घेतल्या. यामध्ये त्यांनी संघाचे संघटन बळकट करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याशिवाय, मोहन भागवत यांनी आरजी कार मेडिकल कॉलेज बलात्कार प्रकरणातील पीडितेच्या पालकांचीही भेट घेतली. दरम्यान, भागवत यांचा हा पश्चिम बंगाल दौरा महत्त्वाचा मानला जात आहे. कारण येत्या काळात पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्याचबरोबर शेजारील देश बांगलादेशशी संबंध बिघडलेले आहेत. त्यामुळे बंगालच्या सीमावर्ती भागात तणाव आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पुढील वर्षी राज्यात विधानसभा निवडणुका होणार आहेत.



# दिल्लीतील चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेतील मृतांचा आकडा लपविण्याचा प्रयत्न

**नवी दिल्ली :**

**राजधानीत रेल्वेस्थानकावर शनिवारी झालेल्या चेंगराचेंगरीवरून काँग्रेसनं केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. सरकारनं पारदर्शकता दाखवून आणि जबाबदारी निश्चित करावी, अशी काँग्रेसनं मागणी केली.**

नवी दिल्लीतील रेल्वे स्थानकावर शनिवारी रात्री झालेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेत १८ जणांचा मृत्यू झाला. सुमारे १,५०० जनरल डब्याची तिकिटे विकली होती. अचानक गर्दी उसळल्यानं रेल्वे स्टेशनवर चेंगराचेंगरीची दुर्घटना घडल्याचा दावा करण्यात येत आहे. या दुर्घटनेचे संपूर्ण देशात राजकीय पडसाद उमटले आहेत.

काँग्रेसची सरकारवर टीका- दिल्लीत रेल्वे स्थानकावरील मृत आणि जखमींची संख्या लवकरात लवकर जाहीर करावी. बेपत्ता लोकांची ओळखदेखील जाहीर करावी, अशी मागणी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी एक्स या सोशल मीडियावर पोस्ट करून

### विरोधकांचा केंद्र सरकारवर आरोप

केली. जखमींना त्वरित वैद्यकीय मदत द्यावी. तसेच पीडिताच्या कुटुंबीयांना आधार देण्याला प्राधान्य दिलं पाहिजे. पीडितांच्या कुटुंबीयांबद्दल आम्ही दुःख व्यक्त करत आहोत. जखमींना त्वरित वैद्यकीय उपचार देण्यात यावेत, अशी काँग्रेसचे प्रमुख मल्लिकार्जुन खर्गे यांनी अपेक्षा व्यक्त केली.

भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशीही त्यांनी मागणी केली. स्टेशनवरून दुर्घटनेचे येणारे व्हिडिओ अत्यंत हृदयद्रावक आहेत. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरील मृत्यूंच्या बाबतीत सत्य लपवण्याचा नरेंद्र मोदी सरकारनं केलेला प्रयत्न अत्यंत लज्जास्पद आणि निषेधार्ह आहे, अशी टीका काँग्रेस अध्यक्षांनी केली.

प्रचंड गर्दी हाताळण्यासाठी चांगल्या व्यवस्था करण्याची गरज आहे. ही दुर्दैवी घटना रोखता आली असती, असे मत काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेरा यांनी व्यक्त केलं.

### राहुल गांधींची सरकारवर टीका

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दिल्लीतील चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेवरून केंद्र सरकारवर निशाणा साधला. या दुर्घटनेमुळे पुन्हा एकदा रेल्वेचे अपयश आणि सरकारची असंवेदनशीलता समोर आल्याचं राहुल गांधींनी म्हटलं. प्रयागराजला जाणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेऊन रेल्वे स्थानकावर चांगली व्यवस्था करायला हवी होती. गैरव्यवस्थापन आणि निष्काळजीपणामुळे कोणालाही आपला जीव गमवावा लागू नये, याची सरकार आणि प्रशासनानं काळजी घ्यावी, अशी अपेक्षा लोकसभेच्या विरोधी पक्षनेत्यांनी केली.

# दिल्लीचा मुख्यमंत्री आज ठरणार

## शपथविधीचा मुहूर्तही लागणार

**नवी दिल्ली :**

दिल्लीतील मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीची तारीख जवळ येऊन ठेपली आहे. राजधानीतील रामलीला मैदानावर मुख्यमंत्र्यांचा शपथविधी होईल. त्याआधी, सोमवारी (१७ फेब्रुवारी) भाजप विधिमंडळ पक्षाची बैठक होईल, ज्यामध्ये मुख्यमंत्र्यांची निवड केली जाईल. केशव कुंज येथील नवीन कार्यालयाचे उद्घाटन १९ तारखेला होईल. संघ कार्यालयाच्या उद्घाटनाला भाजपचे मुख्यमंत्री सहभागी होतील.

खरं तर, भाजपने सोमवारी (१७ फेब्रुवारी) विधिमंडळ पक्षाची बैठक बोलावली आहे, ज्यामध्ये मुख्यमंत्र्यांचे नाव निश्चित केले जाईल. सर्व आमदारांना कळविण्यात आले आहे. ही बैठक दिल्ली राज्य कार्यालयात होईल. केशव कुंज येथील नवीन कार्यालयाचे उद्घाटन १९ तारखेला होईल. संघ कार्यालयाच्या उद्घाटनाला भाजपचे मुख्यमंत्री सहभागी होतील. दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी समारंभ निवडणूक निकालानंतर दहा दिवसांनी होईल. दिल्लीत ५ फेब्रुवारी रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान झाले, ज्याचे निकाल ८ फेब्रुवारी रोजी जाहीर झाले. मात्र, निवडणूक निकालानंतर आठवडा उलटूनही भाजपकडून मुख्यमंत्र्यांचे नाव जाहीर झालेले नाही. मात्र, सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सोमवारी हे नाव हमखास जाहीर होणार आहे. सोमवारी (१७ फेब्रुवारी) दिल्लीच्या मुख्यमंत्री पदावरील सस्पेन्स संपेल. सोमवारी विधिमंडळ पक्षाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांचे नाव जाहीर केले जाईल आणि पुढील पाच वर्षांसाठी दिल्लीची कमान कोणाकडे सोपवली जाईल हे स्पष्ट होईल.

### मुख्यमंत्रिपदाचे प्रमुख दावेदार कोण आहेत?

वाढत्या अटकळांमध्ये दिल्लीत मुख्यमंत्रिपदासाठी पाच प्रमुख नावे समोर आली आहेत. यामध्ये नवी दिल्लीत 'आप'चे प्रमुख अरविंद केजरीवाल यांचा पराभव करणारे परवेश वर्मा आणि कालकाजीमधून माजी मुख्यमंत्री आतिशी यांच्याकडून पराभूत झालेले रमेश बिधुरी यांचा समावेश आहे. भाजप खासदार मनोज तिवारी, कपिल मिश्रा, आशिष सूद, रेखा गुप्ता, विजेंदर गुप्ता यांच्या नावांची चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.

# राहुल गांधी, प्रियांका गांधी बुधवारी कुंभमेळ्यात जाणार

**नवी दिल्ली :**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि प्रियांका गांधी बुधवारी दि. १९ फेब्रुवारीला महाकुंभाला जाणार असल्याचा दावा काँग्रेस नेते अजय राय यांनी केला आहे. यावेळी अजय राय यांनी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीवरून केंद्र सरकारवरही हल्लाबोल केला. ते म्हणाले, ही दुःखद घटना आहे. ही सरकारची जबाबदारी आहे. तुम्ही सर्वांना बोलावले, पण व्यवस्था नाही. अजय राय म्हणाले की, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी तत्काळ राजीनामा द्यावा.

इटावामध्ये अजय राय म्हणाले की, राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्यासोबत आम्ही सर्वजण १९ फेब्रुवारीला महाकुंभला जाणार आहोत. तिथे हर हर महादेव असेल. महाकुंभात स्नान करण्यासाठी जगभरातून भाविक प्रयागराजला पोहोचत आहेत. महाकुंभाच्या समारोपाला



फार दिवस उरलेले नाहीत. त्याची मुदत २६ मार्च रोजी संपत आहे. महाकुंभमेळा प्रशासनाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, शनिवारी (१५ फेब्रुवारी २०२५) रात्री ८ वाजेपर्यंत एकूण १.३६ कोटी भाविकांनी गंगा आणि संगमात स्नान केले आणि १३ जानेवारीपासून आतापर्यंत एकूण ५२.८३ कोटी भाविकांनी संगमात स्नान केले आहे. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर शनिवारी रात्री झालेल्या चेंगराचेंगरीत १८ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले. फूटओव्हर ब्रिजवरून उतरताना काही प्रवासी घसरून इतरांवर पडल्याची घटना घडली.

# आयपीएल २०२५ चे वेळापत्रक जाहीर!

## २२ मार्चपासून रंगणार थरार; पहिला सामना केकेआर आणि आरसीबी यांच्यात होणार

**नवी दिल्ली :**

आयपीएल २०२५ चे वेळापत्रक १६ फेब्रुवारी रोजी जाहीर करण्यात आले आहे. चाहत्यांची प्रतीक्षा संपली आहे. ही स्पर्धा २२ मार्चपासून सुरू होत आहे. ही स्पर्धा १३ ठिकाणी खेळवली जाईल. पहिला सामना केकेआर आणि आरसीबी यांच्यात खेळला जाईल. हा सामना कोलकाता येथे खेळला जाईल. याशिवाय, दुसरा सामना राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळला जाणार आहे. त्याचबरोबर ५ वेळचे विजेते चेन्नई सुपर आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील सामना २३ मार्च रोजी खेळला जाईल. दोन्ही संघांचे चाहते प्रचंड आहेत. स्पर्धेचा अंतिम सामना २५ मे रोजी कोलकाता येथे खेळला जाईल. या स्पर्धेत एकूण ७४ सामने खेळवले जातील.

२३ मार्च रोजी पहिला सामना एसआरएच आणि आरआर यांच्यात खेळला जाईल. यानंतर, दुसरा सामना चेन्नई आणि मुंबई यांच्यात संध्याकाळी ७.३० वाजता खेळला जाईल. या हंगामात लीग टप्प्यात सीएसके आणि चेन्नई दोनदा आमनेसामने येतील. त्याच वेळी, ७ एप्रिल रोजी आरसीबी आणि मुंबई यांच्यात फक्त एकच लीग सामना खेळला जाईल. हा सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. आयपीएल २०२५ चा अंतिम सामना २५ मे रोजी खेळला जाईल. सुरुवातीचे आणि अंतिम सामने दोन्ही कोलकात्यातील ईडन गार्डन्स येथे होतील.

### आयपीएल २०२५ स्पर्धेचे स्वरूप

आयपीएल २०२४ प्रमाणेच फॉरमॅट आहे. त्यानुसार १० संघांची दोन गटांत विभागणी केली आहे. प्रत्येक संघ लीग टप्प्यात १४ सामने खेळेल. पॉइंट टेबलमधील अव्वल दोन संघ पहिल्या /-...४

### स्पर्धेत एकूण ७४ सामने खेळवले जाणार

ही जगप्रसिद्ध लीग १३ शहरांत आयोजित केली जाईल. आयपीएल २०२५ मध्ये ६५ दिवसांत एकूण ७४ सामने खेळवले जातील. आयपीएल २०२५ मध्ये लीग सामने २२ मार्च ते १८ मेदरम्यान खेळवले जातील. यानंतर २०, २१, २३ आणि २५ मे रोजी प्लेऑफ सामने आयोजित केले जातील. आयपीएल २०२५ मध्येही गेल्या वर्षीप्रमाणेच फॉरमॅट आहे. या दोन महिन्यांच्या स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्ज, मुंबई इंडियन्स, कोलकाता नाईट रायडर्स, राजस्थान रॉयल्स, सनरायझर्स हैदराबाद, गुजरात टायटन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, दिल्ली कॅपिटल्स, पंजाब किंग्ज आणि लखनऊ सुपर जायंट्स हे १० आयपीएल संघ विजेतेपद जिंकण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील.

महत्त्वाचे

## 'एचएएल' १० वीच्या विद्यार्थ्यांना आशीर्वाद प्रदान



**ओझर : वार्ताहर**
येथील एच.ए.एल. हायस्कूल मराठी माध्यम मध्ये इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी आशीर्वाद प्रदान कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक एस. पी. मैन, माजी मुख्याध्यापक एन. एम. जाधव, ज्येष्ठ शिक्षक अनाप यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. त्यानंतर दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शिक्षक डुंबरे व शिक्षिका श्रीमती शेजवळ यांनी आपल्या मनोगतात इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मैन यांनी विद्यार्थ्यांना पेपर कसा लिहावा, कसे नियोजन करावे तसेच शाळेचा निकाल १०० टक्के लागेल, अशी खात्री असल्याचे सांगितले. माजी मुख्याध्यापक जाध यांनी परीक्षेला सामोरे जाताना काय काळजी घ्यावी तसेच परीक्षेचा निकाल १०० टक्के लागेल यासाठी प्रयत्न करावे तसेच भरपूर अभ्यास करून शाळेचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन.व्ही. मोंढे यांनी केले. तर शिक्षिका सरोद यांनी आभार मानले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पोद्दार इंटरनॅशनल शाळेत कृतज्ञता दिवस साजरा



**ओझर : वार्ताहर**
येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलमध्ये कृतज्ञता दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष दिनानिमित्त शाळेच्या स्वच्छता, वाहतूक विभाग आणि सुरक्षा विभागातील कर्मचाऱ्यांचा ते करत असलेल्या अथक सेवेसाठी त्यांचा शाळेतर्फे सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या निःस्वार्थ समर्पणाबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी सहाय्यक कर्मचाऱ्यांचे आत्मीय स्वागत करण्यात आले. त्यानंतर त्यांना स्मृतिचिन्हे आणि फुले देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य, टाळ्यांचा कडकडाट आणि स्नेहपूर्ण शब्दांनी सहाय्यक कर्मचाऱ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. दरम्यान हा कृतज्ञता दिवस प्रत्येकासाठी एक हृदयस्पर्शी आणि अर्थपूर्ण अनुभव ठरला. यामुळे शालेय परिवारातील प्रत्येक सदस्य शाळेच्या सुरक्षित आणि पोषक वातावरणाच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावतो, याची जाणीव सर्वांना झाली. शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. जसिंथा पारके यांनी आपल्या भाषणात कृतज्ञतेचे महत्त्व आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या योगदानाचा सन्मान करण्याची गरज अधोरेखित केली. तसेच, विद्यार्थ्यांना दररोज कृतज्ञता व्यक्त करण्याचे आणि दयाळूपणा व आदराच्या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राकेश शर्मा यांनी केले.

## जनता विद्यालय नांदुर्डी विद्यार्थी गुणगौरव सोहळा



**निफाड : शहर प्रतिनिधी**
जनता विद्यालय नांदुर्डी या विद्यालयात दरवर्षीप्रमाणे वार्षिक गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कृषी उत्पन्न बाजार समिती लासलगाव संचालक भीमराज काळे, माध्यमिक स्कूल कमिटी अध्यक्ष बोराडे तात्या, उच्च माध्यमिक स्कूल कमिटी अध्यक्ष एकनाथ पा. निकम, अभिनव बालविकास मंदिर स्कूल कमिटी अध्यक्ष सीताराम तात्या ढोमसे व सर्व सदस्य व पालक यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य म्हसकर बी. डी. यांनी केले तर शिंदे टी. जी. यांनी विद्यालयात वर्षभर झालेल्या स्पर्धा व त्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी केलेले यश याबद्दल सविस्तर माहिती दिली. वर्षभरात झालेल्या सर्व स्पर्धा, वक्तृत्व, क्रीडा, विज्ञान प्रदर्शन, शिष्यवृत्ती, स्कॉलरशिप परीक्षा या स्पर्धांमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयातील पर्यवेक्षक दाते आर. पी., पगारे आर. व्ही., आहेर एस. आर., मविप्र सोसायटी संचालक जाधव डी. जी., पवार व्ही. के., निकम एस. डी., बर्वे व्ही. आर., डुकरे एन. जी., शेंडे यू. बी. श्रीमती गोतरणे एन. जी. यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# दीड कोटीची कस्टम ड्युटी चुकविणारी टोळी जेरबंद

**इगतपुरी : प्रतिनिधी**
**दुबईवरून न्हावाशेवामार्गे नाशिकच्या ओझर विमान तळाजवळील जानोरी कस्टम डेपोमध्ये जमा करण्यासाठी आलेल्या एक कोटी ४७ लाख रुपये किमतीच्या आयात मालावर कस्टम ड्युटी चुकवण्याच्या इराद्याने विल्हेवाट लावण्याच्या तयारीत असलेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक गुन्हेगार टोळीतील आरोपींना नाशिकच्या मुख्य न्यायदंडाधिकारी एस. जी. बावकर यांनी दोन्ही बाजू ऐकून, आरोपींचे जामीन नाकारून न्यायालयीन कोठडीत घेऊन नाशिकच्या तुरुंगात रवानगी केली आहे.**

कस्टम विभागाच्या वतीने नगर आणि नाशिक जिल्ह्यासाठीचे नवनियुक्त स्पेशल पब्लिक प्रॉसिक्युटर ॲड. सुभाष विठ्ठल भोर व नाशिक जिल्हा न्यायालयातील ॲड. कोमल सूरज गुप्ता यांनी काम पाहिले. भारत सरकारच्या कस्टम विभागाच्या रेवेन्यू इंटेलिजन्सला मिळालेल्या गुप्त बातमीनुसार न्हावाशेवाच्या जेएनपीटीमधून नाशिकच्या ओझर विमानतळाशेजारील अधिकृत कस्टम डेपोमध्ये जाणाऱ्या कंटेनरमधून एक कोटी ४७ लाख रुपयांच्या आयात मालाची तस्करी करताना १) अंकुश कोंडीभाऊ बांगर, रा. कळंबोली, पनवेल, २) करण कुमार चारी, ठाणे पश्चिम, ३) विजय बाबूराव शिरोळे, आळकुटी, पारनेर, ४) विजयकुमार पाल, प्रयागराज उ. प्र., ५) योगेश पोपट शिंदे, कळंबोली, ६) तुषार रघुनाथ गलांडे, रा. कळस, ता. पारनेर आणि या गुन्ह्यामध्ये सामील ७) दिनेश रमाकांत हिरे, देवळाली रोड या आरोपींना नाशिकच्या मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टासमोर अटक करून आणले असता मुख्य न्यायदंडाधिकारी एस. जी. बावकर यांनी त्यांचा जामीन अर्ज फेटाळून त्यांची तुरुंगात रवानगी केली आहे.

सदरच्या तक्रारीनुसार दि. ५/२/२०२५ रोजी सदर टोळीने जेएनपीटीमधून दुबईवरून आयात माल कंटेनर ( नंबर एम.एच.४६ बी एम.५३७७ ) या वाहनात लाकूड लोड करून ओझर जवळच्या जानोरी येथील कस्टम डेपोमध्ये घेऊन जाण्याऐवजी जवळच्याच मे. आर्या कोल्ड स्टोअरेज ॲंड एक्स्पोर्ट या कस्टम नोटिफाइड एरियाच्या बाहेर घेऊन गेले. कस्टम अधिकाऱ्यांनी हा एक कोटी ४७ लाख या आंतरराष्ट्रीय बाजारभावानुसार असलेल्या किमतीचा माल या आरोपींनी न्हावाशेवा बंदरात कस्टम अधिकाऱ्यांनी लावलेले सील तोडून दुसऱ्या वाहनात वाहन ( क्रमांक यु.पी.७२ ए.टी. ४२२१ ) या उत्तर प्रदेशातील ट्रकमध्ये मजुरांमार्फत भरत असताना कस्टम अधिकाऱ्यांनी पंचांसमवेत जप्त करून ताब्यात घेतला. त्यावेळी हजर असलेल्या सर्व आरोपींच्या समवेत असलेल्या दोन कार, एक निळ्या रंगाची मारुती सुझुकी बलेनो आणि मारुती इर्टिगा रक्कम रुपये १३ लाख ६८ हजार ५०० रु. रोख रकमेसह आढळून आली. घटनेच्या दिवशी जागतिक विनिमय दर पाहता डॉलरचा दर प्रति डॉलर ८७.१० रुपये असल्याचे पाहता सदर आयात माल सुपारीची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत किंमत ६४४८ डॉलर प्रति मेट्रिक टन गृहीत धरता सदर तस्करी केलेल्या मालाची किंमत १,४७,८४,६६ ७/-रुपये एवढी होऊन त्यावर १०० टक्के म्हणजे तेवढाच रु. १,४७,८४, ६६७/- रु. कस्टम ड्युटी चुकवून गुन्हा केला आहे.

यापैकी आरोपी नं. ते ६ यांना या गुन्ह्याकामी मदत करत असलेल्या आरोपी दिनेश रमाकांत हिरे हा सुद्धा निष्पन्न झाल्यामुळे त्यालाही रीतसर अटक करून न्यायालयासमोर आणले असता कोर्टाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कस्टडी देत तुरुंगात रवानगी केली आहे.

# धुमाकूळ घालणारा बिबट्या जेरबंद



**निफाड : विशेष प्रतिनिधी**
**निफाड तालुक्याच्या गोदाकाठ भागातील करंजी खुर्द व परिसरात दहशत निर्माण करणारा बिबट्या अखेर वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात जेरबंद झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे.**

निफाड तालुक्याच्या गोदाकाठ भागातील करंजी खुर्द, तामसवाडी, ब्राह्मणवाडे, झुगे या गावांतील शेतकऱ्यांच्या पाळीव कुत्रे व प्राण्यांवर अनेक वेळा हल्ले करून बिबट्याने ठार केले होते. यामुळे शेतकरी धास्तावले होते व शेतकऱ्यांना शेतमजूर यांना कायमस्वरूपी दर्शन होत असे. त्यामुळे रात्री-अपरात्री पिकांना पाणी देण्यासाठी जाता येत नव्हते. परिसरातील सर्वच शेतकऱ्यांनी वनविभागाला पिंजरा लावण्यासाठी विनंती केली होती.

वनविभागाने करंजी खुर्द-मेंढी रस्त्यालगत रामदास अडसरे यांच्या द्राक्षबागेजवळील गट नंबर १८२ मध्ये पिंजरा लावला होता. भक्ष्याच्या शोधात असलेला बिबट्या पहाटेच्या सुमारास अखेर जेरबंद झाल्याची माहिती विलास अडसरे यांनी वन विभागाला दिली. वनविभागाचे वनपाल भगवान जाधव, वनरक्षक विंचूर विजय दोंदे व आधुनिक बचाव पथकाच्या सहाय्याने ताब्यात घेऊन शासकीय वाहनाने निफाड वनोद्यान येथे नेऊन नंतर नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार असल्याचे सांगितले.



## दक्ष गायकवाडची टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड

**निफाड : शहर प्रतिनिधी**
**टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक आयोजित १४ वर्षे आतील राज्य अजिंक्यपद स्पर्धा नाशिक येथे उत्साहात झाली. त्यामध्ये निफाड येथील वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूलचा खेळाडू दक्ष विनोद गायकवाड याची महाराष्ट्र संघात व राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये निवड झाल्याबद्दल त्याचे निफाड तालुक्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे.**

राज्यस्तरीय १४ वर्षे आतील स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव मीनाक्षी गिरी, वूमन डायरेक्टर धनश्री गिरी, महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी व नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड, सहसचिव धनंजय लोखंडे आदी उपस्थित होते.

वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूलचा खेळाडू दक्ष विनोद गायकवाड याची नाशिक संघात निवड झालेली होती. त्याने राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये उत्कृष्ट खेळ करत राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची ऑलराउंडर म्हणून महाराष्ट्र संघात निवड झालेली आहे. राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धा मथुरा येथे होत आहे. दक्ष गायकवाड याची महाराष्ट्र संघात निवड झाल्याबद्दल भारतीय टेनिस महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या सचिव मीनाक्षी गिरी, रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, संस्थेचे विश्वस्त ॲड. आप्पासाहेब उगावकर, रतन पाटील वडघुले, किरण कापसे, राजेंद्र राठी, ॲड. दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत विश्वास कराड, नरेंद्र नांदे, शाळेच्या मुख्याध्यापिका पल्लवी सानप यांनी अभिनंदन केले व पुढील वाढचालीस शुभेच्छा दिल्या. क्रीडा प्रशिक्षक सुभाष खाटेकर, विलास गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

## वाहनाच्या धडकेत मोटारसायकलवरील दोघे जण जखमी

**चांदवड : वार्ताहर**
येथील चांदवड-मनमाड रोडवरील कोतवाल यांच्या पेट्रोलपंपासमोर अज्ञात वाहनाच्या धडकेत मोटारसायकलवरील दोघे जखमी झाले. चांदवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. चांदवड येथील चांदवड-मनमाड रोडवरील कोतवाल यांच्या पेट्रोलपंपासमोर अज्ञात वाहनाने मोटारसायकलला धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकलवरील संतोष माळी व संजय गांगुर्डे या दोघांना गंभीर दुखापत झाल्याने याप्रकरणी तात्याभाऊ पवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार अज्ञात वाहन चालकाविरोधात चांदवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, याबाबत अधिक तपास हवालदार चौधरी करीत आहे.



## येवला शहरात श्री संत रोहिदास महाराज जयंती

**येवला : प्रतिनिधी**
**गुरू रोहिदास महाराज हे एक क्रांतिकारी आणि विज्ञानवादी महान संत होते. समाजातील जातिवाद, भेदभाव, शोषण आणि अंधश्रद्धा यांच्याविरोधात त्यांनी आवाज उठवला. त्यांचे जीवन, त्यांचे साहित्य आणि त्यांचे तत्त्वज्ञान आजही समाजाला प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. जिभाऊ मोरे यांनी बोलताना केले.**

येवला शहर चर्मकार समाजाच्या वतीने आयोजित श्री संत रोहिदास महाराज जयंती कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. मोरे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजाचे अध्यक्ष महेश उगावकर होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

संतांनी कुण्या एका विशिष्ट समाज वा जातीसाठी काम केले नाही. त्यांनी सर्वच समाजघटकांच्या हितासाठी, कल्याणासाठी आणि उत्थानासाठी काम केले. मात्र, आज आपण संत, महापुरुष, जात आणि समाजा समाजात वाटून घेत आहोत ही बाब चुकीची आहे. सर्वच संतांनी केलेले उपदेश, दिलेली शिकवण महत्त्वाची, समाजहिताचीच आहे.

संत रोहिदास महाराजांनी एकता, समानता आणि प्रेमावर आधारित तत्त्वज्ञान सांगितले. जातिव्यवस्था आणि पंथभेद विरहित शिकवण दिली, असेही प्रा. डॉ. मोरे यांनी शेवटी बोलताना स्पष्ट केले. यावेळी दौलत पाटोळे, भाऊसाहेब वाघ, सोमनाथ खळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी समाजाच्या वतीने एमपीएससी उत्तीर्ण विकास वाघ, खरेदी-विक्री संचालक सुमित थोरात तर औद्योगिक वसाहतीचे संचालक योगेंद्र वाघ यांचा प्रा. डॉ. मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक व सूत्रसंचालन गोकुळदास वाघ यांनी केले.

## चांदवडला २८ महिलांची दुर्बिणीद्वारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

**चांदवड : वार्ताहर**
**राष्ट्रीय कुटुंबकल्याण कार्यक्रमांतर्गत चांदवड उपजिल्हा रुग्णालयात कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २८ महिलांची दुर्बिणीद्वारे यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नवनाथ आव्हाड यांनी ही माहिती दिली.**

राज्यात सर्वत्र राष्ट्रीय कुटुंब कल्याण योजना राबवली जात असून, याअंतर्गत सरकारी रुग्णालयांमध्ये महिलांची विनामूल्य कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली जाते. त्याचाच एक भाग म्हणून १४ फेब्रुवारी रोजी चांदवड उपजिल्हा रुग्णालयात शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात नाशिक येथील सुप्रसिद्ध सर्जन डॉ. वसंत जमदाडे व त्यांच्या चमूने २८ महिलांची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया केली.

शस्त्रक्रिया यशस्वी करण्यासाठी डॉ. नवनाथ आव्हाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. हेमंत अहिरराव, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. हर्षद जाधव, भूलतज्ज्ञ डॉ. सुचिता वाघमारे तसेच डॉ. वेद निकम, डॉ. अभिजित निकम, डॉ. जीवन देशमुख आणि उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

यशस्वी शस्त्रक्रियेमुळे महिलांनी समाधान व्यक्त केले असून, कुटुंब नियोजनाच्या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरल्याचे मत आरोग्यतज्ज्ञांनी व्यक्त केले.

## संतश्रेष्ठ श्री सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात

**न्यायडोंगरी : वार्ताहर**
**न्यायडोंगरी येथे तारू नाईक तांडा ( जय जनार्दननगर) व मोदकेश्वरनगर (भिका नाईक तांडा) येथे संतश्रेष्ठ श्री सेवालाल महाराज यांचा २८६ वा जयंती उत्सव साजरा करण्यात आला.**

यावेळी न्यायडोंगरी परिसरातील सर्व लमाण बंजारा समाजातील तांड्यांनी एकत्रित येऊन संत श्री सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे ढोल, डीजे वाद्य वाजवून संतश्रेष्ठ श्री सेवालाल महाराज यांच्या गगनभेदी जयघोषाने मिरवणूक काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आल्यावर सेवालाल महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. याप्रसंगी नोकरीनिमित्ताने शहराकडे गेलेले असंख्य समाजबांधव प्रामुख्याने सहकुटुंब सहभागी झालेले दिसून आले. अनेक तरुण - तरुणींनी आपले पारंपरिक वेशभूषा परिधान करीत असंख्य तरुणींनी डोक्यावर कळस घेऊन या रथ मिरवणुकीत सहभाग नोंदवला.

तारु नाईक तांडा (जय जनार्दननगर) येथे लमाण बंजारा समाजाच्या तरुणांनी संत सेवालाल महाराज व राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराज यांच्या फलकाचे विधिवत पूजन करून आरती केली व मिरवणुकीस सुरुवात केली. शासनाच्या आदेशावरून सर्व शासकीय कार्यालयांत राष्ट्रसंत म्हणून श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्याच्या शासन निर्णयाने न्यायडोंगरी परिसरातील सर्व शासकीय कार्यालये, प्राथमिक शाळा तसेच लोकनेते कै. ॲड. विजय शिवराम आहेर हायस्कूल व ज्यु. कॉलेज न्यायडोंगरी येथे मोठ्या उत्साहाने जयंती साजरी करीत सेवालाल महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकण्यात आला.

## जुन्या वादातून एका कुटुंबातील तिघा सदस्यांना मारहाण

**चांदवड : वार्ताहर**
**नांदूरटेक येथे ग्रामपंचायतीतील वादाची कुरापत काढून एका कुटुंबातील तिघा सदस्यांना मारहाण करण्यात आली आहे. या प्रकरणी चांदवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.**



ग्रामपंचायतीतील वादाची कुरापत काढून येथील उपजिल्हा रुग्णालयासह इच्छापूर्ती हॉटेलसमोर एका कुटुंबातील तिघांना मारहाण झाल्याची तक्रार पोलिसांत आल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटना २ फेब्रुवारी रोजी घडली. मयूर प्रभाकर ठाकरे, रा. नांदूरटेक, ता. चांदवड यास दीपक साहेबराव शिंदे, बारकू एकनाथ शिंदे, बापू अर्जुन शिंदे, बाळू एकनाथ शिंदे, गोरख कारभारी शिंदे, समाधान सूर्यभान शिंदे, योगेश साहेबराव शिंदे, सर्व रा. नांदूरटेक यांनी संगनमताने ग्रामपंचायतीतील वादाची कुरापत काढून मयूर प्रभाकर ठाकरे यांचा भाऊ अमर याची गाडी अडवून त्यास मारहाण केली. वडील प्रभाकर ठाकरे हे अमर यांचे मदतीसाठी गेले असता त्यांनादेखील मारहाण करण्यात आली. याशिवाय हे तिघेही दवाखान्यात औषधोपचार करण्यासाठी जात असताना पुन्हा त्यांची गाडी अडवून गंभीर जखमी केले.

# दुःखाच्या जाणिवेतून प्रगल्भ साहित्याची निर्मिती होते : डॉ. गोरवाडकर

**नाशिक : प्रतिनिधी**
**ग्रामीण जीवनाशी निगडित प्रश्नातून आणि दुःखाच्या जाणिवेतून प्रगल्भ साहित्य तयार होते.**

## पुरस्कार वितरण आणि लोकसाहित्याचा जागर



**पुरस्कारार्थी :** जीवनगौरव : नानासाहेब बोरस्ते, सर्वतीर्थ, उद्धव भयवळ, वारकरीभूषण : ह.भ.प. अशोक महाराज धांडे, साहित्य जागर : गिरणा गौरव प्रतिष्ठान ज्ञानदूत : सुनील दत्तू गुळवे, काव्यरत्न : अशोक भालेराव, अक्षरदूत : ॲड. मिलिंद चिंधडे, सामाजिक कृतज्ञता – नंदलालजी शिंगवी, दारणा गौरव : ॲड. रोहिदास उगले, ज्ञानसाधना : लालगीर गंगागीर गोसावी यांना व सोबत विविध वाङ्मयीन पुरस्कार देण्यात आले.

साहित्याचे जवळपास बरेच प्रकार हे ग्रामीण जीवनाशी समरस असतात. संत साहित्यामध्ये ग्रामीण संस्कृतीचा उल्लेख आहे. संतांचे साहित्य ग्रामीण होते. १९६० नंतर वेगवेगळी साहित्य संमेलनं सुरू झाली. पण आता सर्वांचे साहित्य एकच आहे. त्याला सीमा नाहीत. जमिनीतून येणारी साहित्य कृती अस्सल असते. स्वतःला झोकून देऊन आपण ग्रामीण साहित्याच्या पंढरीचे वारकरी व्हावे ही पालखी अशीच पुढे नेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. विनोद गोरवाडकर यांनी इगतपुरी तालुका रौप्यमहोत्सवी साहित्य संमेलनात अध्यक्षीय स्थानावरून बोलताना केले.

वाडीवऱ्हे, ता. इगतपुरी येथे पंचवीस वर्षांची परंपरा असलेले साहित्य संमेलन उत्साहात पार पडले. यावेळी व्यासपीठावर उद्घाटक कवी किरण भावसार, माजी आमदार नानासाहेब बोरस्ते, ज्येष्ठ साहित्यिक उद्धव भयवाळ, सावानाचे जयप्रकाश जातेगावकर,मंडळाचे अध्यक्ष पुंजाजी मालुंजकर, माजी मविप्र संचालक भाऊसाहेब पा. खातळे, विजयकुमार मिठे, माजी न्यायमूर्ती वसंत पाटील, प्रकाश कोल्हे, स्वागताध्यक्ष बाणेश्वर मालुंजकर आदी उपस्थित होते. प्रत्येक साहित्यिकाला हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम साहित्य संमेलन करत असतात. आणि ग्रामीण साहित्य संमेलनाची ही समृद्ध परंपरा इगतपुरी तालुका साहित्य मंडळाने सुरू केली आहे, असे गौरवोद्गार संमेलन उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक कवी किरण भावसार यांनी व्यक्त केले.

प्रथमतः दीपप्रज्वलन आणि सरस्वतीपूजनाने कार्यक्रम सुरुवात झाली. तत्पूर्वी ग्रंथदिंडी काढण्यात आली होती. मानवधन शिक्षण संस्थेच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीत आणि महाराष्ट्र गीत सादर केले. प्रमुख अतिथी यांचा परिचय देऊन शाल, सन्मानचिन्ह देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. प्रस्तावना इगतपुरी तालुका साहित्य मंडळ अध्यक्ष पुंजाजी मालुंजकर यांनी केले. गेल्या पंचवीस वर्षांचा संमेलनाचा आढावा घेतला.

सूत्रसंचालन ग्रंथमित्र बाळासाहेब पलटने आणि ॲड. ज्ञानेश्वर गुळवे यांनी केले. उद्घाटन सत्रानंतर कथाकथन, परिसंवाद आणि कविसंमेलन आयोजित केले होते. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यात रवींद्र मालुंजकर, विवेक उगलमुगले, तुकाराम ढिकले, प्रवीण जोंधळे, तुकाराम धांडे, राजेंद्र सोमवंशी, आबा देवरे, सप्तर्षी माळी, अलका कुलकर्णी यांच्यासह अनेक मान्यवर साहित्यिक उपस्थित होते. पसायदानाने संमेलनाची सांगता झाली.

## महत्त्वाचे

### प्रा. सतीश घोटेकर यांना पीएच.डी.



**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाज संचलित केटीएचएम महाविद्यालयातील अर्थशास्त्र विषयाचे प्रा. सतीश घोटेकर यांना नुकतीच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. प्राप्त झाली आहे. नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण आणि शेती विकासात अग्रणी बँकेच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास (२००५ ते २०१६) हा त्यांचा संशोधनाचा विषय होता. डॉ. डी. जी. उशीर यांनी त्यांना मार्गदर्शन केले. प्रा. सतीश घोटेकर यांच्या पीएच.डी. संशोधन सादरीकरणासाठी बहिस्थ परीक्षक म्हणून जळगाव विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. वाय. पाटील, पुणे विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. मानसी गोरे,सह मार्गदर्शक डॉ. शरद काकड, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. अमोल गायकवाड, डॉ. आर. जी. रसाळ, डॉ. एस. के पगार व अर्थशास्त्र विभागाचे जवळपास ५० प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. याबद्दल मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, उपसभापती डी. बी. मोगल, चिटणीस दिलीप दळवी, शिक्षणाधिकारी डॉ. एन. के. जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे यांनी अभिनंदन केले.

### शिवसह्याद्री युवा फाउंडेशनतर्फे शाळेला भांडी भेट



**येवला : प्रतिनिधी**
नेहमीच सर्वांच्या मदतीला धावून जाणारे तसेच लोकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असणारी सामाजिक संस्था शिवसह्याद्री युवा फाउंडेशन यांच्या वतीने येवला तालुक्यातील नांदूर येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना पोषण आहारासाठी उपयुक्त अशी मोफत भांडी फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष काटे तसेच पदाधिकारी यांच्या हस्ते शाळेला देण्यात आली. याप्रसंगी शालेय समितीचे अध्यक्ष मनीषा शिंदे, मुख्याध्यापक शिंदे, शिवसह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष काटे, आप्पासाहेब शिंदे, शांतीलाल पवार, माधुरी पैठणकर, गायत्री जेजुकर, कविता काटे, साळवे ताई, पगारे ताई, आदी मान्यवर, ग्रामस्थ, विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चांदवडला संत शिरोमणी नरहरी महाराज पुण्यतिथी



**चांदवड : वार्ताहर**
चांदवड येथे संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी सकाळी सत्यनारायण पूजन, भक्तिगीतांचा कार्यक्रम प्रसिद्ध गायिका अपर्णा माडीवाले यांच्या उपस्थितीत झाला. बारा वाजता महाराजांचे प्रतिमापूजन झाले. यावेळी अध्यक्ष श्रीनिवास शेठ सोनवणे, उपाध्यक्ष अनिल शेठ घोडके, सचिव रवींद्र शेठ खरोटे, खजिनदार कमलाकर शेठ दुसाने, सदस्य रंगनाथ सोनवणे, संतोष सोनवणे, कैलास सोनवणे, नरेश कुलथे, लोकेश वासुळकर, संजय थोरात, शैलेश कुलथे, तुषार सोनवणे, सागर घोडके, सार्थक घोडके, योगेश सोनवणे व सर्व समाजबंधू आणि भगिनी उपस्थित होते.

### चांदवडला राष्ट्रवादीची नवीन सभासद नोंदणी



**चांदवड : वार्ताहर**
चांदवड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वतीने नवीन सभासद नोंदणीस प्रारंभ झाला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जाळे अधिक मजबूत करण्यासाठी नवीन सभासद नोंदणीस गुरुवार, दि.१३ फेब्रुवारीपासून प्रारंभ करण्यात आला. श्री रेणुकामातेचे दर्शन घेऊन नोंदणी सुरू करण्यात आली. आगामी नाशिक महागरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषदा, ग्रामपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. या निवडणुकात पक्षाला चांगले यश मिळावे या दृष्टीने जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात पक्षाचे संघटन मजबूत करण्यासाठी नवीन सभासद नोंदणी सुरू करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष ॲड. रवींद्र पगार यांच्या हस्ते व सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष सुजित सोनवणे, चांदवड तालुकाध्यक्ष रघुनाथ आहेर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी युवक काँग्रेस तालुका सरचिटणीसपदी शांताराम बागल हिरापूर व चिटणीसपदी रवींद्र जाधव वडबारे यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी अनिल काळे, उत्तम आहेर, सुनील कबाडे, गोकुळ देवरे, दशरथ ठाकरे, बन्सी कासव, प्रकाश जाधव, ऋषिकेश टोपे, ईश्वर देवरे, नयन महानुभाव, प्रभाकर बिडगर, वैभव आहेर, राहुल गांगुर्डे, संजय गांधी, गोटीराम सोनवणे, एकनाथ सोनवणे, भगवान मंडलिक आदींसह राष्ट्रवादीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# नवीन शिक्षण धोरण लवकरच आणणार : ना. भुसे

## दिंडोरी : मविप्र संस्थेच्या नूतन प्रस्तावित इमारतीचे भूमिपूजन

**दिंडोरी : प्रतिनिधी**
**काळानुरूप शिक्षण क्षेत्रात बदल होणे आवश्यक असून, रोजगाराभिमुख शिक्षणाची गरज आहे. त्यादृष्टीने पावले उचलली जात असून, लवकरच नवीन शिक्षण धोरण आणले जाईल, असे प्रतिपादन राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केले. दिंडोरी येथील मविप्र संस्थेचे जनता विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाचे नूतन प्रस्तावित इमारतीचे भूमिपूजन शिक्षणमंत्री दादा भुसे, अन्न व औषध प्रशासन तथा विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते झाले. त्यावेळी भुसे बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सरचिटणीस नितीन ठाकरे होते.**



पुढे बोलताना भुसे यांनी हिवाळी येथील शाळेचे शिक्षक यांनी आदर्शवत चालवलेल्या जि.प. शाळा व तेथील उपक्रमाचे कौतुक करत जि. प. शाळांच्या विकासासाठी सर्वांनी हातभार लावण्याचे आवाहन केले. शिक्षकांची भरती व त्यांचे प्रश्न सोडविण्याचे आश्वासन देत दिंडोरी विद्यालयासाठी सर्वतोपरी मदत करण्यात येईल, असे आश्वासित केले.

यावेळी बोलताना मंत्री झिरवाळ यांनी मविप्र संस्था समाजातील सर्व घटकांना आदर्शवत शिक्षण देत असून, मी याच शाळेत घडलो. शाळेच्या इमारतीसाठी स्वतःचे सहा महिन्यांचे मानधन देण्याचे सांगत संस्थेच्या विविध शाखांना जोडणारे रस्ते पूल यांचे प्रश्न सोडविणार असल्याचे सांगितले. आपल्याला मिळालेले खाते हे प्रत्येकाचे आरोग्य आयुष्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असून, यातील भेसळ दूर करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. तालुक्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिक विकासाला संधी असून, मोठे प्रकल्प आणण्याचे प्रयत्न केले जात आहे. नाशिक-दिंडोरी-वणी रस्ता चौपदरीकरण करण्यासाठी पाठपुरावा सुरू असून, लवकरच हा प्रश्न मार्गी लावणार, असे त्यांनी सांगितले. कादवाचे चेअरमन श्रीराम शेटे, संस्थेचे सरचिटणीस नितीन ठाकरे, अध्यक्ष सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, चंद्रकांत राजे, नरेश देशमुख यांनी मनोगत व्यक्त करत शिक्षण क्षेत्रातील विविध अडचणी सोडविण्याची मागणी केली.

संचालक प्रवीण जाधव यांनी प्रास्ताविक करत लेखाजोखा मांडला. यावेळी खासदार भास्कर भगरे, सह्याद्रीचे अध्यक्ष विलास शिंदे, माजी आमदार धनराज महाले, संस्थेचे सर्व पदाधिकारी, माजी संचालक संपतराव घडवजे, गणपतराव पाटील, नरेंद्र जाधव, शालेय समिती अध्यक्ष बाळासाहेब मुरकुटे, दत्तात्रेय जाधव, दौलत उखर्डे, बाळासाहेब जाधव, शिवाजीराव जाधव, दिलीप जाधव, नगरपंचायत अध्यक्ष सुनीता लहानगे, उपाध्यक्ष शैला उफाडे, सर्व नगरसेवक आदींसह शालेय समिती सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते. स्वागत संचालक प्रवीण जाधव यांनी केले तर आभार प्राचार्य शरद शेजवळ यांनी मानले.




## मविप्र प्राध्यापकांच्या संशोधनाला भारत सरकारचे पेटंट

**नाशिक : मराठा विद्या प्रसारक समाज संचलित पिंपळगाव (ब.) येथील क. का. वाघ महाविद्यालयातील पाच प्राध्यापकांच्या अनोख्या संशोधनाला भारत सरकारकडून नुकतेच पेटंट मिळाले आहे. हे संशोधन पाणी आणि जमिनीतील पीएच मोजण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मदत करणार आहे. विशेषतः या संशोधनाचा फायदा देशभरातील शेतकऱ्यांना होणार आहे.**

रसायनशास्त्र विषयाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. अरुण भगरे तसेच रसायनशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. अनंत कर्डेल, प्रा. विक्रम जाधव, डॉ. सचिन कुशारे, डॉ. प्रांजली दाते या पाच प्राध्यापकांच्या नावे रसायनशास्त्र या विषयाच्या 'डिजिटल अँड न्यूट्रिएंट सेन्सॉर डिझाइन' या सशोधनाचे पेटंट नोंदणीकृत झाले होते.

त्यांच्या या संशोधनाचा फायदा पाण्यातील तसेच जमिनीतील पीएच मोजण्यासाठी होईल. तसेच वनस्पतींना आवश्यक असणारे विविध पोषक तत्त्वे नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि सल्फर यांचे प्रमाण समजण्यासाठी सदरील उपकरणाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होईल, असा विश्वास या संशोधनकर्त्या प्राध्यापकांनी व्यक्त केला आहे.

या यशाबद्दल मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, तालुका संचालक शिवाजी गडाख, महिला संचालिका शोभाताई बोरस्ते, सर्व तालुका संचालक, शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, डॉ. भास्कर ढोके, डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे, डॉ. विलास देशमुख, डॉ. अजित मोरे, प्रा. शशिकांत मोगल, स्थानिक व्यवस्थापन समिती अध्यक्ष रवींद्र मोरे, सुनील पाटील, पिंपळगाव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, उपप्राचार्य दिलीप माळोदे आदींनी या प्राध्यापकांचे कौतुक केले.

# सामाजिक जबाबदारीचे भान जपणारे महाविद्यालय : रामेश्वर भालेराव उर्फ जॉनी लिव्हर

## पुंजाबाबा गोवर्धने महाविद्यालयाचा वार्षिक गुणगौरव सोहळा उत्साहात

**इगतपुरी : प्रतिनिधी**
**प्रत्येक महाविद्यालयात गुणगौरव सोहळा होतोच. परंतु धान्य संकलन करून अनेक गरजवंत विद्यार्थ्यांना व आश्रमशाळांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करणारे आदिवासी भागातील हे पहिलेच महाविद्यालय आहे. सामाजिक जबाबदारीचे भान जपणारे हे महाविद्यालय आहे, असे प्रतिपादन रामेश्वर भालेराव उर्फ जॉनी लिव्हर यांनी केले.**




मविप्रच्या इगतपुरी येथील कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने महाविद्यालयात आयोजित वार्षिक विद्यार्थी गुणगौरव व पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्र संचालक ॲड. संदीप गुळवे होते. ॲड. गुळवे म्हणाले कि, हे महाविद्यालय केवळ ज्ञानदानाचेच कार्य करत नसून, त्यासोबत देशातील अनेक अग्निवीर संरक्षण दलात देशसेवेसाठी घडविणारे व सामाजिक जबाबदारी पार पाडणारे महाविद्यालय आहे. याचा निश्चितच संस्थेला व पालक संचालक म्हणून मला अभिमान वाटतो, असे ते म्हणाले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.किरण रकिबे यांनी वार्षिक अहवाल वाचन केले व प्रास्ताविकात भविष्यातील उपक्रम व योजनांची माहिती दिली. या सोहळ्याला मान्यवर म्हणून संपतराव मुसळे, गिरीश मेधने, प्रकाश गायकर, हिरामण शेजवळ, उत्तम गोवर्धने, ॲड. दिलीप खातळे, गणपत राव, समाधान गुंजाळ, संजूमामा खातळे उपस्थित होते. याप्रसंगी अनेक क्षेत्रांत व स्पर्धेत बक्षिसे व पारितोषिके मिळविलेल्या विद्यार्थी व प्राध्यापकांचा गौरव करण्यात आला. प्रा.उत्तम सांगळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विष्णू राठोड, डॉ.कल्पना वाजे, प्रा. हरीश वसावे, प्रा. एस. एस. परदेशी, प्रा. कन्हैया चौरेसिया, प्रा. संजय फाकटकर, प्रा. योगेश उगले, प्रा. महेश परदेशी यांनी यशस्वी संयोजन केले.


## मविप्रच्या 'आयएमआरटी'मध्ये अवतरले बॉलिवूड!

**नाशिक : एमबीए इन्स्टिट्यूट म्हटलं की, एरवी सूट, फॉर्मल शर्ट, युनिफॉर्म आणि ट्राउजरमध्ये दिसणारे विद्यार्थी अचानकपणे कॉलेजच्या कॅम्पसमध्ये बॉलिवूडसह पारंपरिक वेशभूषेत अवतरले. यामुळे कॅम्पसचा संपर्ण लूकच बदलल्याचे दिसून आले. निमित्त होते, मविप्र समाज संचलित आयएमआरटी महाविद्यालयातील 'ऑरा-२०२५' महोत्सवाचे. या चार दिवसांत सांस्कृतिक कार्यक्रमांसह बॉलिवूड डे, कॅरेक्टर डे, ग्रुप डे, हॅलोविन डे, मिसमॅच डे अशाप्रकारचे विविध डेज साजरे करण्यात आले.**

अभ्यासाबरोबर इतर कलागुणांना वाव देऊन विद्यार्थी तणावमुक्त राहून आपल्या ध्येयाप्रत पोहोचण्यासाठी वार्षिक सांस्कृतिक, क्रीडा व विविध डेज महोत्सवाचे आयोजन 'ऑरा-२०२५' अंतर्गत करण्यात आले होते. महोत्सवाची सुरुवात बॉलीवूड आणि कॅरेक्टर डेने झाली. यात विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या चित्रपटातील व्यक्तिरेखा साकारल्या. संवादफेक आणि मिमिक्री यांसारख्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला आणि प्रेक्षकांची मने जिंकली. दुसऱ्या दिवशी ग्रुप डेमध्ये डान्स, सिंगिंग आणि फिशपॉड या आकर्षक कार्यक्रमांनी रंगत आणली. तिसऱ्या दिवशी संस्थेच्या परिसरात विविध वेशभूषा परिधान करून विद्यार्थ्यांनी पारंपरिक दिवस साजरा केला. त्यानंतर झालेल्या रॅम्पवॉकमध्ये विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने सहभाग घेतला. सायंकाळी बोनफायर आणि म्युझिक जॅमिंग सेशनमधून विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर केले. प्रा. डॉ. गिरीश अहिरे यांनी अप्रतिम गीत सादर केले आणि प्रा. डॉ. संजय गायकवाड यांनी शेरोशायरी सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

## साहित्यायन संस्थेचे २३ फेब्रुवारीला साहित्य संमेलन

**सटाणा : तालुका प्रतिनिधी**



येथील साहित्यायन संस्थेचे २९ वे एकदिवसीय साहित्य संमेलन रविवार, दि.२३ फेब्रुवारी रोजी शहरातील देवमामलेदार सभागृहात सुप्रसिद्ध कवी, लेखक, गीतकार प्रा. दासू वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत असल्याची माहिती साहित्यायन संस्थेचे अध्यक्ष प्रा. किरण दशमुखे यांनी दिली. दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील संमेलनाची सुरुवात सकाळी साडेआठ वाजता शिवतीर्थापासून ग्रंथ दिंडीने होणार आहे. यामध्ये सर्व साहित्य रसिक व शालेय विद्यार्थी आपला सहभाग नोंदवणार आहेत. संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून माजी नगराध्यक्ष सुनील मोरे उपस्थित राहणार असून, प्रमुख अतिथी म्हणून पुस्तकांच्या आजी म्हणून प्रचलित भिमाबाई जोंधळे, मविप्र संचालक डॉ. प्रसाद सोनवणे, चित्रा बाविस्कर, माजी नगराध्यक्ष सुनील मोरे, प्रांताधिकारी, तहसीलदार कैलास चावडे, मुख्याधिकारी लक्ष्मण राठोड पोलीस निरीक्षक बाजीराव पोवार आदी मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहेत.

सकाळी संमेलनाच्या उद्घाटनानंतर साहित्यायनी स्मरणिकेचे प्रकाशन, प्रा. किरण दशमुखे यांनी लिहिलेल्या प्रियदर्शनी इंदिरा गांधी या पुस्तकाचे प्रकाशन, संपादकांचे मनोगत, उद्घाटक आणि संमेलन अध्यक्ष प्रा.दासू वैद्य यांचे भाषण होईल. त्यानंतर दुपारी आजची कविता सामाजिक भान देते - देत नाही या विषयावर कवी उत्तम कोळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार असून यामध्ये प्रा. एकनाथ पगार, प्रा.डॉ. रमेश माने, प्रा.डॉ.सुदाम राठोड सहभाग नोंदवणार आहेत.

दुसऱ्या सत्रात कविसंमेलन आयोजित केले असून यामध्ये डॉ. एस. के. पाटील, विष्णू थोरे, संदीप जगताप, शैलेश चव्हाण या निमंत्रित कवींसोबत जिल्हाभरातून आलेले प्रतिथयश कवी आपला सहभाग नोंदवतील. कविवर्य कुसुमाग्रज काव्य स्पर्धेचे पारितोषिक वितरण देखील यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात येईल. उत्तम साहित्यकृतींना पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न होणार आहे. तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ग्रंथालयांना दरवर्षी सन्मानित करण्यात येणार आहे. यात वटार, ता.बागलाण येथील महात्मा फुले सार्वजनिक वाचनालयास ग्रंथ व गौरवचिन्ह देऊन सन्मान केला जाणार आहे. संमेलनात ग्रंथ प्रदर्शन व विक्रीचे देखील आयोजन केले जाणार आहे. रसिकांनी व साहित्यप्रेमींनी सर्वांसाठी खुले असलेल्या संमेलनास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## राहाता बाजार समितीत कांद्याला ३५०० रुपये भाव

**राहाता : तालुका प्रतिनिधी**
राहाता बाजार समितीत विवारी कांद्याला जास्तीत जास्त ३५०० रुपये भाव मिळाला. कांद्याच्या १९३८ गोण्यांची आवक झाली. कांदा नंबर १ ला २८०० ते ३५०० रुपये भाव मिळाला. कांदा नंबर २ ला १८०० ते २७५० रुपये भाव मिळाला. कांदा नंबर ३ ला ९०० ते १७५० रुपये भाव मिळाला. गोल्टी कांद्याला ००० ते २५०० रुपये भाव मिळाला. जोड कांद्याला ५०० ते १००० रुपये भाव मिळाला. डाळिंबाच्या २६ कॅरेटची आवक झाली. डाळिंबाला सरासरी २५० रुपये भाव मिळाला, अशी माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व सचिव सुभाष मोटे यांनी दिली.

## बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी; राहुरी तालुक्यातील घटना

**आरडगाव : राहुरी तालुक्यातील मानोरी शिवारात बिबट्याने धुमाकूळ घातला असून, या बिबट्याने केलेल्या हल्ल्यात एक शेतकरी गंभीर जखमी झाला आहे. ही घटना काल रविवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी घडली आहे. विठ्ठल रामभाऊ हापसे असे जखमी झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.**



याबाबत समजलेली माहिती अशी की, आज रविवार दि. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता मानोरी येथील हापसे वस्तीवर एका शेतात ऊस तोड सुरू असताना ऊस तोड कामगारांना हा बिबट्या शेतात दिसला. त्यांनी ही माहिती शेतकऱ्यांना दिली. त्यानंतर या बिबट्याला पाहण्यासाठी परिसरातील शेतकऱ्यांनी मोठी गर्दी केली. मात्र, दबा धरून बसलेल्या बिबट्याने जमावातील एका शेतकऱ्यावर हल्ला चढविला.

या हल्ल्यात शेतकरी हापसे यांच्या हाताला व दंडाला गंभिर स्वरूपाच्या जखमा झाल्या असून त्यांना वैद्यकिय उपचारासाठी तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे मानोरी परिसरात मोठी दहशत पसरली असून या बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाने तात्काळ पिंजरे लावण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

# गोवर्धने विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

## मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना झाले अश्रू अनावर

**मुकणे : प्रतिनिधी**
**मुकणे येथील महर्षी पुंजाबाबा गोवर्धने विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ नुकताच पार पडला. यावेळी मनोगत व्यक्त करतानाच विद्यार्थ्यांना अश्रू अनावर झाल्याने विद्यार्थ्यांसह शिक्षक व उपस्थितांनाही गहिवरून आले.**

दहावीच्या विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा जवळ आल्याने या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक बाबाजी थोरात हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक येथील के.जी. मेहता हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य धनंजय पाठक, घोटी बाजार समितीचे माजी संचालक विष्णू पाटील राव, शालेय समितीचे अध्यक्ष अशोक राव, सुनील चोरडिया, किसन भोर, विजया पाटील आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी दहावीच्या विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचा फुल व शाल देऊन सन्मान केला. यावेळी विद्यार्थ्यांनी आई, वडील व शिक्षकांची मान उंचावेल असे काम करून परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हावे तसेच पुढील शिक्षणासाठी आई-वडिलांना विचारात घेऊन ध्येय निश्चित करावे, असे आवाहन प्रमुख पाहुणे के.जी. मेहता हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य धनंजय पाठक यांनी केले. अनेक दाखले देत विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या बाबी आत्मसात करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहनही त्यांनी केले.



दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ करण्यासाठी नववीच्या विद्यार्थ्यांनी केलेले आयोजन ही आगळीवेगळी संकल्पना असल्याचेही प्राचार्य धनंजय पाठक यांनी सांगितले. मुख्याध्यापक बाबासाहेब थोरात यांनी विद्यार्थ्यांनी परीक्षाकाळात घ्यावयाची काळजी व परीक्षेबाबत मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

चैताली वेल्हाळ, संस्कृती जाधव, प्रांजल राव, गौरव राव, सिद्धार्थ राव आदी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना त्यांना व सर्व शिक्षकांनाही अश्रू अनावर झाले. संघराज उबाळे, पुष्कर राव, आर्यन आवारी, कार्तिकी धोंगडे, काजल धांडे, तेजस राव, हरीश बोराडे आदींसह विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांना स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास शिक्षक माणिकराव देशमुख, राजाराम गायकर, किसन भोर, एकनाथ नेहरकर, रमेश खैरनार, विजया पाटील, प्रमिला निर्मळ, सुरेखा चव्हाण, रमेश गायकवाड, दिलीप पाटील, बाळू खातळे, गौरव डावरे, कुणाल शिंपी, अनिता आंबेकर आदींसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परिनिता चोरडिया व वैष्णवी गायकर या विद्यार्थिनींनी केले तर आभार रमेश खैरनार यांनी मानले.

## 'निमाथॉन २०२५' मॅरेथॉन नाशकात उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**
नाशिकमध्ये डॉक्टरांच्या राष्ट्रीय संघटनेच्या माध्यमातून रविवार, १६ रोजी मॅरेथॉन घेण्यात आली. (नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन) नाशिक शाखा यांच्या वतीने नाशिक शहर व परिसरात कार्यरत आरोग्य क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या डॉक्टर, नर्स, परिचारक, कार्यालयीन मदतनीस आदी व त्यांचे परिवार अशा सर्वांसाठी प्रथमतःच आयोजन करण्यात आले.




स्पर्धेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे सरचिटणीस म. वि. प्र. संस्था ॲड. नितीन ठाकरे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, महाराष्ट्र राज्य शाखेचे अध्यक्ष डॉ. तुषार सूर्यवंशी, जि. प. चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी, केंद्रीय संघटक डॉ. शैलेश निकम, याशिवाय केंद्रीय व राज्य शाखेचे पदाधिकारी डॉ. मनीष जोशी, डॉ. देवेंद्र बच्छाव, डॉ. भूषण वाणी, ज्ञानेश्वर गायकवाड, सरपंच लहवित व सामाजिक कार्यकर्ते यांच्या हस्ते झाले.

स्पर्धेच्या उद्घाटनापूर्वी शिवगर्जनाकार विराज लोंढे याने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. स्पर्धेत प्रथमतः १० नंतर ५ व शेवटी ३ किलोमीटर धावणाऱ्या स्पर्धकांना झेंडा दाखवून धावण्याची सुरुवात करण्यात आली. मॅरेथॉन चौक ते हॉटेल, गंगापूर रोड या मार्गावर तीन ठिकाणी स्पर्धकांना हायड्रेशन पॉइंट देण्यात आले होते व तेथूनच परत सुरुवात केल्या जागेवर येऊन मॅरेथॉनची लाईन होती. ढोलताशे, तुतारीच्या गजरात धावायला सुरुवात करण्यात आली. सर्व स्पर्धक व त्यांचे समर्थक सर्वांसाठी सुरूची अल्पोपाहार व चहापान याची व्यवस्था ठेवण्यात आली होती. स्पर्धेच्या १० किलोमीटर टप्प्यासाठी पुरुष व स्त्री गटात पहिल्या तीन स्पर्धकांना येणाऱ्या तीन स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक, मेडल देण्यात आले.

# मातीशी नाळ कायम ठेवत आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारा : ना. दादा भुसे

**नाशिक: प्रतिनिधी**

**जगाच्या स्पर्धेत टिकायचे असेल तर आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे तंत्रज्ञान आपल्याला आत्मसात करावेच लागेल. पुस्तकाच्या रकमेचा उपयोग करून आपण समाजाच्या देणं लागतो, या भावनेतून सचिन जोशी यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स लर्निंग बस तयार केली. या बसचा फायदा महापालिका, जिल्हा परिषद, आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांना होणार आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्य दिशेने जाताना आपल्या पुढील पिढीची जमिनीशी नाळ तुटणार आहे, याची काळजी घ्यायला हवी, असे मत राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी व्यक्त केले.**

## आर्टिफिशियल इंटेलिजन्स लर्निंग बसचे लोकार्पण




एज्युकेशन ऑन व्हील्स उपक्रमांतर्गत तयार करण्यात आलेल्या भारतातील पहिल्या आर्टिफिशल इंटेलिजन्स लर्निंग बसचे लोकार्पण राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, आंतरराष्ट्रीय विचारवंत संदीप वासलेकर, खासदार भास्कर भगरे, प्रसिद्ध दिग्दर्शक प्रवीण तरडे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी वाहतूक व सुरक्षा विभागाचे उपायुक्त भरत कळस्कर, पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, बालभारतीचे संचालक कृष्णकुमार पाटील, धर्मदाय उपायक्त विवेक सोनुने, आयकर विभागाचे सहआयुक्त हर्षद आराधी, शिक्षणतज्ज्ञ रमेश पानसे, कादवा सहकारी साखर कारखान्याचे श्रीराम शेटे, आर्मस्ट्राँग कंपनीचे चेअरमन विनीत माजगावकर, ऊर्जा फाउंडेशनचे अजय बोरस्ते, अविनाश जाधव, मविप्र सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, जितुभाई ठक्कर, शाम लोंढे, इलमस फतेहली यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

विचारवंत संदीप वासलेकर म्हणाले उपेक्षित घटकातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण देण्यासाठी प्रयत्न झाल्यास खऱ्या अर्थाने देशाची प्रगती होईल.

दिग्दर्शक प्रवीण तरडे म्हणाले की, काही वर्षापूर्वी मी आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही एकांकिका लिहिली. हा विषय खूप प्रसिद्ध झाला. अभिनव प्रयोगांमुळे या शाळेकडे बघण्याचा दृष्टिकोन विद्यार्थी व पालकांचा बदलेल.

एमआयटीचे प्राध्यापक डॉ. रमेश रासकर यांनी या उपक्रमाचे कौतुक करत ''ही बस भारतातील डिजिटल शिक्षणाचा नवा अध्याय ठरेल'' असे गौरवोद्गार काढले आहे. इस्पॅलिअर स्कूलच्या संचालिका डॉ प्राजक्ता जोशी यांनी सांगितले की, हा इस्पॅलिअर स्कूलचा सामाजिक उपक्रम असून, तंत्रज्ञानातून शिक्षण क्रांती करण्याचा हा प्रयत्न आहे.

> एआय मशीन लर्निंग, डेटा सायन्स, कोडींग आणि रोबोटिक्स यासारख्या विषयांचे शिक्षण प्रत्यक्ष अनुभवासह मिळेल. विशेषतः, ग्रामीण भागातील आणि झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांना या तंत्रज्ञानाचा लाभ होणार आहे.
>
> **– सचिन जोशी,** शिक्षणतज्ज्ञ

### जि. प. आणि मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत एआय शिक्षण

विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शिकण्याची संधी मिळावी व त्यांची डिजिटल कौशल्ये विकसित व्हावीत, यासाठी ही एआय लर्निंग बस उपयुक्त ठरणार आहे. एज्युकेशन ऑन व्हील्स उपक्रमांतर्गत तब्बल १९ हजार विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले गेले आहे. या बसमध्ये विद्यार्थ्यांसाठी २ तासांची कार्यशाळा, १५ दिवसांचे विशेष प्रशिक्षण आणि १ महिन्याचा सखोल अभ्यासक्रम असे विविध टप्पे असतील. विशेष म्हणजे, महापालिका आणि जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांसाठी हे शिक्षण पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिले जाणार आहे.

### अशी आहे एआय लर्निंग बस

रोबोटिक्स लॅब, रेकॉर्डिंग स्टुडिओ, ऑडिओ-व्हिडिओ कंटेंट निर्मिती स्वतःचे व्हिडिओ आणि ध्वनिमुद्रण तयार करता येईल. एआय शिकवणारे सर्व सॉफ्टवेअर, २० टॅब्लेटसह डिजिटल शिक्षण, व्हर्च्युअल रियालिटीद्वारे पहिली ते दहावीचा संपूर्ण अभ्यासक्रम ३, इंटरऍक्टिव्ह बोर्ड, थ्रीडी प्रिंटर, दोन मोठ्या एलईडी स्क्रीन, अलेक्सा, विविध थ्रीडी पेन, १०० हून अधिक पुस्तकांची लायब्ररी, इंटरनेट राऊटर, पूर्ण बस वातानुकूलित (एसी), दोन जनरेटर सेट, सोलर लाईट, संपूर्ण बस सीसीटीव्ही अंतर्गत.

---

# मनमाडला क्रेन-टँकरच्या अपघातात दोन ठार

## शिवजयंतीनिमित्त झेंडे लावण्याचे काम सुरू असताना धडक

**मनमाड : प्रतिनिधी**

**शिवजयंती उत्सव निमित्ताने मनमाड नांदगाव महामार्गावर असलेल्या पथदीपच्या (लाईट) पोल-वर हायड्रॉ(क्रेन)द्वारे झेंडे लावत असताना समोरून येणाऱ्या टँकरने क्रेनला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला या अपघातात दोन जण जागीच ठार झाले तर ३ जण गंभीर जखमी झाले आहेत त्यांना प्रथमोपचार करून मालेगाव येथे हलविण्यात आले आहे.जखमी आणि मयताची नावे अद्याप समजली नसुन पुढील तपास पोलीस करत आहेत.**



याबाबत सविस्तर वृत्त असे की आगामी १९ तारखेला शिवजयंती निमित्ताने मनमाड शहरात भरगच्च कार्यक्रम होणार आहे या कार्यक्रमाच्या तयारी निमित्ताने सर्वत्र भगवे ध्वज लावण्याचा काम सुरू आहे मनमाड शहरातील मनमाड नांदगाव महामार्गावर हॉटेल सह्याद्री समोर या महामार्गावरील पथदीप पोलवर क्रेंद्वारे भगवे झेंडे लावत असताना समोरून आलेल्या टँकरने या क्रेनला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले अपघात इतका भीषण होता की क्रेनचा अक्षरशा चुरा झाला आहे रात्रीचा अंधार असल्याने मदत कार्य करण्यास मोठ्या प्रमाणावर अडचण निर्माण झाली होती मुळात राष्ट्रीय महामार्गावर अशा प्रकारे ध्वज लावणे हे नियम बाह्य आहे मात्र परवानगी घेऊन ते लावता येऊ शकतात यासाठी पुरेशी खबरदारी घेऊन प्रॉपर सिक्युरिटी करून काम करायला हवे याशिवाय दिवसाच्या उजेडात हे काम करणे गरजेचे असतांना रात्रीच्या अंधारात हे ध्वज लावले जात होते यात टँकर चालकांला समोरचा अंदाज न आल्याने हा अपघात झाला असल्याचे प्रत्यक्षदर्शीने सांगितले आहे.यात अजून किती जण जखमी आहेत हेही अद्याप समजले नाही यातील आतापर्यंत फक्त पाच जण समजले असुन यातील २ जणांचा जागीच मृत्यू झाला तर तीन जण गँभिर जखमी झाले आहेत घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी बचाव कार्य सुरू केलं व जखमींना तात्काळ उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले यातील दोन जणांना डॉक्टरानी मृत घोषित केले तर इतर तीन गँभिर जखमींना मालेगाव येथे हलवले आहे.

# सुट्टी सिगारेट व बिडी विकायला महाराष्ट्रात आरोग्य विभागाची बंदी!

**मुंबई :**

महाराष्ट्रात जेव्हा करोना वेगाने पसरत होता तेव्हा आरोग्य विभागाने राज्यातील कोणत्याही पान बिडी दुकानात सुट्टी सिगारेट व बिडी विकायला बंदी घातली होती. त्यानंतर राज्यात काही साथरोग आले.आता जीबीएसने धुमाखूळ घातला आहे मात्र आरोग्यविभागाच्या या आदेशाची असून पोलीस व महापालिका व खुद्द आरोग्य विभागाकडूनच कोणतीही अंमलबजावणी होताना दिसत नाही. महाराष्ट्रात शाळा - कॉलेजमधील तरुणाई मोठ्या प्रमाणात तंबाखूजन्य पदार्थ म्हणजे सिगारेट पासून गुटख्याच्या अहारी गेले आहे. वेळोवेळी राज्यातील अनेक सरकारांनी दारुबंदी, सिगारेट तसेच तंबाखूजन्य पदार्थांच्या प्रसारावर नियंत्रण आणण्यासाठी अनेकदा बैठका घेतल्या आहेत. आरोग्य विभागाने यापूर्वी सुट्टी सिगारेट व बिडीची विक्री होऊ नये यासाठी विधी व कायदा विभागासह सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता. मात्र विधी विभागाकडून पुरेसे पाठबळ न मिळाल्याने आरोग्य विभागाला याबाबत आदेश काढता आला नव्हता, असे आरोग्य विभागाच्या एका वरिष्ठ अधिकार्याने सांगितले. दरम्यानच्या युती शासनाच्या काळात शाळी- महाविद्यालये तसेच रुग्णालये व धार्मिक स्थळांच्या शंभर मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी लागू करण्यात आली.


**ग्रामपंचायत देवरगाव, ता. येवला, जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२४-२५**

**शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासन निर्णयानुसार)**

ग्रामपंचायत देवरगाव ता. येवला जि. नाशिक येथे होणाऱ्या कामासाठी साहित्य पुरवठा दर लिफाफा बंद दरपत्रक द्वारे मागवत आहे. सदर च्या तांत्रिक लिफाफा मध्ये जिल्हा परिषद नोंदणी,(व्यवसाय प्रमाणपत्र) वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र, पॅन. जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफा मध्ये दर पत्रक सादर करण्यात यावे. सदर चा लिफाफा १७/०२/२०२५ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक २२/०२/२०२५ सायंकाळी ५.०० वा. (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदर चे लिफाफे दिनांक २४/०२/२०२५ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवशयक आहे अन्यथा त्या नंतर सदर च्या निविदा संबधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत देवरगाव ता. येवला जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे. व अंदाजपत्रके ग्रामपंचायत मध्ये बघण्यास मिळतील.

**साहित्याचे नाव**-१) सिमेंट (प्रती बॅग) २)खडी (प्रती ब्रास) ३) वाळू (प्रती ब्रास) ४)वॉश संड (प्रती ब्रास) ५)दगड (प्रती ब्रास) ६) मुरूम (प्रती ब्रास) ७)वीट (प्रती नग) ८) स्टील (प्रती किलो) ९) लोखंडी जाळी (प्रती कि.ग्रा.) १०) सिमेंट ढापे (प्रती नग) ११) सिमेंट पाईप २०० एम.एम. १२) सिमेंट पाईप ३०० एम.एम. १३) पीव्हीसी पाईप २.५ इंच (प्रती नग) १४) पीव्हीसी पाईप ३ इंच (प्रती नग) १५) पीव्हीसी पाईप ४ इंच (प्रती नग) १६) पीव्हीसी पाईप ६ इंच (प्रती नग) १७) पलायवूड (प्रती नग)

**सही/- सरपंच** **सही/- ग्रामपंचायत अधिकारी**

**ग्रामपंचायत देवरगाव, ता. येवला, जि. नाशिक**



**टायटल व्हेरीफिकेशन नोटीस**

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका- दिंडोरी पैकी **मौजे - कोचरगाव** या गांवचे शिवारातील शेतमिळकत **गट नं. २८९** यांसी भुधारणा पध्दती - भोग- वर्ग. १, यांसी स्थानिक नाव - काळबेहेड, यांसी क्षेत्र ०८ हे. ३२ आर

पो.ख. + .०१ आर असे एकुण क्षेत्र ०८ हे. ३३ आर यांसी आकार रु. ११.२२ पै. **यापैकी क्षेत्र ०२ हे. १६ आर + पो.ख. ०१ आर यांसी आकार रु. ०२.९१ पै.** ही शेतमिळकत **श्री. नारायण कारभारी काकड व श्रीमती रंजना नारायण काकड** यांचे सामाईक मालकीची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीतील निर्वेध अशी मिळकत आहे. त्यांनी सदर शेत मिळकत विक्री करण्याचा निर्णय घेऊन सदर शेतमिळकतीबाबत आमचे पक्षकारांसोबत शेतमिळकत हस्तांतरणाचा व्यवहार निश्चित केलेला आहे.

सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा हक्क - हितसंबंध, करार-मदार, बोजा, हद्दीचा अगर कोणताही वाद असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ०७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर पुराव्याचे दस्तऐवजांच्या साक्षांकित प्रतीसह लेखी हरकती द्याव्यात. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द जाहिर हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

उपरोक्त मुदतीत कोणाचीही हरकत उपस्थित न झाल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजुन आमचे पक्षकार पुढील व्यवहार करण्यास मुक्त राहतील. सदर मुदतीनंतर कोणाचीही हरकत आमचे पक्षकारांवर व प्रस्तुत मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

**ही जाहिर नोटीस**
**ता.१६/०२/२०२५**

आमचे मार्फत प्रसिध्द
**ॲड. निलेश कैलासराव वडजे**
ऑफिसः- शॉप नं ३०, पहिला मजला, मार्केट यार्ड,
अग्री चायवालाच्या वरती, निळवंडी रोड, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक. ४२२२०२
मो. ९८८१२९२३०६, ९१७२५०५०७५



**जाहीर नोटीस**

प्रोसेस जमा — निशाणी नं. १०
दिवाणी चौ. अर्ज नंबर ८७१/२०२४ — ॲड. हसीब पिरजादे

**नाशिक येथील मे. सिव्हील जज्ज साहेब, सि. डिव्हीजन, नाशिक यांचे कोर्टात,**

**नियाज हुसेन शेख,** उ.व. ४२ वर्षे,धंदा - मजुरी, ... **अर्जदार**
रा. ३९३१, जमादर वाडा, बुधवार पेठ, चव्हाटा, जुने नाशिक ४२२ ००१

**विरूध्द**

**१) निसार हुसेन शेख,** उ.व. ५८ वर्षे, धंदा - ड्रायव्हर, रा. ०७, हरी आनंद सोसायटी, पखाल रोड, द्वारका, नाशिक ४२२ ०११, **२) समीर हुसेन शेख,** उ.व. ४८ वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा. फ्लॅट नंबर ८, रॉयल कॉलनी, लेन नंबर १, सागर बी अपार्टमेंट, नाशिक ४२२ ००१, **३) जायदा हनीफ शेख,** उ.व. ४९ वर्षे, धंदा - गृहीणी, रा. ३९३१, जमादर वाडा, बुधवार पेठ, चव्हाटा, जुने नाशिक ४२२००१, **४) जिक्रा हनीफ शेख,** उ.व. ११ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. ३९३१, जमादर वाडा, बुधवार पेठ, चव्हाटा, जुने,नाशिक ४२२ ००१.
नंबर ३ स्वतःसाठी व नंबर ४ ची अ.पा.क. म्हणून .........**सामनेवाले**

ज्याअर्थी मयत **हुसेन इस्माईल शेख** हे दि.१५/०९/२०२१ एम.एस.ई.बी. नाशिक येथे नोकरी करीत होते. त्यांचे नावे असलेली कर्मचारी भविष्य निधी संगठन येथे त्यांची पी. एफ. ची रक्कम रूपये ९९,२०० /- मात्र मिळणेसाठी अर्जदार यांचे नावे वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी सदर अर्जदार यांनी त्यांच्या मागणीप्रमाणे वारस दाखला देणेबाबत कोणाचीही कोणत्याही स्वरूपाची हरकत असल्यास त्यांनी त्यांची बाजू मांडण्यासाठी स्वतः अगर यथायोग्य सूचना दिलेले वकीलांमार्फत **दि. १५/०३/२०२५** रोजी ठिक ११.०० वाजता हजर व्हावे.

उपरोक्त तारखेस कोणीही न्यायालयात हजर न झाल्यास अर्जाची एकतर्फा सुनावणी होवून अर्जदारांचे नांवे वारस दाखला देण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस
**नाशिक, दि. १५/०२/२०२५**

**सही/-** (शिक्का) **सही/-**
**(कामगिरी लिपिक)** **न्यायालय अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर, नाशिक** **दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर, नाशिक**


पान १ वरून.....

## लव्ह जिहाद विरोधात कडक कार्यवाही

करून लव्ह जिहादच्या विरोधातील कायदा करण्यासाठी विशेष समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे, असे या शासन निर्णयात म्हटले आहे.

**केंद्रीय राज्यमंत्री आठवलेंकडून निर्णयाचा विरोध**

एनडीएतील घटक पक्ष आरपीआय (आय)चे अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मात्र या समितीवर आक्षेप नोंदविला आहे. 'लव्ह जिहाद' कायद्याला माझा विरोध आहे. हिंदू-मुस्लिम मुले-मुली एकत्र आले, की त्यास असे म्हणणे योग्य नाही. दलित-सवर्णसुद्धा एकत्र येतात. मुले-मुली एकत्र येतात, अशी लग्न होतात. हिंदू- मुस्लिम लग्न झाले, की त्याला 'लव्ह जिहाद' म्हणणे चुकीचे आहे. मी याला सहमत नाही. परंतु धर्मांतर होऊ नये म्हणून कायद्यात तरतूद असावी, असे स्पष्ट मत केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी शिर्डी येथे माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## आयपीएल २०२५ चे वेळापत्रक जाहीर!

क्वालिफायरमध्ये भिडतील, तर तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकाच्या संघांमध्ये एलिमिनेटर सामना खेळला जाईल. पहिल्या क्वालिफायरमध्ये पराभूत संघ आणि एलिमिनेटरमध्ये जिंकणारा संघ दुसऱ्या क्वालिफायरमध्ये भिडेल. येथील विजेता संघ पहिल्या क्वालिफायरमधील विजेत्या संघाविरुद्ध अंतिम फेरीत पोहोचेल. लखनौ सुपर जायंट्स, पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने अलीकडेच त्यांचे कर्णधार जाहीर केले. २७ कोटी रुपयांना करारबद्ध झालेला ऋषभ पंत सुपर जायंट्सचे नेतृत्व करेल तर २६.७५ कोटी रुपयांना निवडलेला श्रेयस अय्यर किंग्जचे नेतृत्व करेल. आरसीबीने रजत पाटीदारला त्यांचा नवीन कर्णधार म्हणून घोषित केले. फक्त दोन संघ दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांनी अद्याप आयपीएल २०२५ साठी त्यांच्या कर्णधाराची घोषणा केलेली नाही.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका दिंडोरी **मौजे कसबेवणी** या गावचे शिवारातील शेतजमिन मिळकत यांसी गट नं. ५३५ यांसी क्षेत्र ०३ .हे. ५९ आर यांसी आकार ५रु०० पैसे यांसी चतुःसिमा रेकॉर्ड ऑफ राइटस् प्रमाणे.

वर वर्णन केलेली शेतजमिन मिळकत **आशाबाई देवमन बच्छाव** यांचे वडिलोपार्जित मालकीची, कब्जे वहिवाटीतील अशी मिळकत आहे. सदर मिळकतीचा मालकी हक्क व कब्जा आजरोजी मिळकत मालकांकडेच आहेत्याअनुषंगाने टायटल व्हेरिफिकेशन करणे कामी सदरची नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर नाशिक कोर्टात रे.मु. क्र. १६५/२०२० व सी.एम.ए क्र. ७४५/२०२२ हे दावे प्रलंबित आहेत. याव्यतिरिक्त कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा हक्क अधिकार हितसंबंध गहाण, दान, लिज, लिन, चार्ज, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, मनाई हुकूम, साठेखत करारनामा, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, वारस हक्क, जामिनकी, हक्क अधिकार, हीतसंबंध तसेच कोणत्याही स्वरुपाची मागणी असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांच्या आत आमच्या खालील पत्त्यावर मूळ कागदपत्रानिशी लेखी हरकत नोंदवावी मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बिनबोजाची असल्याबाबत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर व परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व त्या हरकती सदरचे मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे ही टायटल व्हेरिफीकेशनकामी जाहीर नोटीस.

**नाशिक**
**दिनांक - १५/०२/२०२५**

सदरहू नोटीस प्रसिध्द करण्यास आमची संमत्ती आहे.
**सही/-आशाबाई देवमन बच्छाव**

सही/-
आमच्या मार्फत प्रसिध्द
**ॲड. जयंत दत्तात्रय जायभावे, ॲड. प्रिती दिपक भुरे**
सुविचार बंगला, जुनी पंडीत कॉलनी, लेन नं. २, नाशिक



**जाहीर इशारा नोटीस**

तमाम नागरिकांना या नोटीसीने कळविण्यात येते की, परिशिष्ट-अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे अनुषंगाने आमचे अशिल नामे **श्री. विजय वाळीबा उगले व अन्य** यांनी सिन्नर येथील **मे. शेतजमीन न्यायाधिकरण सो. तथा तहसिलदार सो. सिन्नर** यांचे न्यायालयात **महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमचे कलम ३२ग प्रमाणे टेनन्सी अर्ज नं. ६/२०२२** चा दाखल केलेला असून तो न्यायप्रविष्ठ आहे. सदर मिळकतीचे अनुषंगाने नामे **१) श्री. विष्णु पंढरीनाथ उगले व अन्य** यांचेसोबत कोणीही कोणत्याही प्रकारे करार, व्यवहार, मदार करु नये केल्यास तो आमचे अशिलांचे कायदेशीर हक्क व अधिकारांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे ही जाहीर नोटीस तमाम जनतेच्या माहितीसाठी व फायद्यासाठी दिली असे.

**परिशिष्ट-अ**

**मिळकतीचे वर्णन :- मौजे बारागावपिंप्री,** ता. सिन्नर, जि. नाशिक येथील शेतजमीन मिळकती **अ) गट नं. ६४० (जुना स.नं. ६९)** यांसी क्षेत्र ६ हे. २५ आर. + पो.ख. ७ हे. ५४ आर. एकुण क्षेत्र १३ हे. ७९ आर. आकार ३ रु. ५० पैसे. **पैकी नोटीसचा विषय असलेले क्षेत्र ३ हे. १२.५० आर. + पो.ख. ३ हे. ७७ आर. एकुण क्षेत्र ६ हे. ८९.५० आर.** आकार १ रु. ७५ पैसे. **ब) गट नं. ७०१ (जुना स.नं. १४८)** यांसी क्षेत्र ० हे. ५१ आर. + पो.ख. १ हे. १६ आर. एकुण क्षेत्र १ हे. ६७ आर. आकार ० रु. ३१ पैसे. **पैकी नोटीसचा विषय असलेले क्षेत्र ० हे. १७ आर. + पो.ख. ० हे. ३८.५० आर. एकुण क्षेत्र ० हे. ५५.५० आर.** आकार ० रु. १० पैसे. **क) गट नं. ७०८ (जुना स.नं. १४४/४)** यांसी क्षेत्र ० हे. १० आर. + पो.ख. ० हे. ०६ आर. एकुण क्षेत्र ० हे. १६ आर. **पैकी नोटीसचा विषय असलेले क्षेत्र ० हे. ०.०५० आर. + पो.ख. ० हे. ०.०३० आर. एकुण क्षेत्र ० हे. ०.०८० आर.** आकार ० रु. ०० पैसे. **ड) गट नं. ७१० (जुना स.नं. १४४/६)** यांसी क्षेत्र १ हे. ६३ आर. + पो.ख १ हे. ५२ आर. एकुण क्षेत्र ३ हे. १५ आर. आकार ० रु. ५३ पैसे. **पैकी नोटीसचा विषय असलेव क्षेत्र ० हे. १० आर. + पो.ख. ० हे. ०९.५०आर. एकुण क्षेत्र ० हे. १९.५० आर.** आकार ० रु. ० पैसे. **इ) गट नं. ७१६ (जुना स.नं. २४४/२)** यांसी क्षेत्र २ हे. ६३ आर. + पो.ख. १ हे. २१ आ एकुण क्षेत्र ३ हे. ८४ आर. आकार २ रु. ०६ पैसे. **पैकी नोटीसचा विषय असलेले क्षेत्र ० हे. आर. + पो.ख. ० हे. ३० आर. एकुण क्षेत्र ० हे. ९६ आर.** आकार ० रु. ५२ पैसे. **ई) गट १२६३ (जुना स.नं. १०/६)** यांसी क्षेत्र ० हे. १४ आर. आकार ० रु. ८७ पैसे. यांसी चतुःसिमा रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे.

सिन्नर, तारीख :- १७/०२/२०२५ अशिलांची सही /-

आमचे मार्फत प्रसिध्द
**ॲड. श्रीपाद मधुकर जोशी ॲण्ड असोसिएटस**
आकाशदिप प्लाझा, शॉप नं. १०, नवीन कोर्टासमोर, विजयनगर, सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक.



**गांवकरी Classified** जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**नाशिक जवळ ऑटोमेटीक करुगेटेड बॉक्स फॅक्टरी साठी अनुभवी स्टाफ व मशिन ऑपरेटरर्स पाहिजेत.**

1) Quality Inspectors
2) Stores / Dispatch Staff
3) Data entry operator

For all above 3 posts, Minimum 2 years experience in industry. & Computer operation knowledge is must.

4) विविध ऑटोमेटीक करुगेटेड बॉक्स मशीन्स वर काम करणारे अनुभवी ऑपरेटर पाहीजेत.

5) Diploma Engineering Apprentice पाहिजेत

CONTACT / WHAT'S UP YOUR BIODATA 8291706764.

**विकणे आहे**

शरद पवार मार्केट यार्डच्या मागे १ बीएचके फ्लॅट विकणे आहे. लिफ्टची सोय. संपर्क- ८००७७९९१०३

**पाहिजेत**

हॉस्पिटल करिता अनुभवी नर्स, हॉस्पिटल ब्रदर,वॉर्ड बॉय पाहिजे, संपर्क - ९१६८४३३५३३, हृदयस्पर्श मल्टिस्पेशालिटि हॉस्पिटल, द्वारका, काठेगल्ली, सिग्नल जवळ.फोन-०२५३४०५८०६४

**नोकरीविषयक**

त्वरित टेलीकॉलर मुली पाहिजेत. शिवाजीनगर, सातपूर- ८४८४८१०५५१/८४८४८१०५५३

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७ ९७६३७३२४२४**

**ज्योतिष**

गायत्री ज्योतिष- जन्म कुंडली, कुंडली मिलान, कुंडलीवरून भविष्य कथन, खासगी त्रासावर उपाय. **संपर्क-** ज्योतिषाचार्य, कमलेश शास्त्री, इंद्रकुंड, नाशिक. ९१५६१७८९६९

**विकणे आहे**

जनरल वैद्य नगर, द्वारका येथे नवीन २ बीएचके फ्लॅट विकणे आहे. संपर्क - ९७४१०८८४४५

**Name Changed**

My old name Malik Mohammed Ismail has been changed to my new name Ismail Malnas Teli as per Aadhar No - 949540200539

**नोकरीविषयक**

नाशिक स्थित कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता ऑफीसबॉय व साईटवर राहून काम करण्याची तयारी असणारा LMV-TR ड्रायव्हर पाहिजे. ८२३७३११२११

**वधू पाहिजे**

**मराठा वधू पाहिजे, वर वय २८, उंची ५.६ इंच, रंग गोरा, नोकरी, संपर्क- ९३५९८०७२३१**

**ब्राह्मण वधू पाहिजे**

**अजिंक्य अविनाश वैद्य**

वय २९, उंची ६.१ भारद्वाज, ऋग्वेदी, गहू, देव, मकर, श्रवण, अंत्य,दुसरे A+,शिक्षण BSC -CHEM सरकारी, पोस्टमन, राहुरी, जिल्हा अहमदनगर, वा. उत्पन्न. ५२५०००/-, अपेक्षा -पदवीधर, सुसंस्कृत, मनमिळाऊ, पत्ता- अविनाश रामचंद्र वैद्य, दत्तनगर, बेलापूर रोड, कोल्हार बु, तालुका-राहाता, अहमदनगर-४१३७१० **मोबाईल व्हाट्सअप -९५५२२७७०९७ कॉन्टॅक्ट ९५११६८०९९८.**

**जाहिरात छोटी किमया मोठी!**



**श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डुबेरे, शाखा- सिन्नर**

**गहाण घेणेच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या गहाण घ्यावयाच्या मिळकतीच्या संबंधाने जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**१) मिळकतीचे वर्णन - अकोले**, ता.अकोले, जि. अ.नगर येथील अकोले नगरपंचायत हद्दीतील **सिटीसर्व्हे नं. १५२४ यांसी क्षेत्र २९.०९ चौ.मी.यापैकी कर्जदार व संमती देणार यांचे मालकीचे क्षेत्र ७.२७ चौ.मी.+ ७.२७ चौ.मी म्हणजेच १४.५४ चौ.मी.तसेच यावर बांधकाम केलेले अकोले नगरपंचायत मालमत्ता क्र. २११ ही आर.सी.सी. पध्दतीचे घर मिळकत ग्राऊंड फ्लोअर २४.५ X ११.९ चौ. फुट वाणिज्य व्यावसायिक २४.५० X ११.९० चौ. फुट म्हणजेच एकुण क्षेत्रफळ २९१.५५ चौ.फुट (२७.०९ चौ.मी.) २) मालमत्ता क्र. २११/१ ही आर.सी.सी. पध्द-तीचे घर पहिला मजला २४.५ X ११.९ चौ. फुट निवासी २४.५० X ११.९० चौ. फुट म्हणजेच एकुण क्षेत्रफळ २९१.५५ चौ.फुट (२७.०९ चौ.मी.) ३) मालमत्ता क्र. २११/२ ही आर.सी.सी. पध्दतीचे घर मिळकत दुसरा मजला २४.५ X ११.९ चौ. फुट निवासी २४.५० X ११.९० चौ. फुट म्हणजेच एकुण क्षेत्रफळ २९१.५५ चौ.फुट (२७.०९ चौ.मी.)** ही संपूर्ण मिळकत यांसी चतुःसिमा - रे. ऑ. रा. प्रमाणे.

**२) कर्जदाराचे नांव :** **श्री. मुकुंद प्रकाश रासने,** रा. अकोले, जि.अ.नगर.
**३) संमतीदाराचे / जमीन मालकाचे नांव-** **श्री. प्रसाद प्रकाश रासने,** रा. अकोले, जि.अ.नगर.
**४) कर्जाचा प्रकार :- जमिन गृहतारण,**
**५) पतसंस्थेचे नांव :- श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डुबेरे, शाखा- सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक,**
**६) नोटीसचा उद्देश :- टायटल व्हेरिफिकेशन**
७) वर कलम २ मध्ये नमूद केलेल्या कर्जदार यांनी वर कलम ५ यांत नमूद पतसंस्थेकडे वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत तारण ठेवून कर्जाची मागणी केलेली आहे. सदर कर्जासाठी वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत या मिळकतीचे मालक (संमती देणार) यांनी पतसंस्थेकडे गहाण देण्याचे मान्य व कबुल केले असून सदर कर्जास उपरोक्त नमूद मिळकत तारण देण्यास मिळकतीचे मालक यांनी संमती दिलेली आहे.
८) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या मालकी, टायटल बाबत अगर मिळकत मालक यांचे मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास तसेच सदरची मिळकत इतर कोणाकडे गहाण, दान, लिन, लिज, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, करार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र व वित्तीय संस्थेचा बोजा, साठेखत, विसारपावती, विकसन करारनामा, जामिनकी, कोर्ट, दावा इ. कारणाने बोजा असल्यास अगर कोणाचाही काही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **(सात)**दिवसाचे आंत आमचे कार्यालयांत तसेच पतसंस्थेचे कार्यालयांत लेखी साक्षांकित पुराव्यासह हरकती नोंदवाव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून कर्ज देणेकामी तारण / गहाण घेतली जाईल व कर्ज वितरण करण्यात येईल. सदर मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा तसेच परस्पर वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी. सदर जाहीर नोटीस कर्जदार यांचे सांगणेवरुन प्रसिध्द करणेकामी पतसंस्थेमार्फत

श्री. प्रदिप लक्ष्मण वारुंगसे (ॲडव्होकेट )
ऑफीस-लहामगे बिल्डींग, सिन्नर न्यायालयासमोर, सिन्नर, जि. नाशिक.

महत्त्वाचे



## कोयता जवळ बाळगणारा युवक ताब्यात; युनिट दोनची कारवाई

**पंचवटी : वार्ताहर**

देवळालीगाव परिसरात कोयता हातात घेऊन दहशत माजविणाऱ्या युवकाला युनिट दोनने ताब्यात घेऊन कारवाई केली. आगामी काळात साजऱ्या होणाऱ्या सणानिमित्त नाशिक शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने वरिष्ठ पोलिस निरीक्षक विद्यासागर श्रीमनवार यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी (दि.१५) सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक विलास गांगुर्डे यांना मिळालेल्या माहितीवरून फैज पठाण धारदार लोखंडी कोयता घेऊन देवळालीगाव स्मशानभूमी गेटच्या समोर येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना कोयत्याचा धाक दाखवून दहशत माजवत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक विद्यासागर श्रीमनवार यांना दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक शंकर काळे, विलास गांगुर्डे, प्रेमचंद्र गांगुर्डे, पोलिस हवालदार वाल्मीक चव्हाण, मनोज परदेशी यांनी सापळा रचून फैज निजामउद्दीन पठाण (२०, रा. देवळालीगाव, राजवाडा) यास ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी नाशिकरोड पोलिस ठाण्याच्या ताब्यात दिले. सदरची कामगिरी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, पोलिस उपायुक्त गुन्हे प्रशांत बच्छाव, सहाय्यक पोलिस आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट दोनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विद्यासागर श्रीमनवार, श्रेणी पोलिस उपनिरीक्षक मुक्तारखान पठाण, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक शंकर काळे, विलास गांगुर्डे, प्रेमचंद गांगुर्डे, हवालदार नंदकुमार नांदुर्डीकर, चंद्रकांत गवळी, प्रकाश महाजन, वाल्मीक चव्हाण, मनोज परदेशी, जितेंद्र वजिरे, प्रवीण वानखेडे यांनी केली आहे.

## सटाणा येथे संत शिरोमणी नरहरी महाराज यांची पुण्यतिथी साजरी



**नाशिक : प्रतिनिधी**

सटाणा येथे संत शिरोमणी नरहरी महाराज यांची पुण्यतिथी शहरात पालखी मिरवणूक काढून साजरी करण्यात आली, त्याप्रसंगी सर्व सुवर्णकार बंधू-भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच बागलाणचे आमदार दिलीप मंगळू बोरसे व सटाणा नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष सुनीलदादा मोरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सटाणा शहरातील इतर मान्यवरही उपस्थित होते. सकाळी सत्यनारायणाची पूजा प्रशांत जाधव व उज्वला जाधव तसेच प्रकाश दंडगव्हाळ व विशाखा दंडगव्हाळ यांच्या हस्ते तर प्रतिमापूजन पोपट वडनेरे व जयश्री वडनेरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अहिर सुवर्णकार अध्यक्ष विलास दंडगव्हाळ यांनी केले. कार्यक्रमात अहिर सुवर्णकार समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा मीनाक्षी सचिन जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यात त्यांनी समाजाच्या कार्याचे कौतुक केले. कार्यात अजून भर पडावी म्हणून कार्यकारी मंडळास सुचविण्यात आले की, उत्तरकार्याच्या वेळी टावेल टोपी देण्याची पध्दत पूर्ण बंद केली पाहिजे आणि कॅश स्वरूपात दुखवटा घेऊन दुखवट्याचा निधी विश्वस्तांकडे जमा करून त्यातून दुःखद घटना घडलेल्या कुटुंबांत किमान एका दिवसाचा अन्नदानाचा खर्च करावा. जेणेकरून आपल्या सटाणा शहरातील सोनार समाजाचा सर्वांनी आदर्श घेतला पाहिजे असे समाजकार्य आपण करून दाखवावे अशी अपेक्षा व्यक्त केली. संत नरहरी महाराजांच्या जीवनावर भाग्यश्री खरोटे, खुशाली बागुल, वैभवी बागुल यांनी मनोगत व्यक्त केले. रुपाली जाधव यांनी कार्यक्रमाचे नियोजन सांगितले. महेंद्र शर्मा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाची सुरवात सत्यनारायण महापूजेने झाली. त्यानंतर रथाची मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी वक्त्या मृणाल कुलकर्णी यांनी संत शिरोमणी नरहरी महाराजांच्या जीवनातील अनुभव कथन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हरिभाऊ वानखेडे, अध्यक्ष विलास बापू दंडगव्हाळ, उपाध्यक्ष भिकाशेठ जाधव, राजेंद्र थोरात, प्रकाश दंडगव्हाळ, यशवंत जाधव, नंदकुमार विसपुते तसेच संपूर्ण संचालक मंडळ, अहिर सुवर्णकार महिला मंडळ यांचे अनमोल सहकार्य लाभले.

# चॉपरने केक कापणे पडले महागात

## शांतीनगर भागातील घटना; बर्थडे बॉयला युनिट एकने केले जेरबंद

**पंचवटी : वार्ताहर**

**मखमलाबाद परिसरातील शांतीनगर भागात दोन ते तीन दिवसांपूर्वी एका युवकाने चॉपरने केक कापून वाढदिवस साजरा करून त्याचा व्हिडिओ व्हायरल केला होता. याबाबत युनिट एकने कारवाई करून चॉपरने केक कापणाऱ्या बर्थडे बॉयला जेरबंद केले.**




याबाबत अधिक माहिती अशी की, दोन ते तीन दिवसांपूर्वी शांतीनगर भागात एकाने चॉपरने केक कापून वाढदिवस साजरा करीत व्हिडिओ व्हायरल केला. याबाबत बर्थडे बॉयचा शोध घेऊन त्यावर कारवाई करण्याबाबत पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी आदेशित केले होते.

त्याअनुषंगाने नाशिक शहरात प्रतिबंधात्मक गस्त करीत असताना पोलिस हवालदार रवींद्र आढाव यांना मिळालेल्या माहितीवरून चॉपरने केक कापणारा इसम हा शांतीनगर परिसरात कमरेला चॉपर लावून दहशत निर्माण करीत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार सदरची माहिती युनिट एकचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर कड यांना देऊन त्यांनी पोलिस उपनिरीक्षक चेतन श्रीवंत, पोलिस हवालदार रवींद्र श्यामराव आढाव, महेश साळुंके, पोलिस अंमलदार विलास चारोस्कर, नितीन जगताप, मुक्तार शेख यांचे पथक तयार करून त्यांना मार्गदर्शन करून रवाना केले. पथकाला मिळालेल्या माहितीवरून शनिवारी (दि.१५) रोजी सायंकाळी ६.५० वाजेच्या सुमारास संशयित गजानन गणेश शेळके (२०) रा. मानकर मळा, नंदी रा हाउस, मखमलाबाद रोड, नाशिक, मूळ राहणार मु.पो. हलविरा, ता. जिंतूर, जि. परभणी हा धारदार स्टीलचे चॉपर घेऊन शांतीनगर परीसरात एकदंत गणपती मंदिराजवळील गार्डन येथे फिरून दहशत निर्माण करून फिरत असल्याने त्याला ताब्यात घेऊन त्याच्या ताब्यातून ५०० रुपये किमतीचा स्टीलचा धारदार चॉपर ताब्यात घेऊन कारवाई केली. संशयित गजानन शेळके याच्याविरुद्ध सरकारतर्फे पोलिस हवालदार रवींद्र आढाव यांनी फिर्याद देऊन भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ व महा.पो.का. कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.सदरची कामगिरी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, पोलिस उपायुक्त गुन्हे प्रशांत बच्छाव, सहाय्यक पोलिस आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर कड, पोलिस उपनिरीक्षक चेतन श्रीवंत, हवालदार रवींद्र आढाव, महेश साळुंके, योगीराज गायकवाड, रोहिदास लिलके, अंमलदार नितीन जगताप, विलास चारोस्कर, मुक्तार शेख, चालक पोलिस हवालदार सुकाम पवार यांनी केली आहे.



## छावा चित्रपट टॅक्स फ्री करण्याचे उपमुख्यमंत्र्यांना साकडे

**नाशिक : प्रतिनिधी**

**स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची शौर्यगाथा उलगडणारा छावा चित्रपट टॅक्स फ्री करा, अशी मागणी सुविचार मंचचे संयोजक आकाश पगार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.**

नाशिक दौऱ्यावर आलेले राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांची आकाश पगार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने भेट घेऊन वरील मागणीचे निवेदन दिले. ना. अजित पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन यावेळी बोलताना दिले.

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची शौर्यगाथा उलगडणार आणि जीवनचरित्रावर आधारित 'छावा' हा चित्रपट गेल्या शुक्रवारी दि.१४ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित झाला आहे.

या चित्रपटाला युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज आणि सिनेचाहत्यांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. चित्रपट पाहिल्यानंतर सिनेमागृहाबाहेर येणारे प्रेक्षक डोळ्यातून अश्रू ढाळत असल्याचेही दिसून आले. अंगावर शहारे आणणारे प्रसंग आणि तितकेच दमदार डायलॉग हे शिवभक्तांचे रक्त सळसळ करणारे आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज हे महाराष्ट्राचं आराध्य दैवत आहेत. महाराष्ट्र भूमीत जन्मलेला या दोन्ही महाराजांनी अखंड हिंदुस्थानचा इतिहास रचला आहे. छत्रपती संभाजी महाराज यांचा जीवनपट सर्वसामान्य जनतेला मोठ्या पडद्यावर अनुभवता यावा यासाठी हा चित्रपट टॅक्समुक्त करावा, अशी मागणी आकाश पगार यांनी केली आहे. यापूर्वीदेखील महाराष्ट्रात अनेकदा इतिहास तसेच महापुरुषांच्या जीवनसंघर्षावर आधारित चित्रपट टॅक्स फ्री केलेले आहेत. यापूर्वी नरवीर तानाजी मालुसरे यांच्या जीवनावर आधारित तान्हाजी - द अनसंग वॉरिअर चित्रपट, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील 'सत्यशोधक' चित्रपट, मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांच्या जीवनावर आधारित सचिन - अ बिलियन ड्रिम्स हा चित्रपट, एअर हॉस्टेस नीरजा यांच्या धाडसाची कहाणी असलेला 'नीरजा' हा चित्रपट, महिला बॉक्सर मेरी कोम यांच्या जीवनावरील मेरी कोम चित्रपट, दिवंगत अभिनेता इरफान खान यांचा हिंदी मीडियम आदी चित्रपटांना महाराष्ट्रात टॅक्स फ्री करण्यात आल्याकडे देखील यावेळी लक्ष वेधण्यात आले. स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनसंघर्षावर आधारित असणारा छावा चित्रपट टॅक्स फ्री करावा, अशी मागणी उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्याकडे केली आहे. यावेळी शिष्टमंडळात आकाश पगार, विशाल गांगुर्डे, सुजित सोनवणे, संकेल निमसे आदी उपस्थित होते.

# देशी बनावटीचा कट्टा बाळगणारा जेरबंद

**पंचवटी : वार्ताहर**

**देशी बनावटीचा कट्टा बाळगणाऱ्या एका संशयितास ताब्यात घेण्यात पंचवटी गुन्हे शोध पथकास यश मिळाले आहे. या संशयिताकडून पंचवीस हजार रुपये किमतींचे (माऊझर) कट्टा हस्तगत करण्यात आला आहे. याप्रकरणी पंचवटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सहायक पोलिस निरीक्षक विलास पडोळकर करीत आहेत. ऋषिकेश गणेश पारसे (२२, रा. गल्ली नं.४, कुमावतनगर, पंचवटी, नाशिक) असे ताब्यात घेतलेल्या संशयिताचे नाव आहे.**

पंचवटी गुन्हे शोध पथकाची कामगिरी



नाशिक शहरातील वाढती गुन्हेगारी बघता पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी गावठी कट्टे बाळगून दहशत पसरविणाऱ्या संशयिताचा शोध घेऊन कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते. त्या अनुषंगाने परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, पंचवटी विभागाच्या सहायक पोलिस आयुक्त पद्मजा बढे यांनी सूचना केल्या होत्या. त्यानुसार पंचवटी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांनी गुन्हे शोध पथकाचे सहा पोलीस निरीक्षक विलास पडोळकर व पथक यांना पंचवटी पोलीस ठाणे तसेच पोलीस आयुक्तालयातील गावठी कट्टे बाळगणाऱ्याचा शोध घेण्याबाबत सांगितले. शुक्रवार (ता.१४) रोजी पंचवटी गुन्हे शोध पथक हद्दीत गस्त घालत असताना त्यांना मिळालेल्या माहितीवरून, एक संशयित वज्रेश्वरी झोपडपट्टी जवळ, पाट किनारी देशी बनावटीचे कट्टा घेऊन येणार असल्याचे समजले. त्यानुसार सापळा रचून संशयित ऋषिकेश गणेश पारसे, (वय २२, रा. गल्ली नं.४, कुमावतनगर, पंचवटी, नाशिक) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून पंचवीस हजार रुपये किमतीचे देशी बनावटीचा (माउजर) कट्टा हस्तगत करण्यात आला. सदरची कामगिरी पंचवटी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर कड, पोलिस निरीक्षक (गुन्हे) ज्योती आमने यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेशोध पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक विलास पडोळकर, सहायक पोलिस उपनिरीक्षक संपत जाधव, पोलिस हवालदार महेश नांदुडीकर, पोलिस अंमलदार युवराज गायकवाड, कुणाल पचलोरे, महिला पोलिस अंमलदार रोहिणी भोईर यांनी केली आहे.

## सिन्नरला शिवजन्मोत्सव समितीतर्फे विविध कार्यक्रम

**सिन्नर : प्रतिनिधी**

**छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने भव्य मिरवणुकीसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष विठ्ठलराजे उगले यांनी दिली.**

मंगळवारी (दि. १८) रात्री १० ते १२ या वेळेत फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांच्या गजरात महाराष्ट्रातील हिंदकेसरी चेतक या नाचणाऱ्या घोड्यांच्या दिमाखात छत्रपती शिवाजी महाराजांचा आगमन सोहळा होईल. बुधवारी (दि. १९) सकाळी ८.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून, छत्रपती संभाजी महाराज चौक (आडवा फाटा) येथून मिरवणुकीस प्रारंभ होईल. बसस्थानकावरील महात्मा फुले पुतळ्यास अभिवादन करून नेहरू चौक, भैरवनाथ मंदिर, नाशिकवेस, लालचौक, शिंपीगल्ली, गणेशपेठ मार्गे मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहचेल. तेथे छत्रपती शिवरायांना अभिवादन करून पुढे वावीवेस येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात येईल व मार्केट कमिटीजवळ मिरवणुकीची सांगता होईल.

या मिरवणुकीत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी, पारंपरिक वेशभूषामध्ये अश्वारूढ मावळे, नाचणारे घोडे, चित्ररथ, महापुरुषांची वेशभूषा, मर्दानी खेळ, आदिवासी पथक, पारंपरिक वाद्य, लेझीम पथक, झेंडा पथक, मलखांब प्रात्याक्षिके, लाठ्या-काठ्या, शिवकालीन देखावे यांचा सहभाग असणार आहे. उत्कृष्ट संघ, चित्ररथास पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. मिरणुकीत सहभागी व्हावे तसेच प्रत्येकाने आपल्या घरावर भगवा ध्वज उभारून, घरात शिवरायांच्या प्रतिमेची पूजा करून अभिवादन करावे, असे आवाहन शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# आजी- आजोबा म्हणजे संस्कारांची शिदोरी

## अश्विननगर येथील स्ट्रॉबेरी शाळेत आजी-आजोबा दिवस उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**

**अश्विननगर येथील स्ट्रॉबेरी शाळेत आजी-आजोबा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेच्या वतीने आजी -आजोबांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आजी-आजोबांविषयी मनोगत व्यक्त केले.**




तसेच आजी-आजोबांचे औक्षण व पाद्यपूजन आणि दर्शन घेतले. त्यानंतर वेगवेगळ्या खेळांचे आयोजन करून आजी-आजोबांनी मनमुराद आनंद लुटला. औक्षण व पाद्यपूजन करताना काहींना गहिवरून आले. मनोगत व्यक्त करताना आम्ही आमच्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा मिळाल्याचे सांगितले. शाळेतील अनुभव व आजी-आजोबांचे अनुभव त्यांच्या हितगूजमधून मिळणारी माहिती, पाल्यांच्या जडणघडणीसाठी पोषक ठरतात. त्यामुळे शाळांमध्ये विविध उपक्रमांच्या माध्यमातून आजी-आजोबांना शाळेत आमंत्रित करून मुलांशी संवाद, खेळ व गप्पागोष्टी, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून ओळख व्हावी, यासाठी आजी-आजोबा दिवस शाळेत साजरा केला जातो, असे स्ट्रॉबेरी स्कूलच्या संचालिका सायली काळे यांनी यावेळी सांगितले. यावेळी मुख्याध्यापिका प्रिया नाकट, लीना पगारे, चंदा बहुल, आईशा शेख, सोनल जाधव, योगिता धर्माधिकारी, प्रतिभा गोडसे, प्रज्ञा ब्रम्हे या शिक्षकांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

## जनता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा जिल्हा स्काऊट-गाइड मेळाव्यात सहभाग

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**मराठा विद्या प्रसारक समाज संचलित जनता विद्यालय पवननगरच्या विद्यार्थ्यांनी नाशिक जिल्हा भारत स्काऊट- गाइड कार्यालयाच्या वतीने दिनांक ६ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी दरम्यान काकासाहेबनगर, रानवड, तालुका निफाड येथे पार पडलेल्या स्काऊट-गाइड जिल्हा मेळाव्यात यशस्वी सहभाग घेतला.**




विद्यार्थ्यांना दैनिक कामाची सवय लागणे, शिस्त लागणे, वेळेचे नियोजन समजणे, त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी या मेळाव्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम, शारीरिक कसरत स्पर्धा, विस्तीर्ण खेळ, पायोनियरिंग प्रोजेक्ट, शोभायात्रा, तंबू सजावट, फूड प्लाझा व शेकोटी कार्यक्रम अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांमध्ये जनता विद्यालय पवननगरचे एकूण आठ स्काऊट व आठ गाइड असे सोळा विद्यार्थी सहभागी झाले होते. या सहभागी विद्यार्थ्यांपैकी स्काऊटच्या मुलांनी उत्कृष्ट सूर्यनमस्कार करून शारीरिक कसरत स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला तसेच फूड प्लाझा या स्पर्धेत उत्कृष्ट आणि चविष्ट कांदा भजी पाणी न वापरता चुलीवर बनवली व तृतीय क्रमांकाचे बक्षीस पटकावले. गाइडच्या विद्यार्थिनींनी शारीरिक कसरत स्पर्धेत योगासनाचे सादरीकरण करून द्वितीय क्रमांक पटकावला. या विद्यार्थ्यांना विद्यालयातील स्काऊट व गाइड शिक्षिका संजीवनी मुरकुटे, अंजली पेखळे, प्रवीण शिंदे तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक अण्णासाहेब ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापक अण्णासाहेब ठाकरे यांनी प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन सत्कार केला. तसेच नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या मविप्र चित्रकला स्पर्धेत दीप्ती बोरसे हिला प्रथम क्रमांक मिळाला. तिला सतीश टिळे व प्रवीण शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

## सिडको सुवर्णकार समाज संस्थेतर्फे संत नरहरी महाराज पुण्यतिथी सोहळा

**सिडको : वि. प्रतिनिधी**

**सुवर्णकार समाज संस्थेच्या वतीने सुवर्णकार समाजाचे आराध्यदैवत संत शिरोमणी नरहरी महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा पवननगर येथील सुवर्णकार भवन, सिडको येथे मोठ्या भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी सुवर्णकार समाजाच्या वतीने संत नरहरी महाराज यांना अभिवादन करण्यात आले.**




या पुण्यतीथी सोहळ्याप्रसंगी सुवर्णकार समाजात गौरवपूर्ण कामगिरी करणारे मध्य प्रदेश येथील संजय ऑप्टिकलचे संचालक दीपक अधिकार, भारतीय आयुर्विमा महामंडळ, छ. संभाजीनगर येथील प्रशासन अधिकारी संजय देवरे, आकर्षण एन्टरप्राइजेस अंबडचे संचालक प्रवीण मोरे, पिंपळगाव बसवंतचे पोलिस उपनिरीक्षक संतोष चव्हाण, छत्रपती संभाजीनगर येथील उमेश दाभाडे, अहवा (डांग) गुजरात येथील अंबिका ज्वेलर्सच्या संचालिका नंदा सोनवणे, सीनिअर होमिओपॅथिक फिजिशियन, पुणे येथील डॉ. प्रवीणकुमार थोरात, लक्ष्मी बिल्डर्सच्या संचालिका रोहिणी जाधव आदी उपस्थित होते. यात धीरज सोनवणे यांना समाजभूषण म्हणून गौरवण्यात आले. विविध संस्थेचे प्रमुख व अध्यक्ष यांना गौरवण्यात आले. या कार्यक्रमाला सुवर्णकार समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सुवर्णकार समाज संस्थेचे अध्यक्ष सुमंत आहिरराव, रमेश वडनेरे, दिलीपराज सोनार, सुमंत अहिराराव, धीरज सोनवणे, नितीन विसपुते, बाळकृष्ण थोरात, जगदीश दुसाने, संतोष लक्ष्मण दुसाने, राजश्री दुसाने, पद्माकर विसपुते, सुनील चव्हाण, संदीप सोनवणे, श्याम घोडके, नारायण दुसाने, शशिकांत मोरे अशोक दुसाने, नीलेश सराफ, अमोल खरोटे, अभिजित खरोटे, धनंजय जाधव, सुभाष दाभाडे, किशोर घोडके, सागर थोरात आदींसह सिडको सुवर्णकार समाज संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह सुवर्णकार समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### दिंडोरी लोकसभा नाशिक जिल्हाध्यक्षपदी वाघ यांची निवड



**लासलगाव : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य नाभिक महामंडळाच्या दिंडोरी लोकसभा नाशिक जिल्हाध्यक्षपदी अनिल वाघ यांची निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष सयाजीराव झुंजार यांच्या प्रमुख उपस्थितीत लासलगाव येथे झालेल्या समाजबांधवांच्या मेळाव्यात नियुक्तीपत्र देऊन ही निवड करण्यात आली आहे. या मेळाव्यासाठी माजी प्रदेशाध्यक्ष दत्तात्रय अनारसे, जिल्हाध्यक्ष सुरेश सूर्यवंशी, संजय गायकवाड, अरुण सैंदाणे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या निवडीनंतर दिंडोरी लोकसभेमध्ये समाज संघटन करण्यासाठी संपूर्ण मतदारसंघात घरोघरी जाऊन समाजबांधवांना संघटनेमध्ये आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे वाघ यांनी सांगितले. या निवडीचे श्री संत सेनाचा रिटेबल ट्रस्ट अध्यक्ष अरविंद देसाई, विश्वस्त राजाभाऊ जाधव, अशोक जगताप, मनोहर वाघ, गुलाबराव सुर्वे, नंदू जाधव, नितीन वाघ व पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले.

### शिवसेना महिला आघाडीतर्फे तात्या टोपे यांची जयंती साजरी



**येवला : प्रतिनिधी**

येथिल शिवसेना महीला आघाडीच्या ( शिंदे गट) वतीने सेनापती तात्या टोपे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी तात्या टोपे यांच्या पुतळ्याला शिवसेना उपतालुकाप्रमुख गणेश सोनवणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला तसेच ज्येष्ठ नेते किशोर सोनवणे, शिवसेना महिला आघाडीच्या येवला शहरप्रमुख सुनीता लहरे यांच्या हस्ते तात्या टोपे यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना महिला आघाडीच्या शहरप्रमुख सुनीता लहरे, विधानसभाप्रमुख किशोर सोनवणे, उपतालुकाप्रमुख गणेश सोनवणे, शहरप्रमुख अतुल घटे, उपतालुकाप्रमुख अर्चना शिंदे, उपशहरप्रमुख बबिता कोल्हे, युवती सेनाप्रमुख पूनम वडे, विद्या ताबे, पायल चव्हाण, अनिल हलवाई, बाजीराव सस्कर आदींसह असंख्य शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार सुनीता लहरे यांनी मानले.

### कसबे-सुकेणे येथे एक गाव-एक शिवजयंतीचे आयोजन

**कसबे-सुकेणे : प्रतिनिधी**

येत्या १९ फेब्रुवारी रोजी कसबे सुकेणे (ता. निफाड) येथे एक गाव-एक शिवजयंती अंतर्गत ३९५ व्या शिवजयंतीचे आयोजन करण्यात आले असून, शिवजयंती सोहळ्यासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, संपूर्ण गावच अध्यक्ष बनले असल्याने तरुणांचा उत्साह ओसंडून वाहत आहे. कसबे-सुकेणे शहर पूर्ण भगवेमय झाले असून, स्टॅण्ड परिसरात शिवजयंती सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. बस स्टॅण्डच्या चारही बाजूला भव्य कमानी उभारण्यात आल्या असून, या कमानींना छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज, छत्रपती शहाजी महाराज, राजमाता जिजाऊ यांचे नाव देण्यात आले असून, या सोहळ्याच्या धर्तीवर स्टॅण्ड परिसरात भव्य शिवसृष्टी उभारण्यात आली असून, सकाळी नऊ वाजता भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण कसबे-सुकेणे शहरात भगवे ध्वज, पताका, भव्य विद्युत रोषणाई करण्यात आली असून, युवकांची या कामासाठी वेगवेगळी पथके नेमण्यात आली आहे. मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक घरासमोर रांगोळी व सडामार्जन करण्यात येणार असून, ठिकठिकाणी सुहासिनींकडून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे व प्रति शिवाजी महाराज, संभाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या पूजनाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी साडेसहा वाजता प्रसिद्ध समाजप्रबोधनकार व शिवव्याख्याते संग्राम महाराज भंडारे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असून, यावेळी भव्य शोचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या मनोगताचे आयोजनही करण्यात आले आहे. हा सोहळा उत्साहात साजरा करण्यासाठी सर्व समाजबांधवांनी भगवे वस्त्र व महिला भगिनींनी भगवी साडी परिधान करून शिवजयंती सोहळ्यास उपस्थिती लावावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## निधन वार्ता

### तुकाराम आहेर



**सोग्रस : वार्ताहर**

तुकाराम गोविंद आहेर (रा. वडाळीभोई) यांचे निधन झाले. प्रगतिशील शेतकरी किशोर आहेर, सागर आहेर, शीतल ढिकले यांचे ते वडील आणि रंजनाबाई आहेर यांचे ते पती होत.

### मुलकनबाई आहिरे

**देवळा : प्रतिनिधी**



तालुक्यातील देवपूरपाडे येथील रहिवासी मुलकनबाई ताराचंद आहिरे (७१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडं असा परिवार आहे. येथील प्रगतिशील शेतकरी केदा ताराचंद आहिरे व प्रशांत आहिरे यांच्या त्या मातोश्री होत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे ना. आठवलेंच्या हस्ते अनावरण

## इगतपुरी येथे लवकरच साकारणार विधी महाविद्यालय

**इगतपुरी : प्रतिनिधी**

**राजकीय गटबाजी बाजूला ठेवून कोणाचेही मतभेद न करता सामाजिक कार्यात एकजूट असलेल्या इगतपुरीत नगर परिषदेने तीन एकर भूखंड लॉ कॉलेजसाठी दिला असून, लवकरच कॉलेजच्या इमारतीचे काम सुरू करणार असल्याचे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी केले.**



इगतपुरी नगर परिषद व विश्वभूषण स्मारक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात उभारण्यात आलेल्या विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती भव्य पुतळ्याचे अनावरण केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले व महाराष्ट्र राज्य सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते करण्यात आले, त्याप्रसंगी ना. आठवले बोलत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन १६ जानेवारी १९३७ साली ऐतिहासिक सभा झालेल्या ठिकाणी डॉ. आंबेडकरांचा अर्धकृती पुतळा काढून पूर्णाकृती पुतळा नगरपरिषद व विश्वभूषण स्मारक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आला. सामाजिक प्रेरणा आणि ज्ञान प्रबोधन ठरणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे अनावरण व स्वागत कार्यक्रम दि. १५ फेब्रुवारी रोजी करण्यात आला.

या ऐतिहासिक पर्वाच्या कार्यक्रमाला खासदार राजाभाऊ वाजे, द. पीपल्स रिपाइंचे अध्यक्ष जोगेंद्र कवाडे, आमदार हिरामण खोसकर, खासदार चंद्रकांत हंडोरे, रिपाइंचे जिल्हाध्यक्ष प्रकाश लोंढे यांच्यासह राज्य व जिल्ह्यातील सर्व राजकीय सामाजिक पक्षांच्या अधिकाऱ्यांसह पदाधिकारी यांनी उपस्थिती दर्शवित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतींना उजाळा दिला. यावेळी समाजकल्याणमंत्री संजय शिरसाठ यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक सभेच्या स्मृतींना उजाळा दिला. तसेच इगतपुरी शहरातील येथील वसतिगृहाचा आणि सामाजिक विकासाला चालना देणार असून, राज्यात पंचवीस हजार विद्यार्थी शिक्षण घेतील अशा वसतिगृहाची इमारत उभारणार असल्याची ग्वाही दिली. याप्रसंगी नगरपरिषद व पुतळा समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष संजय इंदुलकर, पुतळा समितीचे अध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष नईम खान, समितीच्या उपाध्यक्षा तथा माजी नगरसेविका सीमा जाधव, सचिव तथा माजी नगरसेवक सुनील रोकडे, कोषाध्यक्ष तथा माजी नगरसेवक उमेश कस्तुरे, सदस्य तथा माजी नगरसेवक युवराज भोंडवे, सदस्य तथा अखिल भारतीय आदिवासी सेनेचे संस्थापक अध्यक्ष दि. ना. उघाडे, प्रभारी मुख्याधिकारी सुवर्णा दखणे, न.पा.चे रमेश राठोड, तत्कालीन मुख्याधिकारी पंकज गोसावी, आरोग्याधिकारी यशवंत ताठे, सुगत बुद्धविहार कमिटीचे अध्यक्ष भास्कर बर्वे, राजेंद्र जाधव, राजेंद्र नेटावटे, निमंत्रित सदस्य अजय जगताप, वैशाली पालवे, दिनकर पवार, आर. के. भडांगे, जीवन भडांगे, मनोज मोरे, जितू दोंदे आदींनी परिश्रम घेतले.



### स्वराधिराज संगीत महोत्सवात स्वराभिषेक

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**राग धन कोणी कल्याण... या विलंबित एक तालातील सर सूर गावो या बंदशीने पंडित शौनक अभिषेकींच्या दमदार गायकीने झाली.**

कलाश्री संगीत गुरुकुल व माजी नगरसेविका डॉ. दीपाली कुलकर्णी यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित करण्यात आलेल्या स्वराधिराज संगीत महोत्सवात अभिर गुलाल उधळीत रंग..., संतांच्या गावी, गुंतताता हे हृदयात, हे सुरांनो चंद्र व्हा आदी पं. शौनक यांचे सूर याने शनिवारची संध्याकाळ सांगीतिक मेजवानी देऊन गेली. हरिप्रसाद चौरसिया यांच्या शिष्या वैष्णवी जोशी यांचे बासरीवादन आणि पं. जितेंद्र अभिषेकी यांचे शिष्य शौनक अभिषेकी यांचे दमदार गायन यांनी स्वराधिराज संगीत महोत्सवाची इंदिरानगर येथे सांगता झाली.

भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी येथील कलाश्री संगीत गुरुकुल व माजी नगरसेविका डॉ. कुलकर्णी यांच्या वतीने स्वराधिराज संगीत महोत्सवाचे दोनदिवसीय आयोजनाचा शुभारंभ माजी महापौर सतीश कुलकर्णी यांच्या हस्ते व माजी सभागृहनेते चंद्रकांत खोडे, सतीश सोनवणे, श्याम बडोदे, अजिंक्य साने, यशवंत निकुळे यांच्या उपस्थितीत झाला. महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात पं. हरिप्रसाद चौरसिया यांच्या शिष्या वैष्णवी जोशी यांच्या सुमधुर बासरीवादनाने झाली. त्यांनी राग यमनने सुरुवात केली. यमनमध्ये आलाप, जोड, विलंबित झपतालातील गत आणि द्रुत तीनतालात जलद गतीमध्ये झाला असे सुमधुर सादरीकरण केले. त्याच्या वादनाने भूतलावर साक्षात सरस्वती अवतरल्याचा भास उपस्थित रसिक श्रोत्यांना झाला. रसिकांनी प्रत्येक सादरीकरणाला टाळ्या वाजवून उत्स्फूर्त दाद दिली. साथसंगत तबल्यावर सुजित काळे यांनी केली. यानंतर कलाश्रीतर्फे दरवर्षी दिल्या जाणाऱ्या कलाश्री कलासाधक पुरस्कार वैष्णवी जोशी यांना ज्येष्ठ गायक पं. शौनक अभिषेकी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यानंतर महोत्सवाचा समारोप पं. जितेंद्र अभिषेकी यांचे शिष्य आणि सुपुत्र पं. शौनक अभिषेकी यांच्या गायनाने झाला. त्यांना तबल्यावर नितीन वारे, संवादिनीवर ईश्वरी दसककर तसेच तानपुऱ्यावर अभेद अभिषेकी यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाचे निवेदन स्नेहा रत्नपारखी यांनी केले. प्रास्ताविक कलाश्रीचे संचालक आणि गायक डॉ. आशिष रानडे यांनी केले.

### येवला शिवसृष्टीत संगीतमय महानाट्य शिवशौर्य गाथा

**येवला : प्रतिनिधी**

**छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीच्या निमित्ताने येवला शिवसृष्टी येथे बुधवार दि.१९ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता शिवशौर्य गाथा हे संगीतमय महानाट्य व त्यानंतर भव्य फायर शोचे आयोजन करण्यात आले आहे.**

या सोहळ्यास राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे. मराठी चित्रपट मालिकेतील कलावंत या संगीतमय महानाट्यातून छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवशौर्य गाथा उलगडणार आहे. या सोहळ्यास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार पंकज भुजबळ यांनी केले आहे.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या संकल्पनेतून येवला शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याच्या संकल्पनेवर आधारित भव्यदिव्य शिवसृष्टी प्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण करण्यात आले असून, दुसऱ्या टप्प्याचे काम पूर्णत्वाकडे आहे. या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनाधिष्ठित भव्यदिव्य पुतळा बसविण्यात आला आहे. या ठिकाणी माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्याकडून शिवजयंतीचे औचित्य साधत संगीतमय महानाट्य शिवशौर्य गाथा व त्यानंतर भव्य फायर शोचे आयोजन करण्यात आले आहे. या महानाट्याचे सादरीकरण प्रकाश भागवत यांच्या दिग्दर्शनाखाली होणार असून, यासाठी मराठी चित्रपट मालिकेतील नामवंत मराठी कलाकार पंढरीनाथ कांबळे, संदीप गायकवाड, अजय तपकिरे, चेतना भट, विश्वजित फड़के, राधा सागर, मयूरा पलांडे, गौरी देशपांडे, रवी कुलकर्णी, भैरव मिस्त्री आदी कलाकार सादरीकरण करणार आहे.

अतिशय भव्यदिव्य संगीतमय महानाट्यातून महाराष्ट्राचे आराध्य दैवत युगप्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवशौर्य गाथा उलगडली जाणार आहे. तसेच कार्यक्रमाच्या शेवटी नेत्रदीपक फायर शो होणार आहे. या जयंती सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर माजी खासदार समीर भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली येवला शिवसृष्टीत जय्यत तयारी करण्यात येत असून, परिसरात विद्युत रोषणाई व विशेष सजावट करण्यात येत आहे. या सोहळ्यातून नागरिकांना छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवसृष्टी अनुभवता येणार आहे.

### श्रीक्षेत्र करंजगाव येथे २० पासून अखंड हरिनाम सप्ताह

**कसबे-सुकेणे : प्रतिनिधी**

निफाड तालुक्यातील श्रीक्षेत्र करंजगाव येथे महाशिवरात्रीच्या विशेष पर्व कालावर गुरुवार दिनांक २० फेब्रुवारी ते गुरुवार दिनांक २७ फेब्रुवारीपर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीक्षेत्र करंजगाव येथील गोदावरी तीरी असलेल्या श्री तीर्थक्षेत्र सिद्धेश्वर महादेव मंदिरात महंत विठ्ठल नाथजी महाराज व हभप गोविंद महाराज लोणजाई यांच्या प्रेरणेने व गुलाब महाराज खालकर (आर्वी) यांच्या कुशल मार्गदर्शनाने व समस्त ग्रामस्थांच्या सहकार्याने आयोजित या अखंड हरिनाम सप्ताहात माधव महाराज चव्हाण बेरवाडी, प्रसाद महाराज शेळके लासलगाव, ऋषिकेश महाराज कुयटे धानोरे, सौरभ महाराज जाधव कुंडाणेकर, योगेश महाराज जाधव कान्हेरवाडी, निवृत्ती महाराज रायते खडकमाळेगाव, गोरक्षनाथ महाराज जाधव शहाकारवाडी, साहेबराव महाराज मुरकुटे श्रीक्षेत्र आळंदी, ज्ञानेश्वर महाराज शिंदे रुई आश्रम यांची कीर्तने होणार आहेत. हरिनाम सप्ताहातील कीर्तने रात्री नऊ ते अकरा या वेळेत होणार आहेत.



लासलगाव : नॅशनल उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये आयोजित इयत्ता बारावी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर. (छाया : समीर पठाण)

### आवडत्या क्षेत्रात भरारी घेण्यासाठी परिश्रम आवश्यक : सुपनर

**लासलगाव : वार्ताहर**

**ज्या क्षेत्रात करिअर करण्याची आवड आहे, ते ठरवून विद्यार्थ्यांनी अभ्यासाची तयारी केल्यास यशाचा मार्ग सोपा होतो. उंच भरारी मिळविण्यासाठी कठोर परिश्रमाशिवाय दुसरा पर्याय नाही, असे प्रतिपादन लासलगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक पवन सुपनर यांनी केले.**

येथील नॅशनल उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये आयोजित इयत्ता बारावी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच योगिता पाटील होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी व्ही. एन. गायकवाड, उपसरपंच रामनाथ शेजवळ, थेटाळे येथील सरपंच शीतल शिंदे, योगेश पाटील उपस्थित होते.

शिक्षणातून कौशल्य मिळाले नाही तर शिक्षण व्यर्थ ठरते. उच्च प्रतीचे यश मिळविण्यासाठी ध्येय, चिकाटी, संयमाबरोबर कठोर परिश्रम आवश्यक आहे, असे निफाड पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी व्ही. एन. गायकवाड यांनी सांगितले.

याप्रसंगी सरपंच योगिता पाटील, उपसरपंच रामनाथ शेजवळ, सरपंच शीतल शिंदे यांच्यासह इयत्ता बारावी व दहावीतील विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, क्रीडा स्पर्धा तसेच विविध स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांसह बारावी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन परीक्षेला शुभेच्छा देण्यात आल्या. निफाड येथील कु. रेश्मा नवाब शेख हिची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल पोलीस उपनिरीक्षक पवन सुपनर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष हारून शेख यांनी शाळेच्या कार्याचा आढावा सादर केला. मुख्याध्यापिका सलमान मन्सुरी यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन श्रीमती अकिला खान व सय्यदा बानो यांनी केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष हरून शेख, सचिव हसीना शेख, सदस्य हाजी इसाक शहा, अकील इनामदार, उस्मान शेख, हव्वाबी शेख, हाफिज तौफिक, मौलाना मंजूर मिल्ली, अय्युबभाई पठाण, शकील पठाण,समीर शेख, सिकंदर कादरी, रिझवान शेख, अल्ताफ मणियार, इम्रान मन्सूरी, जमील शेख, रफिक शेख,सोनू शेख, असिफ मुलाणी, बबलू शेख, शफीक शेख, ख्वाजा शेख,हारून बेग, आयाज शेख, रफिक अत्तार आदी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी सभासद नोंदणीत सर्वांना घ्या : आ. दिलीप बनकर

### निफाड तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या सभासद नोंदणीस प्रारंभ

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आदेशान्वये व पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार व जिल्हाध्याक्ष रवींद्र पगार यांच्या मार्गदर्शनानुसार निफाड तालुक्यात पक्षाच्या सभासद नोंदणीस प्रारंभ करण्यात आला आहे.**





राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून तालुक्यात ''स्वराज सप्ताह'' निमित्त सर्वत्र शिवजयंती उत्सवासह विविध कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात आला. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या निमित्ताने कार्यकर्त्यांनी सजग राहावे. तालुक्यात जास्तीत जास्त सर्व स्तरावरील कार्यकर्त्यांना सभासद नोंदणीत प्राधान्य द्यावे, अशा पद्धतीचे निर्णय घेण्यात आले. तसेच गुलाब टकले व मधुकर शेलार यांनी तयार केलेली काव्यात्मक प्रतिमा आ. दिलीप बनकर यांना भेट देण्यात आली.

या सभासद नोंदणीच्या प्रवाहात तरुणांसह सर्व स्तरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना व हितचिंतकांना सामील करून घ्या, असे आवाहन आमदार दिलीपराव बनकर यांनी केले. ते निफाड मार्केट कमिटी हॉलमध्ये झालेल्या निफाड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत बोलत होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार यांच्या आदेशान्वये व पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार व जिल्हाध्यक्ष रवींद्र पगार व आमदार दिलीपराव बनकर यांच्या मार्गदर्शनानुसार निफाड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व सेलच्या पदाधिकाऱ्यांची अत्यंत महत्त्वाची बैठक निफाड मार्केट कमिटी हॉलमध्ये काल सकाळी १० वाजता बोलाविण्यात आली होती.

यावेळी व्यासपीठावर आमदार दिलीपराव बनकर, जिल्हाध्यक्ष रवींद्र पगार, पक्षाचे सामाजिक न्याय विभागाचे यशवंत शिरसाठ, दूध संघाचे माजी चेअरमन शिवाजीराजे ढेपले, तालुकाध्यक्ष राजेंद्र डोखळे, महिला प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसच्या अश्विनीताई मोगल, महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष सुनीताताई राजोळे हे उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक सेलचे तालुकाध्यक्ष नवाज काझी यांचे अल्पशा आजाराने निधन झाल्याने त्यांना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तालुकाध्यक्ष राजेंद्र डोखळे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले. यशवंत शिरसाठ यांनी सभासद नोंदणीविषयी माहिती दिली. जिल्हाध्यक्ष रवींद्र पगार यांनी जिल्ह्यातील सभासद नोंदणीची माहिती देऊन सभासद नोंदणीमध्ये निफाड तालुक्याचा अग्रक्रम राहील, अशी आशा व्यक्त करून विधानसभा निवडणुकीनंतर आपण प्रथमच एकत्र येत असून, अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात आपले सात आमदार निवडून आल्याने पक्षाच्या सर्व हितचिंतकांनी अगदी मनापासून काम केल्याने अभिनंदन करण्यात आले. व्यासपीठावरील पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांना यावेळी सभासदत्व देण्यात आले. बैठकीचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शहराध्यक्ष तन्वीर राजे यांनी केले. बैठकीस रामभाऊ माळोदे, सुरेश खोडे, सिद्धार्थ वनारसे, राजेंद्र बोरगुडे, सुरेश कमानकर, भूषण धनवटे, महेश पठाडे, राजेंद्र शिंदे, शिवाजी बोरगुडे, माधव सुरवाडे, विठोबाराजे फडे, दिलीप कापसे, महेश कुटे, गुलाबराव टकले, मधुकर शेलार, जीवन वाघ, दिनकर मत्सागर, श्रीपत कापडी, सागर कुटे, निखिल डेर्ले, रामदास गिते, योगेश पटेल, अझर राजे, सागर कर्वे, वैभव गायकवाड, डॉ. प्रकाश वाघ, शिवाजी चव्हाण, रमेश मंडलिक यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.





### ग्लोबल व्हिजन स्कूलमध्ये गीता परिवारातर्फे मातृ-पितृ पूजन दिन

**नाशिक : प्रतिनिधी**

**ग्लोबल व्हिजन स्कूल येथे गीता परिवारातर्फे मातृ - पितृ पूजन दिन उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या माता-पित्यांना आदरपूर्वक वंदन करून त्यांचे पूजन केले आणि त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली.**

कार्यक्रमाची सुरुवात अमिता नेरकर यांनी आधुनिक काळातील एक प्रेरणादायी गोष्ट सांगून केली, ज्यामुळे उपस्थित विद्यार्थी आणि पालक भावनिक झाले. त्यानंतर शैलेजा ब्राह्मणकर यांनी विद्यार्थ्यांना मातृ-पितृ पूजनाचे महत्त्व पटवून देत योग्य मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या संस्कृतीमध्ये माता-पित्यांचे स्थान आणि त्यांच्याप्रति आदरभाव व्यक्त करण्याचे महत्त्व सांगितले.

याप्रसंगी शाळेच्या संचालिका विजयालक्ष्मी मणेरीकर यांनी मातृ-पितृपूजनाच्या महत्त्वावर भाष्य करताना सांगितले की, 'माता-पिता हेच आपल्या जीवनाचे पहिले गुरू असतात आणि त्यांचे पूजन म्हणजे आपल्या संस्कृतीचे जतन करण्याचा एक सुंदर प्रयत्न आहे.' विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना औक्षण करून, पुष्प अर्पण करत त्यांचे आशीर्वाद घेतले. या भावनिक क्षणांमुळे संपूर्ण सभागृह भक्तिमय वातावरणाने भारावून गेले होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख अतिथींनी मार्गदर्शनपर विचार मांडत अशा उपक्रमांची गरज आणि संस्कारक्षम पिढी घडविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमासाठी शाळेचे शिक्षक, कर्मचारी आणि गीता परिवाराच्या सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. पालकांनीही या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले आणि भविष्यातही असे कार्यक्रम व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

गांवकरी



महत्त्वाचे



## ध्येय निश्चित करून मेहनत घेतल्यास यश मिळते : डॉ. गारे

**सिन्नर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून कठोर मेहनत घेतल्यास यश निश्चित मिळते, असे प्रतिपादन सिन्नर येथील डॉ. भरत गारे यांनी केले. डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विविध क्षेत्रांत नेत्रदीपक यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक गुणगौरव समारंभप्रसंगी अध्यक्षस्थानावरून डॉ. गारे बोलत होते. व्यासपीठावर श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नारायणशेठ वाजे, उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल तात्या वामने, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन अशोकराव गवळी, माजी सरपंच शरद माळी, शालेय समितीचे सदस्य काशीनाथ वाजे, दामोदर कुंदे, पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सोमनाथ वारुंगसे, मुख्याध्यापक रामदास वाजे, माता-पालक संघाच्या उपाध्यक्षा माधुरी ढोली, अनिता भडांगे, वाळीबा कडभाने आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांबरोबर पालकांना या कार्यक्रमात सहभागी करून घ्यावे असे आवाहन डॉ. गारे यांनी केले. मुख्याध्यापक रामदास वाजे प्रास्ताविकात विविध शालेय उपक्रम व शाळेच्या प्रगतीविषयी माहिती देऊन उपस्थितांचे स्वागत केले. खेळ, चित्रकला, निबंध, वक्तृत्व, मनोरंजनात्मक खेळ, विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, विज्ञान प्रदर्शन आदींसह विविध परीक्षेत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना वस्तूरूपात बक्षिसे देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. डॉक्टर गारे यांनी सुरू केलेल्या' मला अधिकारी व्हायचंय!' या उपक्रमा अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये उल्लेखनीय यश मिळविलेल्या पहिल्या तीन क्रमांकांना स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्र, रोख रक्कम व गुलाब पुष्प देऊन गौरवण्यात आले. विद्यालयाची माजी विद्यार्थिनी दिव्या वाळीबा कडभाने हिची पोलीस दलात निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन पी.आर.करपे यांनी केले तर आभार सोमनाथ गिरी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुनिल ससाणे, डी. ए. रबडे, जयश्री गोहाड, सुनिता ढोली, सोमनाथ पगार, वरिष्ठ लिपिक राणी शिंदे, रोहिणी भगत, रवि गोजरे, किशोर शिंदे, ज्ञानेश्वर कडभाने, निवृत्ती बर्गे, संकेत जाधव, ऋषिकेश कुंदे आदींसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. यावेळी ग्रामस्थ, शालेय समिती सदस्य, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## वाजे विद्यालयात सांस्कृतिक महोत्सव उत्साहात




**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालयात सिन्नर तालुका संचालक कृष्णाजी भगत यांच्या अध्यक्षतेखाली सांस्कृतिक महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष विठ्ठलराजे उगले, शालेय समितीचे सदस्य भाऊसाहेब गोजरे, बबनराव ठोक, अनिल गाडे, शालिनीताई देशमुख, ॲड. शिवानी बोराडे, विशाखा समिती उपाध्यक्षा, अर्जुनराव गोजरे, माजी मुख्याध्यापक बी. जी. थोरात, जे. बी. पगार, प्रा. राजाराम मुंगसे, एस. आर पगार, के. आर. गोसावी, खैरनार जी. एस, शिवनाथ कापडी, अनिल थोरात, रामदास वाजे, एकनाथ खैरनार, पद्मरेखा जाधव, सचिन विघे सहसचिव पालक शिक्षक संघ, भरत शिंदे उपाध्यक्ष पालक शिक्षक संघ, वर्षा सोनवणे, बाळासाहेब खैरनार, दत्तात्रय लोंढे, वृक्षमित्र विष्णु वाघ, विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख, पर्यवेक्षक अशोक निंबाळकर व रामदास ढोली उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते नटराज व शिवाजी महाराज यांचे प्रतिमापूजन करण्यात आले. मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख यांनी प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक महोत्सव आयोजित करणे किती महत्वाचे आहे हे सांगितले. त्यानंतर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. त्यामध्ये गणेशवंदना, आदिवासी नृत्य, देवीची वेगवेगळी रुपे घेतलेली गीते, महाराष्ट्र दर्शन घडविणारे गीत,अध्यात्मिक दर्शन घडविणारे विठु माऊली, कोळी नृत्य, प्रभु श्रीराम यांच्यावरील मेरे राम घर आएंगे, लावणी नृत्य, भांगडा, गरबा नृत्य, काश्मिरी नृत्य, बुमरो गीत, आकर्षक व वेगवेगळ्या प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात सर्वाचे लक्ष वेधून घेणारा शिवाजी महाराज यांचा हुबेहुब दर्शन घडविणारा शिवराज्याभिषेक सोहळा या सोहळ्याने प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. हा भव्यदिव्य कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक समिती सदस्य, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका, शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी यांनी मोलाचे सहकार्य केले. जितेंद्र शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. आभार पर्यवेक्षक रामदास ढोली यांनी मानले.

## गरिबीला संधी मानून शिक्षणाद्वारे त्यावर मात करा : सुरडकर



**सिन्नर : प्रतिनिधी**

जीवनात गरिबी एक संधी माना व शिक्षणाद्वारे त्यावर मात करा. चांगले संस्कार जपा, देशाचा व मातापित्यांचा नावलौकिक होईल असे जीवनात कार्य करा, चांगला अभ्यास करून सुयश प्राप्त करा, असे प्रतिपादन नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे आयुक्त सुधाकर चंद्रभान सुरडकर यांनी केले. पांढुर्ली येथील जनता विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ तथा आशीर्वाद सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा शिक्षण विभागाच्या विजया अवचार, चंद्रकांत गायकवाड, शालेय समिती अध्यक्ष विष्णू ढोकणे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष पोपटराव वाजे, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनिता जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.उपस्थितांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सरस्वतीचे पूजन करण्यात आले. विद्यालयाच्या गीतमंचाने संगीत शिक्षक राजाराम गायखे यांच्या मार्गदर्शनाखाली ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. दिलीप हगवणे यांनी उपस्थित पाहुण्यांचा परिचय करून दिला. मुख्याध्यापिका सुनीता जगताप यांनी विद्यार्थ्यांना चांगले संस्कार व चांगले आचरण करावे, विद्यालय आपल्या परिवाराचे नाव होईल असे वर्तन करावे, असे आवाहन केले. यावेळी विजया अवचार, देवयानी आरोटे, एस. एन. जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ज्येष्ठ शिक्षिका आर. पी. जाधव यांनी परिश्रम घेतले. यावेळी अलका आहिरे, विजय गायकवाड, मनीषा कापुरे, बी्. एल. जाधव, मार्तंड रकिबे, कविता भोसले, कविता वागस्कर, मेघा वसईकर, सुनिता वाघ, वरिष्ठ लिपिक गणेश लभडे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# पांढुर्लीत सराईत मोटारसायकल चोरट्यास अटक

## चोरीच्या ६ दुचाकी हस्तगत, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**सिन्नर : प्रतिनिधी**

**नांदूरशिंगोटे परिसरातून दुचाकी चोरणाऱ्या चोरट्यास तालुक्यातील पांढुर्ली येथील चौफुलीवर सापळा रचून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. त्याच्याकडून चोरीच्या ६ दुचाकी हस्तगत करण्यास पोलिसांना यश आले. अक्षय सावन तामचीकर, रा. घुलेवाडी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर असे पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संशयिताचे नाव आहे.**



नांदूरशिंगोटे येथील सागर शंकर पालवे यांची स्प्लेंडर (एमएच-१५, एचके - ६७३८) ही ६ फेब्रुवारी रोजी रात्रीच्या सुमारास चोरीस गेली होती. यासंदर्भात वावी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या मोटारसायकल चोरीचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून सुरू होता. घुलेवाडी येथे वास्तव्यास असलेला आणि गॅस रिपेरिंगचे काम करणारा अक्षय तामचीकर हा या गुन्ह्यातील संशयित असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राजू सुर्वे यांना मिळाली होती. गुन्ह्याचा तपास सुरू असताना शनिवारी (दि. १५) स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राजू सुर्वे यांना मोटारसायकल चोर अक्षय सावन तामचीकर हा पांढुर्ली चौफुली परिसरात येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पांढुर्ली चौफुली परिसरात साध्या वेशात सापळा रचून त्यास ताब्यात घेतले. चौकशीअंती त्याने देवळाली कॅम्प, सिन्नर, नांदूरशिंगोटे, मोशी, पुणे, संगमनेर परिसरातून मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून २ हिरो स्प्लेंडर, २ हीरो एचएफ डीलक्स, १ टीव्हीएस स्टार सिटी, १ बजाज डिस्कव्हर अशा ३ लाख १० हजार रुपये किमतीच्या ६ चोरीच्या दुचाकी हस्तगत केल्या. तामचीकर याला पोलिसांनी अटक करून वावी पोलिसांच्या ताब्यात दिले. त्याच्याकडून दुचाकी चोरीचे आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राजू सुर्वे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदेश पवार, अंमलदार नवनाथ सानप, विनोद टिळे, हेमंत गिलबिले, प्रदीप बहिरम, प्रकाश कासार यांनी मोलाची भूमिका निभावली.



## चांदेकसारे सबस्टेशनच्या जमीन अधिग्रहणाचे काम पूर्ण

### लवकरच निविदा प्रक्रिया : आ. काळे

**वावी : वार्ताहर**

**कोपरगाव मतदारसंघाच्या विजेचे प्रश्न मार्गी लावून शेतकऱ्यांना पूर्ण दाबाने वीजपुरवठा व्हावा, यासाठी काही सबस्टेशनची क्षमतावाढ तर काही ठिकाणी नवीन सबस्टेशनला मंजुरी मिळविल्या आहेत. यामध्ये चांदेकसारे येथील सबस्टेशनचा देखील समावेश असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या जमीन अधिग्रहणाचे काम पूर्ण झाले असून लवकरच निविदा प्रक्रिया देखील पूर्ण होणार असल्याची माहिती आ. आशुतोष काळे यांनी दिली.**

विधानसभा निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने निवडून दिल्याबद्दल आभार दौरा व समस्या निवारण कार्यक्रम आ. आशुतोष काळे यांनी हाती घेतला असून कोपरगाव तालुक्यातील चांदेकसारे आयोजित आभार दौऱ्यात त्यांनी माहिती दिली. यावेळी त्यांनी चांदेकसारे गावातील नागरिकांचे प्रश्न व अडचणी समजून घेत हे प्रश्न सोडवण्यासंदर्भात ग्रामस्थांशी सविस्तर चर्चा केली. ते म्हणाले की, मतदार संघाचा लोकप्रतिनिधी या नात्याने मतदार संघातील नागरिकांचे विकासाचे प्रश्न सोडविण्यासाठी मी कटिबद्ध आहे. मागील पंचवार्षिक मध्ये रस्ते, वीज, पाणी हे मूलभूत विकासाची प्रश्न बहुतांश प्रमाणात मार्गी लावले आहेत. चांदेकसारे परिसरातून जात असलेल्या झगडे फाटा-वडगाव पान रस्त्याचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी हा राज्य मार्ग राष्ट्रीय महामार्गाकडे हस्तांतरित करून एन.एच.७५२ जी या सावळीविहीर फाटा-कोपरगाव या रस्त्याप्रमाणे हा रस्ता देखील व्हावा यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरु असून, लवकरच यश मिळणार असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी सांगितले. चांदेकसारे गावातील उर्वरित अंतर्गत रस्ते, श्री भैरवनाथ-जोगेश्वरी देवस्थान परिसरात शेड उभारणे, दलित वस्तीतील वीज रोहित्र उभारणे आदी कामे लवकरात लवकर मार्गी लावण्यात येईल, असे आश्वासन आ. आशुतोष काळे यांनी दिले.

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे चौधरी, महावितरणच्या कनिष्ठ अभियंता श्रीमती मोजाड, मंडलाधिकारी श्रीमती कोल्हे, तलाठी माळी, ग्रामसेवक दुशिंग आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांचे पदाधिकारी व सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'नरहरी महाराजांचे वारकरी संप्रदायाच्या उत्कर्षात मोलाचे योगदान'

**वावी : वार्ताहर**

**संत शिरोमणी नरहरीदास महाराज यांचे कार्य समस्त सुवर्णकार समाजासाठी उल्लेखनीय आहे. त्यांच्या जीवनकार्यात त्यांनी अनेक वर्षे विठ्ठलाची नितांत भक्ती करून विठ्ठलभक्तीचा ठसा संपूर्ण महाराष्ट्रभर उमटविला. त्यांच्या अमूल्य योगदानाचे महत्त्व आणि प्रभाव अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचला आहे. ते भक्ती व ज्ञानाचा अथांग सागर असून, संत शिरोमणी नरहरी महाराजांचे वारकरी संप्रदायाच्या उत्कर्षात मोलाचे योगदान असल्याचे प्रतिपादन आ. आशुतोष काळे यांनी केले.**



कोपरगाव शहरात संत शिरोमणी नरहरी महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आ. आशुतोष काळे यांनी संत शिरोमणी नरहरी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी समस्त सुवर्णकार समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. आशुतोष काळे पुढे बोलताना म्हणाले, की संत शिरोमणी नरहरी महाराज हे भक्तकवी महात्मा होते, त्यांनी भक्तिरसात चिंब भिजलेल्या अनेक काव्यरचनांची निर्मिती केली. राष्ट्र घडविण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. संत नरहरी महाराज परम शिवभक्त होते. त्यांच्या भक्तीचा वारसा समस्त सुवर्णकार समाजाने जपून ठेवला आहे.

कोपरगाव मतदारसंघातील विविध समाजातील नागरिकांच्या मागणीनुसार विविध समाजाला समाजमंदिरे उभारण्यासाठी निधी दिला आहे. मागील पंचवार्षिकमध्ये सुवर्णकार समाजाच्या मागणीची दखल घेऊन समाजमंदिराच्या उभारणीसाठी २० लक्ष निधी दिला असून, भविष्यात सुवर्णकार समाजाने अधिक निधीची मागणी केल्यास निधी उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही आ. आशुतोष काळे यांनी यावेळी दिली.

यावेळी आ. आशुतोष काळे यांच्या स्थानिक विकास निधीतून बांधण्यात आलेल्या सुवर्णकार समाजाच्या सभागृहाचे त्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी अहिर सुवर्णकार संस्थेचे अध्यक्ष पंडितराव यादव, सर्व विश्वस्त, लाड सुवर्णकार संस्थेचे अध्यक्ष संतोषजी देवळालीकर, सर्व विश्वस्त, समाज बांधव, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सिन्नर सायकलिस्टची ११० किमी सप्तशृंगगड सायकल वारी

**सिन्नर : प्रतिनिधी**

**सिन्नर सायकलिस्टच्या वतीने सिन्नर ते सप्तशृंगगड (वणी) सायकलवारी काल (दि. १५) यशस्वीरीत्या संपन्न झाली.**

या सायलवारीमध्ये ९ महिलांसह ९० जणांनी सहभाग घेतला होता. सिन्नर येथून निघालेली सायकलवारी म्हाळसाकोरे, निफाड, पिंपळगाव, वणी मार्गे सप्तशृंगगडावर पोहचली. या राइडमध्ये सिन्नरचे नितीन जाधव, योगेश शिंदे, रामभाऊ लोणारे, मुकेश चव्हाणके, भास्कर गोजरे, सुरज देशमुख, सुभाष कुंभार, गोरख कांदे, नंदकिशोर निऱ्हाळी, मंगेश क्षत्रिय, गणेश तांबोळी, हरिदास जेजुरकर, गणेश कोकाटे, अजिंक्य मुदबखे, शैलेश पद्मशाळी, नारायण शिंदे, स्वरूप गोराणे, विकास ढोली, मनोज सोनवणे, ज्ञानेश्वर सुंभे, डॉ दिलीप गुरूळे, सोपान दिघे, रवींद्र मोगल, रवी शिंदे, सतीश सांगळे, शरद कांदे, प्रमोद सांगळे, गुलाब सांगळे, कैलास वाकचौरे, संजय कांडेकर, रवी कुलकर्णी, सुनील ढाणे, धीरज लोणारे, राम कासार, कुंडलिक झगडे, डॉ. डी. एम. गडाख, नारायण भावसार, किसन लोणारे, विनोद गवळी, अशोक गव्हाणे, बाळासाहेब सांगळे, संदीप काकड, नारायण साबळे, प्रकाश मोरे, संदीप बनकर, बाळासाहेब केदार, कांचेश पवार, संदीप चतुर, नागनाथ सरगर, राजेंद्र हाडोरे, सुरेश जोंधळे, नीलेश सोनवणे, राजेंद्र मिठे, संजय आनेराव, नाना चौधरी, चंद्रशेखर बर्वे, योगेश रुद्राक्ष, शैलेंद्र शिंदे, प्रकाश जाधव, संजय आव्हाड, तनिक्श सानप, उमेश उगले, बाळासाहेब वाघ, डॉ प्रताप पवार महिलांमध्ये ज्योती मोरे, धनश्री शिंदे, योगिता कांडेकर, अश्विनी आरोटे, रजनी वाजे, मंजू गुजराथी, स्वप्नाली उगले, ज्योती कोकाटे यांनी सहभाग घेतला.

## दातली मारहाण प्रकरणी मयत सागर भाबडसह कुटुंबीयांविरोधात गुन्हा

### विनयभंग, जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची फुलचंद केदार यांची फिर्याद

**सिन्नर : प्रतिनिधी**

**तालुक्यातील दातली येथे शुक्रवारी (दि.१४) सायंकाळी ५.३० वाजता झालेल्या हाणामारीत मृत्युमुखी पडलेल्या सागर भाबड याच्यासह कुटुंबीयांविरोधात फुलचंद केदार यांच्या फिर्यादीवरून विनयभंग, मारहाण, जिवे मारण्याचा प्रयत्न केला म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

या मारहाणीच्या घटनेत सागर मारुती भाबड याचा मृत्यू झाल्याने संदीप मारुती भाबड यांच्या फिर्यादीवरून शिवराम भागुजी भाबड व कुटुंबीयांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर शिवराम भाबड यांच्या कुटुंबीयांच्या वतीने फुलचंद पुंडलीक केदार (वय ४५), रा. केदारपूर, ता. सिन्नर यांनी सागर भाबड व कुटुंबीयांविरोधात फिर्याद दाखल केली आहे.

फुलचंद केदार यांच्या फिर्यादीनुसार, शुक्रवारी (दि. १४) सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास मौजे दातली गावात भुडकीवस्ती येथे शिवराम भागुजी भाबड यांच्या घरात व घरासमोर सागर मारूती भाबड, अतुल प्रकाश सोनवणे, समाधान सोमनाथ केदार, ओमकार डोमाडे, प्रणव भाऊसाहेब केदार, संदीप मारूती भाबड, निर्मला सागर भाबड, उज्वला संदीप भाबड, जगन नरहरी भाबड, म्हाळू नरहरी भाबड, अक्षय म्हाळू भाबड, ओमकार जगन भाबड, मीरा जगन भाबड, रखमा म्हाळू भाबड, सागर रामभाऊ कराड, संकेत म्हाळू भाबड व इतर ७ ते ८ इसम संगनमताने हातात कोयते, लोखंडी गज घेऊन आले. सागर भाबड याने शिवराम भाबड यांच्या घरात अनधिकाराने घुसून सरलाबाई रखमा भाबड, बबाबाई शिवराम भाबड, हर्षदा गणेश भाबड यांच्या समोर येऊन त्यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करून त्यांच्याकडे पाहत त्यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले तर संदीप भाबड याने हातातील काही तरी लोखंडी हत्याराने गोरखनाथ भाबड यांच्या डोक्यावर व हातावर जोरात मारून याला संपवूनच टाकतो, असे म्हणत गंभीर दुखापत करून त्यांस जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. सूरज गोरखनाथ भाबड मध्ये सोडविण्यास गेला असता संदीप भाबड याने त्यांच्या उजव्या हातावर मारून गंभीर दुखापत करून मोठमोठ्याने शिवीगाळ करीत दमदाटी केली असे म्हटले असून, केदार यांच्या फिर्यादीवरून सागर मारुती भाबड व इतर २२ ते २३ जणांविरोधात एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करीत आहेत.

# खासगी, इंग्रजी माध्यमांतील विद्यार्थ्यांचा जिल्हा परिषद शाळांकडे ओढा

## वर्षभरात ५२८ विद्यार्थी जि. प. शाळेत दाखल

**भरत घोटेकर : सिन्नर**

**खासगी, इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषद शाळांमध्ये वेगवेगळे विद्यार्थी स्नेही आणि गुणवत्तावाढीस पूरक ठरणारे उपक्रम राबवले जात असल्याने जिल्हा परिषद शाळांमधील पटसंख्येत वाढ होऊ लागली आहे. वैविध्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांचा सकारात्मक परिणाम म्हणून यंदा इंग्रजी आणि खासगी माध्यमाच्या शाळांमधून तब्बल ५२८ विद्यार्थी जिल्हा परिषद शाळांमध्ये दाखल झाले आहेत. विशेष म्हणजे सिन्नर आणि बारागावपिंप्री या केंद्रांमध्ये सर्वाधिक १०४ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले आहेत.**



मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी, शिक्षणाधिकारी नितीन बच्छाव, उपशिक्षणाधिकारी भास्कर कनोज, सिन्नर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अशोक भवारी, गटशिक्षणाधिकारी राजेश डामसे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २०८ शाळांमध्ये नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आले. त्यामुळे गुणवत्ता सुधारत असल्याचे पालकांच्या निदर्शनास आल्याने २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात तालुक्यात पहिलीच्या विद्यार्थी संख्येत मोठी वाढ झाली असून, एकूण ३४६२ विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत. जिल्हा परिषदेच्या बारागावपिंप्री शाळेतील प्रांजल जाधव या विद्यार्थिनीने शिक्षणमंत्र्यांसमोर केलेले भाषणही अवघ्या महाराष्ट्रात व्हायरल झाले. हा देखील गुणवत्तेचा उत्तम नमुना ठरला. शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, उपक्रमशील शिक्षक, तंत्रस्नेही शिक्षक, शाळांचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या मेहनतीमुळे हे सर्व शक्य होताना दिसत आहे. खासगी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषदेची गुणवत्ता दर्जेदार असल्याने पालकांचा ओढा जिल्हा परिषद शाळांकडे वाढला आहे.

**पहिली ते आठवीच्या पटसंख्येत अशी झाली वाढ**

| वर्ष | प्रवेश |
|---|---|
| २०२३-२४ | १८०१२ |
| २०२४-२५ | २०१६१ |
| झालेली वाढ | २१४९ |

### यामुळे विद्यार्थी संख्येत वाढ

जिल्हा परिषदेच्या शाळांमधून मॉडेल स्कूलची निर्मिती करण्यात आली आहे. त्याचबरोबर पी. एमश्री शाळा, गोष्टींचा शनिवार, मंथन, भारत टॅलेंट सर्च, इंग्रजी ग्रामर परीक्षा या स्पर्धा परीक्षांच्या धर्तीवर घेण्यात येत आहेत. 'सेल्फी विथ सक्सेस'ने विद्यार्थ्यांची शिक्षणात रुची वाढवली. नवोदय, स्कॉलरशिपची पूर्वतयारी विद्यार्थ्यांकडून शाळांमध्ये करून घेतली जात आहे. बालआनंद मेळावे, क्रीडा चषक, मला अधिकारी व्हायचंय अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढत असून, त्यांचा सर्वांगीण विकासही होत आहे. परिणामी, जिल्हा परिषद शाळांच्या पटसंख्येत वाढ होत आहे.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक




स्वराधिराज संगीत महोत्सवात स्वराभिषेक
पान ६

# गांवकरी

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे ना. आठवलेंच्या हस्ते अनावरण
पान ६



gavakari.in ■ gavkarinews.com
नाशिक, सोमवार, दि. १७ फेब्रुवारी २०२५

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ। निर्विघ्नं कुरुमे देवं सर्वकार्येषु सर्वदा ॥





नाशिक : संकष्टी चतुर्थीनिमित्त प्रसिद्ध नवश्या गणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. यावेळी गणपतीला द्राक्षांची आरास करण्यात आली होती.

## महत्त्वाचे

### एनबीटी लॉच्या विद्यार्थ्यांकडून कायद्याबाबत जनजागृती




**नाशिक :** एनबीटी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून डे केअर शाळेतील विद्यार्थ्यांना कायद्याची जनजागृती करण्यात आली. यावेळी श्रुतिका देसाई, किरण कलाल, पवन गुट्टे, साक्षी देवरे, सायली अहिरे, प्रसाद भुसाळ, विशाल कदम यांनी विद्यार्थ्यांना सायबर क्राइम याविषयी माहिती देण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कायद्याचे ज्ञान वाढते. विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांना समर्पक उत्तरे देण्यात आली. डे केअर सेंटर जुनिअर कॉलेजच्या प्रिन्सिपल हिरे, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पाणवेली काढण्यासाठी ना. बावनकुळे यांना निवेदन

**निफाड : विशेष प्रतिनिधी**
निफाड तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातील सायखेडा, कोठुरे ते नांदूमध्यमेश्वर येथील गोदावरी नदीपात्रातील पाणवेलींची वाढ अतिशय झपाट्याने होत आहे. नदीकाठच्या गावांमध्ये त्यामुळे वर्षानुवर्षे दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या, प्राण्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. तरी महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने तातडीने नाशिक जिल्हाधिकारी यांना आदेश करून गोदावरी नदीपात्रातील पाणवेलींचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी निवेदनाद्वारे राज्याचे महसूलमंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे भारतीय जनता पार्टी नाशिक जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष शंकरराव वाघ यांनी केली आहे.

### इन्शुरन्सचे पैसे लाटले

**नाशिक :** शहरातील स्टर्लिंग मोटर्सला इन्शुरन्स कंपन्यांनी पाठविलेला 'अतिरिक्त बिझनेस बोनस' स्टर्लिंग कंपनीत काम करणाऱ्या संशयिताने संगनमताने स्वत:सह नातलगांच्या बँक खात्यात जमा करून कंपनीस ३७ लाख १९ हजारांचा गंडा घातला आहे. याबाबत मुंबईनाका पोलीस ठाण्यात कंपनीच्या वतीने विवेक गोपाल माथूर (रा. वाकड, पुणे) यांनी फिर्याद नोंद केली आहे. त्यान्वये, संशयित कर्मचारी महेष शालीग्राम राठी(रा. पौर्णिमा अपा. भागवतनगर, नागपूर) याच्यावर गुन्हा नोंद झाला आहे.

# नाशिकरोडच्या न्यायालयामुळे न्यायदान प्रक्रियेला अधिक गती मिळेल

## उपमुख्यमंत्री अजित पवार : जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश आणि दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालयाचे उद्घाटन

**नाशिक : प्रतिनिधी**
**न्यायव्यवस्थेचा विस्तार आणि सुधारणा हा प्रगतिशील समाजाचा पाया आहे. लोकसंख्येच्या आणि न्यायालयीन प्रकरणांच्या वाढत्या प्रमाणामुळे न्यायालयांवरील कामाचा ताण वाढत आहे. त्यासाठी राज्यातील न्यायव्यवस्थेचे बळकटीकरण करीत सुविधा पुरविण्याचे काम राज्य सरकार करीत आहे. नाशिक रोडच्या नवीन न्यायालयामुळे न्यायदान प्रक्रियेला अधिक प्रभावी आणि गतिमान करेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी येथे व्यक्त केला, तर मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांनी न्यायालयाच्या माध्यमातून शेवटच्या माणसापर्यंत त्याचे अधिकार पोहोचविण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले.**

नाशिक रोड येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश आणि दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठस्तर या न्यायालयाचे उद्घाटन आणि ई सेवा केंद्र, ई ग्रंथालय आदींचे उद्घाटन काल दुपारी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या हस्ते झाले. त्यानंतर विभागीय आयुक्त कार्यालयातील स्व. यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री पवार बोलत होते. यावेळी अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा नाशिकचे पालक न्यायमूर्ती सारंग कोतवाल, न्यायमूर्ती संदीपकुमार मोरे, न्यायमूर्ती किशोर संत, न्यायमूर्ती मिलिंद साठे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीचंद जगमलानी, पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुदाम गायकवाड, जिल्हा न्यायाधीश १ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश जे. एम. दळवी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, नाशिक रोडच्या नवीन न्यायालयाच्या



स्थापनेमुळे प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होऊन न्याय प्रक्रियेत गतिमानता येण्यास मदत होईल.

भारतीय न्यायसंहिता, नागरिक संरक्षण संहिता आणि साक्ष संहिता या तीन नवीन फौजदारी कायद्यासंदर्भात राज्यातील अंमलबजावणीचा मुख्यमंत्री महोदयांकडून आढावा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नुकताच घेतला आहे. या तीन नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीमुळे राज्यात गतिमान आणि प्रगतिशील कायदा व सुव्यवस्था उभी करण्याचा सरकारचा प्रयत्न असणार आहे, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले

न्यायमूर्ती कर्णिक म्हणाले की, सुदृढ समाजासाठी न्यायपालिका आवश्यक आहे. न्यायालयाच्या इमारत बांधकामासाठी राज्य सरकारचे नेहमीच सहकार्य राहिले आहे. उच्च न्यायालयाच्या नवीन इमारतीसाठी उत्कृष्ट वास्तू रचनाकार यांनी उपलब्ध करून दिली आहे. राज्यात न्यायालयीन इमारतीसाठी पाठपुरावा सुरू आहे. न्यायालयात आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. न्यायालयाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या माणसासाठी अधिकार पोहोचविण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी विधी सेवा समितीसह विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

न्यायमूर्ती कोतवाल यांनी सांगितले की, जनसेवेसाठी न्यायपालिकेला अधिकार दिले आहेत. सुदृढ समाज आणि खटल्यांची संख्या कमी करण्यासाठी न्यायाधीशांची संख्या वाढवून पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली.

न्यायमूर्ती मोरे म्हणाले की, नाशिक रोड येथील न्यायालयामुळे वेळेची बचत होईल. न्यायमूर्ती संत म्हणाले की, न्यायालय हा समाजाचा आधार असतो. सुसंस्कृत समाजात न्यायालयाचे महत्त्व आहे. न्याय जलद, सुलभ आणि कमी खर्चात मिळण्यासाठी नाशिकरोड येथील न्यायालय उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. न्यायमूर्ती साठे म्हणाले की, नाशिक शहरासाठी आणखी एक न्यायालय उपलब्ध झाले आहे. रेल्वे स्थानकापासून हे न्यायालय जवळ आहे. त्यामुळे पक्षकारांना न्याय लवकर मिळण्यास मदत होईल. गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. जगमलानी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी आमदार दिलीप बनकर, आमदार सरोज अहिरे यांच्यासह वकील संघाचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

**२७ मोबाइल फॉरेन्सिक व्हॅन कार्यान्वित**
राज्यात कायदा व सुव्यवस्था बळकट करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. त्याचाच एक भाग म्हणून राज्यात २७ मोबाइल फॉरेन्सिक व्हॅन कार्यान्वित केल्या आहेत. या व्हॅनच्या माध्यमातून घटनास्थळी न्याय वैद्यकीय परीक्षण केले जाणार आहे. त्यासाठी पोलिस दल प्रशिक्षित केले जात आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या वांद्रे येथे साकारण्यात येणाऱ्या अद्ययावत इमारतीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले.

# कर्ज मिळवून देण्याचे आमिष; उद्योजकाची फसवणूक

## पुण्यातील भामट्यांनी ८२ लाख ६० हजारांना घातला गंडा

**नाशिक : प्रतिनिधी**
शहरातील एका उद्योजकाला पुण्यातील संशयित कुटुंबाने डाळ मिलसाठी आठ कोटींचे कर्ज मंजूर करून देण्याचे आमिष दाखवून तब्बल ८२ लाख ६० हजार रुपयांना गंडा घातला आहे. किशोर बीरजमल भंडारी, योगेश किशोर भंडारी, श्रीपाद किशोर भंडारी, श्यामा किशोर भंडारी (सर्व रा. कुदळवाडी, चिखली, चिंचवड, पुणे) असे फसवणूक करणाऱ्या संशयितांची नावे आहेत.

अविनाश वामन थोरात (६५, रा. आनंदवल्ली, गंगापूर रोड) यांच्या फिर्यादीनुसार, त्यांना डाळ मिल आणि बांधकाम व्यवसायासाठी पैशांची आवश्यकता होती. त्यासाठी त्यांनी अनेक फायनान्स कंपन्यांकडे पाठपुरावा केला. या




दरम्यान नोव्हेंबर २०१८ मध्ये त्यांची ओळख संशयितांशी झाली. त्यावेळी संशयितांनी थोरात यांना त्यांच्या व्यवसायासाठी पद्मावती कलेक्शन, मयंक फायनान्स यांसह आणखी काही फायनान्स कंपन्यांकडून ८ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करून देण्याचे आमिष दाखविले. संशयितांनी थोरात यांच्याकडून कर्ज मंजुरीसाठीच्या प्रोसेसिंग फीच्या नावाखाली वारंवार ८२ लाख ६० हजार रुपये घेतले. पैसे देऊनही संशयितांकडून कोणत्याही कंपनीचे कर्ज मंजूर झाले नाही. त्यामुळे त्यांनी दिलेल्या पैशांची मागणी संशयितांकडे केली, मात्र संशयितांनी न देता, त्यांच्या पैशांचा अपहार करीत त्यांची फसवणूक केली. याप्रकरणी गंगापूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून, आर्थिक गुन्हेशाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे पुढील तपास करीत आहेत.

**साडेतीन लाखांना गंडा**

दुसऱ्या एका घटनेत तीन कोटींचे कर्ज देण्याचे आमिष दाखवून तिघांनी ग्राहकाकडून तीन लाख ४४ हजार रुपये उकळले. कर्ज मंजूर न होताच, दिलेली रक्कम परत मिळत नसल्याने उमेश रामदास ढोकळे (वय ४५, रा. पंचवटी) यांनी आडगाव पोलीस ठाणे गाठून संशयित राकेश देशपांडे, गणेश करचे व जितेंद्र शर्मा यांच्याविरोधात फिर्याद दाखल केली आहे.


# इंदिरानगरला कारच्या धडकेत शिक्षिकेचा मृत्यू

**सिडको : विशेष प्रतिनिधी/ वडाळागांव : प्रतिनिधी**
मुंबई महामार्गावरील इंदिरानगर बोगद्याकडून सीटीसेंटर मॉलकडे जाणाऱ्या रस्त्यावरुन भरधाव वेगाने जाणाऱ्या फॉर्च्युनरने खाद्यपदार्थांच्या स्टॉलसह रस्त्याच्या बाजूला ज्यूस पिण्यासाठी उभ्या असलेल्या नागरिकांना दिलेल्या धडकेत एका महिला शिक्षिकेचा जागीच मृत्यू झाला तर अन्य दोन जण यात गंभीर जखमी झाल्याची घटना रविवारी दुपारी चार वाजेच्या सुमारास सदाशिवनगर जॉगिंग ट्रॅक येथे घडली आहे. कारचालकाच्या विरोधात मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून कारचालकास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

नाशिक एज्युकेशन सोसायटी संचलित माध्यमिक विद्यालय शिक्षिका म्हणून कार्यरत गायत्री



संदीप ठाकूर (रा. अनुश्री अपार्टमेंट, इंदिरानगर) आणि नीलम जाचक या दोघीही सहकारी शिक्षकाच्या मुलाचा विवाहसोहळा आटोपून घरी जात होते. दरम्यान सदाशिवनगर जॉगिंग ट्रॅकच्या कडेला असलेल्या ज्युसच्या गाडीवर ज्युस पित असताना इंदिरानगर बोगद्याकडून (एमएच१४ जेई ९००) फॉर्च्युनर कार भरधाव वेगाने आली. चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही कार थेट खाद्यपदार्थ विक्रीच्या गाड्यावर येऊन आदळली त्यानंतर लगेचच शेजारी असलेल्या ज्युस विक्रीच्या गाडीवरही आपटली आणि ज्युस पीत असणाऱ्या गायत्री ठाकूर आणि निलम जाचक या दोघींना धडक दिली. यात गायत्री ठाकूर यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला तर त्यांच्यासोबत असलेल्या नीलम जाचक यादेखील जखमी झाल्या. रस्त्याच्या कडेला उभे असणारे संतोष चोरमाले हेसुद्धा जखमी झाले. यावेळी अपघातग्रस्तांना तात्काळ उपचारासाठी खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. याप्रकरणी मुंबई नाका पोलिस ठाण्यात कारचालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून कारचालकाला अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.



### श्री प्रतिष्ठानतर्फे छत्रपती शिवरायांचा ५१ फुटी टाक

#### थ्रीडी देखावे, मोफत आरोग्य शिबिर

**इंदिरानगर : वार्ताहर**
भाजपाप्रणीत श्री प्रतिष्ठानतर्फे शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांचा ५१ फुटी 'टाक'-थ्रीडी देखावा सादर करण्यात येणार आहे. तसेच परिसरातील विद्यार्थी शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणार आहेत. तसेच राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर तसेच अन्य राष्ट्रपुरुषांच्या योगदानाबद्दल व संविधानाबद्दलची माहिती प्रदर्शित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे श्री प्रतिष्ठान व समर्थ युवा फाउंडेशन, एमएनजीएल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यात विविध तपासण्या मोफत करण्यात येणार आहे. त्यात मोफत नेत्रतपासणी करून मोफत चष्म्यांचे वाटप होणार असून, दातांच्याही तपासण्या करण्यात येणार आहे. तसेच महिलांसाठी कॅन्सरची तपासणी करण्यात येणार आहे. परिसरातील नागरिकांनी बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता इंदिरानगर येथील श्री प्रतिष्ठान, माजी नगरसेवक ॲड. श्याम बडोदे यांच्या संपर्क कार्यालयासमोर शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करण्यासाठी व आरोग्य शिबिरासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक भाजपा शहर सरचिटणीस माजी नगरसेवक ॲड. श्याम बडोदे यांनी केले आहे.

# सामाजिक कार्यकर्त्या सविता गायकर यांचा समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश



**पक्षप्रवेशामुळे भाजपची ताकद वाढणार**
सविता करण गायकर यांच्या भाजप प्रवेशामुळे सातपूर परिसरातील पक्ष संघटनेला मोठी बळकटी मिळणार असून, आगामी महापालिका निवडणुकीत भाजपा विजयाचा झेंडा फडकवेल, असा विश्वास स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे. भाजपमध्ये दाखल झाल्यानंतर पक्षातील वरिष्ठ नेत्यांसह प्रभागातील नागरिकांनी त्यांना भावी राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**नाशिक : प्रतिनिधी**
पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हिंदुत्ववादी विचारसरणीला तसेच विकासात्मक दृष्टिकोनाला पाठिंबा देत, नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सीमाताई हिरे यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक कार्यकर्त्या सविता करण गायकर यांनी आपल्या असंख्य समर्थकांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

पक्षप्रवेश सोहळा भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री नामदार गिरीश महाजन, नामदार राधाकृष्ण विखे पाटील आणि कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

सातपूरमधील प्रभाग क्रमांक ९ या भागातील प्रभावी सामाजिक कार्यकर्त्या असलेल्या सविता गायकर यांनी अनेक वर्षांपासून समाजसेवेच्या माध्यमातून नागरिकांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले आहेत. त्या छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांच्या पत्नी असून, समाजातील विविध प्रश्नांवर सातत्याने लढा देत आहेत. यावेळी त्यांच्यासोबत प्रभाग क्रमांक ९ आणि सातपूर परिसरातील अनेक प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. यामध्ये माजी नगरसेविका हेमलाताई कांडेकर, माजी महापौर दशरथ पाटील यांचे सुपुत्र प्रेम पाटील, सामाजिक कार्यकर्ते संजय तुपलोंढे, विलास गायकवाड, तुषार पाटील, छत्रपती शिवाजीनगर, श्रमिकनगर, धर्माजी कॉलनी, ध्रुवनगर येथील असंख्य कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

## जयश्री हिरे यांचा भाजपात प्रवेश



**नाशिक : प्रतिनिधी**
छावा क्रांतिवीर सेनेचे नाशिक जिल्हाध्यक्ष आशिष साहेबराव हिरे यांच्या पत्नी जयश्री आशिष हिरे यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष बावनकुळे तसेच रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते जयश्री आशिष हिरे यांचा सत्कार तसेच शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जयश्री आशिष हिरे यांनी ज्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेश केला त्या आमदार सीमा हिरे, महेश हिरे, रश्मीताई हिरे यांचे आभार मानले. या पुढील काळात महिलांसाठी जोमाने काम करून महिलांसाठी रोजगार तसेच गृहोद्योग निर्माण करण्यासाठी प्रयत्न करेल, अशी ग्वाही देण्यात आली. सर्व स्तरावरून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

नाशिक आज

# गांवकरी

■ नाशिक, सोमवार, दि. १७ फेब्रुवारी २०२५






‘प्रेमाची गोष्ट २’ चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला पान ३






म्युच्युअल फंड योजनांचे वर्धापन दिवस पान ३


# आयुक्तांकडून तीन हजार कोटींचे अंदाजपत्रक सादर

## करवाढ टळली ; सलग तिसऱ्या वर्षीचे प्रशासक राजवटीतील अंदाजपत्रक

रुपया असा येणार, विभाग जमेचा अंदाज (कोटीत)

| | |
|---|---|
| वस्तू व सेवा कर(जीएसटी) | १५८३.४२ |
| मालमत्ता कर (घरपट्टी) | २५६.०७ |
| नगर नियोजन | २५३.७३ |
| पाणीपट्टी | ७५.२२ |
| मिळकत, आरोग्य, वाहतूक | ७६.३० |
| रोड डॅमेज चार्ज | ८४.१८ |
| अनुदाने | ४.८४ |
| परिवहन सेवा उत्पन्न | ०.०० |
| संकिर्ण | ५१.२४ |
| अग्रीम/इतर उचला | ६०३.४० |
| कर्ज | ०.०१ |
| सुरुवातीची शिल्लक | ६६.३० |
| एकूण | ३०५४.७० |



**नाशिक : प्रतिनिधी**

**महापालिका प्रशासकीय राजवटीत आयुक्त मनीषा खत्री यांनी सन २०२५ - २६ आर्थिक वर्षासाठी १.३९ कोटी शिलकीसह तीन हजार ५४ कोटींचे अंदाजपत्रक सादर केले. त्यात नवीन मोठी करवाढ नसली तरी स्वच्छता व जललाभ करात एक टक्का वाढ करण्यात आली आहे. उत्पन्नवाढीसाठी कोणत्याही ठोस उपाययोजना नसून, रोखीकरण केलेल्या निधीचा समावेश केल्याने गतवेळेच्या तुलनेत अंदाजपत्रकात ४०६ कोटींची वाढ पहायला मिळत आहे.**

रुपया असा जाणार, विभाग खर्चाचा अंदाज (कोटीत)

| | |
|---|---|
| सार्वजनिक बांधकाम व्यवस्थापन | ६१४.०२ |
| पाणीपुरवठा, मलनिस्सारण | ३२५.७७ |
| विद्युत व यांत्रिकी व्यवस्थापन | १०८.२६ |
| सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापन | ४८.९४ |
| घनकचरा व्यवस्थापन | १५४.०० |
| उद्यान व्यवस्थापन | १९.८५ |
| समाजकल्याण व्यवस्थापन | १३८.८८ |
| शिक्षण व्यवस्थापन | १८.११ |
| सार्वजनिक वाहतूक | ९३.२३ |
| नगर नियोजन व्यवस्थापन | १२५.०० |
| मालमत्ता कर | ३.२५ |
| नगरसेवक स्वेच्छा निधी | ५३.६२ |
| अन्य विभाग | १४२.८८ |
| आस्थापना/कार्यालयीन खर्च | १०८४.१२ |
| अग्रीम | १२३.३८ |
| एकूण | ३०५३.३१ |

मनपा आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी (दि.१६) मनपाची अंदाजपत्रकीय स्थायी सभा पार पडली. मुख्य लेखा व वित्त अधिकारी दत्तात्रय पाथरुट यांनी १.३९ कोटी शिलकीसह सन २०२५ - २६ चे ३ हजार ५४ कोटी ७० लाखांचे अंदाजपत्रक आयुक्त खत्री यांना सादर केले.

अंदाजपत्रकात जीएसटीच्या उत्पन्नात आठ टक्के वाढ, नवीन मिळकती मालमत्ता कराच्या कक्षेत आणणे, स्वच्छता व जलभार करात एक टक्का वाढ, जाहिरात व परवाने विभाग, नगररचनाद्वारे विकास परवानग्यातून मिळणारे उत्पन्न, भाडेतत्त्वावरील मिळकती या पारंपरिक साधनांवरच मनपाची उत्पन्नाची मदार पहायला मिळत आहे. मनपाची पाणीगळती व शुद्ध पाणी देण्यासाठी होणारा खर्च पाहता यंदा पाणीपट्टीत वाढ होऊ शकते असे बोलले जात होते. परंतु अंदाजपत्रकात पाणीपट्टी वाढीपासून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. अंदाजपत्रकात इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन, ई-बसेससाठी आडगाव ट्रक टर्मिनल येथे चार्जिंग स्टेशन, उद्यानांची दुरुस्ती, मलनिस्सारण केंद्र उभारणे व नूतनीकरण, गंगापूर धरण थेट जलवाहिनी, जुने सीबीएस ते कॅनडा कार्नर रस्ता कॉंक्रिटीकरण या जुन्याच योजनांचा समावेश पहायला मिळत आहे.

## महापालिका दोनशे कोटींच्या ठेवी मोडणार

### कर्ज घेण्याऐवजी ठेवींची घेणार मदत

**नाशिक : प्रतिनिधी**

सिंहस्थ कुंभमेळा सन २०२६ - २७ मध्ये होत असून, महापालिकेने जवळपास सात हजार कोटींचा आराखडा तयार केला आहे. दरम्यान, महापालिकेने सिंहस्थासाठीच्या विविध कामांसाठी तब्बल दोनशे कोटींच्या ठेवी मोडण्याची तयारी दर्शविली आहे.

सिंहस्थ कामात आउटर व इनर रिंगरोड, मिसिंग लिंक, मलनिस्सारण प्रकल्प उभारणे व नूतनीकरण, गोदा स्वच्छता, पाणीपुरवठा, वाहनतळ, स्वच्छता आदी कामांचा समावेश आहे. शासनाकडून निधी मिळणार असला तरी काही निधी मनपाला उभा करावा लागेल. त्या अनुषंगाने मनपाने आतापासून हालचाली सुरू केल्या आहेत.

नाशिकमध्ये दोन वर्षांनी सिंहस्थ कुंभमेळा होत असून, पायाभूत सुविधा उभारण्यासाठी कर्ज उचलण्याऐवजी महापालिकेने दोनशे कोटींच्या ठेवी मोडण्याचा निर्णय घेतला आहे. कर्ज उचलल्यास व्याजापोटी दरवर्षी मोठी रक्कम अदा करावी लागेल. त्यामुळे कर्जाऐवजी ठेवी मोडल्या जातील. मलनिस्सारण केंद्र उभारणे व अमृत दोन योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजनेसाठी केंद्र व राज्याचा हिस्सा वगळून मनपाला पन्नास टक्के खर्चाचा भार उचलावा लागेल. मनपाच्या प्राप्त उत्पन्नाव्यतिरिक्त मोठ्या निधीची आवश्यकता आहे. मनपाने ठेवीकडे मोर्चा वळवला आहे.

> मनपा कर्ज उचलण्याऐवजी दोनशे कोटींच्या ठेवी मोडणार आहे. सिंहस्थात विविध विकासकामांसाठी निधीची आवश्यकता लागणार आहे.
> - **मनीषा खत्री,** आयुक्त, मनपा

सिंहस्थासाठी दोनशे कोटी ठेवी मोडल्या जाणार आहेत. त्यामुळे कर्ज व त्याच्या व्याज परतफेडीसाठी लागणाऱ्या पैशाची बचत होईल.

## महत्त्वाचे

### बॉलिवूड क्लासिक्स मैफलने श्रोत्यांना दिले सुरेल समाधान

**नाशिक : प्रतिनिधी** बॉलिवूड म्हणजेच



हिंदी चित्रपटसृष्टीने सुरेल संगीताचा नजराणा रसिकांना दिला. शास्त्रीय संगीतातील विविध रागांवर आधारित चित्रपटांची असंख्य गाणी लोकप्रिय आहेत. त्यातील निवडक गाण्यांनी नाशिककर रसिक श्रोत्यांना सुरेल समाधान दिले. येथील स्वरांजली कराओके स्टुडिओतर्फे काल रविवारी ( दि.१६ ) ‘बॉलिवूड क्लासिक्स भाग ३’ या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संध्याकाळी ६ वाजता सार्वजनिक वाचनालयाच्या प. सा. नाट्यगृहाशेजारी मु. शं. औरंगाबादकर सभागृहात ही विनामूल्य मैफल झाली. सुरुवातीला मान्यवर रसिकांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. सागर किनारे दिल ये पुकारे... या गाण्याने प्रारंभ करण्यात आला. कोरा कागज था..., हजार राहे..., तेरे संग प्यार में..., पुछो जरा पुछो..., नैना बरसे...,हम तुम दोनो...जाने क्यूँ लोग... अशा २५ गाण्यांना रसिकांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला. इयत्ता पाचवीत शिकणाऱ्या हेमांगीसह सर्व गायकांनी रसिकांचे लक्ष वेधून घेतले व कौतुकाच्या टाळ्या मिळवल्या. शास्त्रीय संगीतावर आधारित हिंदी चित्रपटसृष्टीतील गाण्यांचा समावेश या कार्यक्रमात करण्यात आला. संयोजक हर्षद शिंत्रे आणि संजय कथुरीया यांनी स्वागत केले. गायिका पूनम शारंगधर, रेवती वाघमारे, कीर्ती नवलाखे, पूर्वा काबरा, राखी पाटील आणि हेमांगी जोशी या सहभागी झाल्या. गायकांमध्ये हर्षद शिंत्रे, संजय कथुरीया यांच्यासमवेत अविनाश विसपुते, विजय माळी, भूषण कुलकर्णी, धनंजय भावसार, विनय चंद्रात्रे यांचा समावेश होता. उत्तरोत्तर कार्यक्रमाची रंगत वाढत गेली. समीर ओतुरकर यांनी शास्त्रीय संगीत, संगीतकार व त्यांनी दिलेली गाणी याविषयी अभ्यासपूर्ण निवेदन केले. नाशिककर रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहून गाण्यांचा आस्वाद घेतला. वन्समोअर देत गायकांना प्रोत्साहन दिले.

# मध्य प्रदेशमध्ये होणाऱ्या समिटमध्ये ब्रँडिंगची संधी



**नाशिक : प्रतिनिधी**

मध्य प्रदेश सरकारतर्फे भोपाळ येथे २३ फेब्रुवारीपासून आयोजित जागतिक औद्योगिक गुंतवणूक समिटमध्ये नाशिकच्या ब्रँडिंगची नामी संधी असून, नाशिकच्या उद्योजकांनी या समिटमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मध्य प्रदेश औद्योगिक विकास महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले.

मध्य प्रदेश औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य महाव्यवस्थापक आर. पी. चक्रवर्ती, महाव्यवस्थापक एस. एस. संधू, कार्यकारी अभियंता आय. जे. शुक्ला तसेच रॉबर्ट डिसूझा आदी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी भोपाळ समिटच्या प्रचाराच्या निमित्ताने निमा हाऊस येथे भेट देऊन निमा अध्यक्ष आशिष नहार, आयमा अध्यक्ष ललित बूब यांच्यासह विविध औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली व भोपाळ समिटची विस्तृत माहिती त्यांना दिली. जागतिक दर्जाच्या अनेक कंपन्या भोपाळ समिटमध्ये सहभागी होणार असल्याने नाशिकसह महाराष्ट्रातील उद्योजकांना त्यांच्या ब्रँडिंगची नामी संधी असून, त्याचा त्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही मध्य प्रदेश औद्योगिक विकास महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी चर्चेच्या वेळी केले. गुंतवणुकीसंदर्भात नाशिकच्या उद्योजकांबरोबर परस्पर सहकार्य करण्याची तयारीही त्यांनी दर्शविली. मध्य प्रदेश सरकारच्या विनंतीचा आदर बाळगून भोपाळ समिटमध्ये नाशिकचे उद्योजक मोठ्या प्रमाणात सहभागी होतील, असे आश्वासन निमा अध्यक्ष आशिष नहार यांनी यावेळी दिले. नाशिकच्या औद्योगिक विकासाचा आढावा ललित बूब यांनी यावेळी सादर केला. चर्चेत चेंबरचे माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, किशोर राठी, राजेंद्र अहिरे, आयमाचे उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे, राजाराम सांगळे, सचिन कंकरेज, रवी महादेवकर, गोविंद झा, सचिन कंकरेज, समीर पटवा, किरण पाटील, मिलिंद राजपूत आदी उपस्थित होते.

### अधिकाऱ्यांची निमा हाऊसमध्ये बैठक




हे खेळाचे मैदान किंवा हिरवीगार शेतीही नाही. हे आहे निफाड तालुक्यातील करंजगाव पुलावरून टिपलेले गोदावरी पात्राचे छायाचित्र. संपूर्ण पात्र पाणवेलींनी वेढल्याने गोदावरी पात्राचा येथे थांगच लागत नाही. (छाया : कैलास नवले, सिन्नर)

# लग्नात वायफळ खर्च टाळत गुणवंत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत; मंत्री भुसेंकडून उपक्रमाचे कौतुक

**नाशिक : प्रतिनिधी**

**शिवसेना त्र्यंबकेश्वर तालुकाप्रमुख समाधान बोडके यांनी त्यांच्या मुलींच्या विवाहातील वायफळ खर्च टाळून नाशिक एज्युकेशन सोसायटी संचालित आश्रमशाळा, वेळूंजे आणि जिल्हा परिषद शाळा, वेळूंजे येथे गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस स्वरूपात मदत उपलब्ध करून देत एक आदर्श उदाहरण ठेवले आहे. प्रत्येकी एक लाख अकरा हजार एकशे अकरा रुपयांचा धनादेश हा दोन्ही शाळांकडे सुपूर्द करण्यात आला असून, येथील गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस स्वरूपात ही मदत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.**



लग्नांमध्ये मानपानाचे शाल, श्रीफळ, फेटे देण्याऐवजी शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या विचारांनुसार या पद्धतीला फाटा देत वायफळ खर्च टाळून तीच मदत गोरगरीब व गुणवंत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी केली जाणार आहे. समाधान बोडके यांच्या या उपक्रमाचे मंत्री भुसे यांनीही कौतुक केले असून, सर्वांनी असे बदल स्वीकारले पाहिजे. स्वतःपासून सुरुवात करावी आणि या उपक्रमाचा आदर्श इतरांनीही घ्यावा, असे आवाहनही केले.

शिवसेना त्र्यंबकेश्वर तालुकाप्रमुख समाधान बोडके यांची ज्येष्ठ कन्या चि.सौ.कां. किरण व चि. नितीन आणि द्वितीय कन्या चि. सौ. कां. शिवनेरी व चि. अविनाश यांचा विवाहसोहळा १६ फेब्रुवारी व १ मार्च रोजी पार पडत असून, या पार्श्वभूमीवर हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे. या उपक्रमातून एक आदर्श ठेवण्यात आला असून, याद्वारे प्रेरित होऊन इतरही ठिकाणी विवाह सोहळ्यांमधील शाल, श्रीफळ, बुके यांवरील वायफळ खर्च टाळून सदर रक्कम गोरगरीब, होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत म्हणून उपलब्ध करून दिली जात आहे.

समाधान बोडके यांनी यापूर्वीही गेल्या वीस ते पंचवीस वर्षांत शेकडो विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत केली आहे. आई -वडिलांचे छत्र हरपलेल्या चार वर्षांचा मुलगा आणि मुलगी यांना दत्तक घेऊन त्यांचा शाळेसह इतर खर्च करून त्यांचे लग्नही करून दिले. गोरगरीब मुलींचे कमी वयात लग्न करून न देता त्यांना उच्च माध्यमिक शिक्षणाकरिता प्रोत्साहन देऊन अनेक मुला-मुलींना त्यांनी शिक्षणासाठीही मदत केली आहे.

मंत्री भुसे यांच्या हस्ते सदर धनादेश शाळेच्या मुख्याध्यापकांना देण्यात आला. यावेळी पालघर सहायक निरीक्षक प्रदीप गिते, शांताराम लहाने, भाऊसाहेब खातळे, नामदेव खातळे, शिवसेना महिला आघाडी संपर्कप्रमुख स्नेहल म्हात्रे, बाजार समिती उपसभापती युवराज कोठुळे, संचालक उत्तमराव खांडबहाले, तालुका संघाचे व्हा. चेअरमन दिलीपराव चव्हाण, संचालक नवनाथ कोठुळे, संजय चव्हाण, निवृत्ती लांबे, संपतराव चव्हाण, भूषण अडसरे, शिवाजी कसबे, रावसाहेब कोठुळे, रंगनाथ मिंधे, कैलास मिंढे, अशोक चव्हाण, गटशिक्षणाधिकारी सूर्यवंशी, शिक्षण विस्ताराधिकारी राज आहेर, केंद्रप्रमुख मैंद, ना. ए. सो. चे संचालक बी. डी. आहिरे, मुख्याध्यापक गोपाळ अहिरे, सरपंच वाळू उभडे, भावडू बोडके उपस्थित होते.

## संपादकीय

# काळाचा घाला



उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे भरलेल्या महाकुंभमध्ये काही अप्रिय घटना घडल्या आहेत. मौनी अमावस्येच्या दिवशी म्हणजे २९ जानेवारी रोजी महाकुंभमध्ये काहीतरी अफवा पसरल्याने झालेल्या चेंगचेंगरींत ३० भाविकांचा मृत्यू झाला. या घटनेला काही दिवस उलट नाही तोच नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर अशीच चेंगचेंगरींची घटना घडून १८ भाविकांना प्राण गमवावे लागले. महाकुंभसाठी जाणार्या विशेष गाडीत बसण्यासाठी भाविकांना धावपळ करावी लागल्याने ही घटना घडली. ही घटना महाकुंभमध्ये घडली नसली, तरी तिचा संबंध महाकुंभशी आहे. उत्तर प्रदेश सरकारने महाकुंभसाठी चोख व्यवस्था केली असली, तरी काही अप्रिय घटना घडलेल्या आहेत. महाकुंभमध्ये साधूसंत आणि भाविकांसाठी उभारण्यात आलेल्या तंबूंना आतापर्यंत तीन वेळा आगी लागल्या आहेत. याशिवाय महाकुंभसाठी येताना आणि जाताना अनेक भाविक अपघातांमध्ये मरण पावले आहेत. केवळ श्रध्देपोटी भाविक महाकुंभमध्ये स्नान करण्यासाठी जात आहेत. पण, त्यांच्यावर काळ घाला घालत आहे. प्रयागराज येथे गंगा, यमुना व विलुप्त सरस्वती या नद्यांच्या पवित्र त्रिवेणी संगमावर पौष पौर्णिमेपासून म्हणजे १३ जानेवारीपासून महाकुंभमेळा भरला आहे. दर १२ वर्षांनी होणाऱ्या महाकुंभसाठी हजारो साधू-संतांसह प्रयागराजमध्ये दाखल झाले आहेत. याशिवाय दररोज कोट्यवधी भाविक महाकुंभमध्ये सहभागी होत आहेत. महाकुंभमेळ्यातील व्यवस्था १० हजार एकर जागेवर करण्यात आली आहे. या महाउत्सवासाठी जगातील सर्वात मोठे तात्पुरते शहर उभारण्यात आले असून, त्यात १ कोटी भाविक सामावले जाऊ शकतात. महाकुंभमध्ये आतापर्यंत कोट्यवधी भाविकांनी स्नान केले असून, यामध्ये राजकीय नेतेमंडळी, विविध क्षेत्रातील सिलिब्रेटीज् यांचा समावेश आहे. त्यांच्या स्नानांची दृश्ये आणि छायाचित्रे मीडियात झळकत असतात. त्यामुळे सामान्यांनाही स्नान करावेसे वाटते. शेवटी हा श्रध्देचा प्रश्न आहे. महाकुंभात स्नान केल्याने सर्व पापे नष्ट होतात आणि पुण्य लाभते, ही एक श्रध्दा असल्याने भारतच नव्हे, तर जगभरातून भाविक प्रयागराजमध्ये दाखल होत आहेत. जास्तीत जास्त भाविकांनी महाकुंभमेळ्यासाठी यावे, असे आवाहनच उत्तर प्रदेश सरकारने केले असल्याने दिवसेंदिवस गर्दी वाढत आहे. इतक्या मोठ्या इव्हेंटचे व्यवस्थापन करण्यात सरकार आणि विविध सरकारी संस्थांनी कोणतीही कसूर बाकी ठेवली नसली, तरी महाकुंभात आणि महाकुंभाच्या बाहेर काही अप्रिय घटना घडत आल्या आहेत. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर शनिवारी रात्री झालेली चेंगराचेंगरी ही त्यातलीच. या घटनेत १८ भाविकांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले. श्रध्दा म्हणून भाविक प्रयागराजकडे आपल्या जिवाची पर्वा न करता जात आहेत. तिकडे जाताना आणि तिकडून येताना आपल्या जिवाला धोका असल्याची पूर्ण जाणीव असूनही भाविकांचा ओघ काही थांबलेला नाही. प्रयागराजकडे जाण्यासाठीच रेल्वेने देशभरात विविध ठिकाणाहून स्पेशल गाड्यांची व्यवस्था केलेली आहे. या गाड्यांना तुफान गर्दी होत आहे. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर अशीच गर्दी झाली. गर्दीत काहीतरी समज-गैरसमज पसरल्याने चेंगचेंगरी झाल्याचे दिसून येत आहे. जेव्हा स्पेशल गाड्या सोडल्या जातात तेव्हा भाविकांची गर्दी होणार, याचा अंदाज रेल्वेला असतो. अशा प्रसंगी गर्दीचे व्यवस्थापन करणे तितकेच महत्त्वाचे असते. थोडीशी चूकही संकटाला निमंत्रण देणारी ठरते, हे महाकुंभमध्ये झालेल्या चेंगचेंगरींच्या घटनेतून दिसून आले आहे. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर प्रशासनाने गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी यंत्रणा कार्यरत केली असेलच पण ती कुठेतरी कमी पडली, असेच दिसते. ही घटना नेमकी कशी घडली, याची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. पण, जी काही प्राथमिक माहिती उपलब्ध झाली आहे, त्यावरुन केवळ अफवा आणि धांदलीमुळे ही चेंगराचेंगरी झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. पाटण्याकडे जाणारी मगध एक्स्प्रेस प्लॅटफॉर्म क्रमांक १४ वर उभी होती आणि जम्मूकडे जाणारी उत्तर संपर्क क्रांती एक्स्प्रेस प्लॅटफॉर्म क्रमांक १५ वर उभी होती. यावेळी मोठ्या प्रमाणात गर्दी होती. याच दरम्यान, प्लॅटफॉर्म क्रमांक १४-१५ कडे जाणाऱ्या एक प्रवासी पायऱ्यांवरून पाय घसरुन पडला. त्यामुळे त्याच्या मागे असलेले अनेक प्रवासी धडकल्याने चेंगराचेंगरी झाली, असे उत्तर रेल्वेच्या जनसंपर्क अधिकाऱ्याने सांगितले. घटनास्थळी असलेल्या एका हमालाने दिलेली माहिती वेगळी आहे. प्रयागराजची स्पेशल गाडी प्लॅटफॉर्म क्रमांक १२ वरुन येणार होती. पण, ती अचानक १४ वर येईल, अशी सूचना स्थानकावरुन देण्यात आल्याने १२ वरील प्रवाशांनी १४ कडे धाव घेतली. त्याचवेळी बाहेरून येणारे प्रवाशीही १४ वर जाऊ लागले. यामुळे सरकते जीने आणि इतर जिन्यांवर एकच गर्दी उसळल्याने चेंगराचेंगरी झाली, असे हमालाचे म्हणणे आहे. कोण काय म्हणत आहे, याला महत्व असले, तरी चौकशीतून खरे कारण समोर येईल. पण, अशा दुर्घटना यापुढे टाळण्यासाठी सरकार आणि संबंधित सेवा संस्थांनी विशेष दक्षता घेतली पाहिजे. प्रयागराज-मिर्झापूर महामार्गावर शुक्रवारी बोलेरो आणि बसची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात १० जण जागीच ठार झाले. बोलेरोतील सर्व प्रवासी छत्तीसगडच्या कोरबा जिल्ह्याचे रहिवासी असून सर्व भाविक महाकुंभमेळ्याला जात होते. मध्य प्रदेशातील जबलपूर जिल्ह्यात महामार्गावरून जाणाऱ्या ट्रकला गाडी धडकल्याने महाकुंभवरून परतणाऱ्या आंध्र प्रदेशातील सात जणांचा मृत्यू झाला. आग्रा येथील एका जोडप्याचा सोमवारी महाकुंभमेळ्यावरून परत येताना ट्रकसोबत झालेल्या अपघातात मृत्यू झाला. उत्तर प्रदेशातील सोनभद्र येथे सोमवारी महाकुंभामेळ्यावरून परत जात असताना कारची बससोबत धडक झाल्याने ओडिशाच्या राउरकेला येथील एका व्यक्तीचा मृत्यू झाला. राजस्थानातील कोटा येथे महाकुंभ यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या बसने ट्रकला धडक दिली. या घटनेत आणखी तीन जणांना आपला जीव गमवावा लागला. माघी पौर्णिमा स्नानापूर्वी संगमावर बोट उलटण्याची दुर्घटना घडली. या घटनेत १० भाविक पाण्यात बुडाले. त्यापैकी ८ जणांना पुन्हा बाहेर काढण्यात यश आले तर दोन जणांचा शोध लागला नाही. अशा अनेक घटना भाविकांवर घाला घालणाऱ्या घडल्या आहेत. येत्या २६ फेब्रुवारीला महाकुंभ संपणार आहे. पुण्य पदरात पाडताना भाविकांनी सजग राहून आपली काळजी घ्यावी.

## विचारधन




### नाम भावयुक्त अंत:करणाने घ्यावे ।

मला आज देवाची गरज अशी वाटत नाही हे खरे, पण ती कशी वाटेल याचा तरी आपण विचार करावा. भगवत्चिंतनाने, नामाने ही गरज भासू लागते. गरज इतकी भासली पाहिजे की, अन्नपाणीसुद्धा गोड लागू नये. जितकी आग जोराची तितका पाण्याचा मारा जास्त हवा, तसे जितकी देहबुद्धी बळकट तितका नामाचा जोर अधिक पाहिजे. नामात प्रेम नाही म्हणून ते घेण्याचे सोडू नये. पाण्यात पडल्यावर पुढे पोहायला येते. काशीला गेले नाही तरी काशीस जायचे असे तरी म्हणावे; त्याप्रमाणे नामात प्रेम वाटत नसले तरी, नामात प्रेम आहे असे नित्य म्हणावे. नामाशिवाय दुसरे सत्य नाही, दुसरे साधन नाही, असा दृढ विश्वास झाला म्हणजे नाम घेतल्याशिवाय राहवत नाही आणि ते घेतल्याने त्याच्या सहवासाने, त्याचे प्रेम येते. संत देव आहे असे म्हणतात, मीही देव आहे असे म्हणतो; फरक इतकाच की, माझे म्हणणे अनुमानाचे असते, त्यांचे प्रत्यक्ष अनुभवाचे असते. संत देहातीत असतात; त्यांच्याजवळ गेल्याने देहाभिमान कमी होतो. प्रत्यक्ष गेले नाही तरी चालेल; भाव ठेवून कार्य जितके लवकर होते तितके देहाच्या सहवासाने होत नाही. तीर्थास तीर्थपण, देवास देवपण आणि गुरूस गुरूपण आपण आपल्या भावनेने देतो. तीर्थास जाऊन जर 'आपण याने निष्पाप होऊ' अशी भावना असली तरच मला तीर्थाचे स्नान होईल, नाहीतर मला ते नुसते पाणीच आहे! थोडक्यात म्हणजे, सर्व काही भावनेत आहे. नाम हे भाव उत्पन्न करते. भावयुक्त अंत:करणाने आपण नाम घेतले म्हणजे आपले काम शीघ्र होते. साधूंची अगर संतांची लक्षणे आपल्या अंगात ती बाणून घेण्याकरिता सांगितली आहेत. परंतु, त्या लक्षणांवरून साधू ओळखता येणार नाही; साधू होऊनच त्याला ओळखले पाहिजे. प्रापंचिकाला त्याला ओळखायचे असेल तर त्याने आपल्यावर त्याच्या संगतीचा काय परिणाम झाला हे पाहावे; म्हणजे आपल्यावरूनच त्याला ओळखायचे. आपल्या मनाला काही वेळ तरी शांती मिळाली, आपला मीपणा थोडा तरी कमी झाला, मन निर्विषय झाले, निदान निर्विषय राहावे असे वाटू लागले, तर ते साधूचे स्वरूप आहे असे समजावे. साधू सर्वांभूती भगवद्भाव किंवा सर्वत्र मीच आहे असे पाहतात.

# शासकीय शिवजयंती तिथीनुसार साजरी व्हावी!

**युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्रातील जनतेसाठी अवताराहून कमी नाहीत. त्यामुळे त्यांचा जन्मदिन तिथीनुसारच साजरा व्हावा यासाठी अनेक संघटना, संस्था आणि इतिहासप्रेमी आग्रही आहेत.**



भारतीय संस्कृतीत वाढदिवस हिंदू कालगणनेनुसार म्हणजेच तिथीनुसार साजरे करण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. आजही अनेक घरांत पिढ्यान्पिढ्या ही प्रथा जपली जात आहे. बदललेली शिक्षणपद्धती, इंग्रजी भाषेला दिले गेलेले अवास्तव महत्त्व, तरुणवर्गावर पाश्चात्य संस्कृतीचा वाढता प्रभाव आणि त्याअनुषंगाने बदलत गेलेले राहणीमान यांमुळे दैनंदिन जीवनात तिथीचा वापर करणे हळूहळू कमी होत गेले. आजमितीला तिथीचा उल्लेख केवळ लग्नपत्रिकांवरच पाहायला मिळतो. या भारतभूमीत होऊन गेलेले देवतांचे अवतार, संत-महात्मे यांचे प्रकटदिन, जयंती आणि पुण्यतिथी हे आजही तिथीनुसारच साजरे केले जातात. मकरसंक्रांत वगळता हिंदू धर्मातील समस्त सण-उत्सवही तिथीवरच आधारित आहेत. या महाराष्ट्रभूमीत जन्माला येऊन साऱ्या विश्वाला आदर्श राज्यकारभाराचा गुरुमंत्र देणारे, आपल्या अतुल पराक्रमाने, अचाट बुद्धिचातुर्याने, कुशल रणकौशल्याने आणि प्रबळ इच्छाशक्तीने शून्यातून स्वराज्य निर्माण करणारे युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्रातील जनतेसाठी अवताराहून कमी नाहीत. त्यामुळे त्यांचा जन्मदिन तिथीनुसारच साजरा व्हावा यासाठी अनेक संघटना, संस्था आणि इतिहासप्रेमी आग्रही आहेत. समाज ऐक्यासाठी आणि लोकजागरणासाठी लोकमान्य टिळकांनी शिवजयंती सुरू केली, तीही तिथीनुसारच. मात्र, त्या काळापासून छत्रपती शिवरायांच्या जन्मतिथीबाबत बराच घोळ आहे. शिवरायांची जन्मतिथी इतिहासकालीन अनेक पुराव्यांमध्ये वेगवेगळी असल्याचे दिसून येते. शिवरायांच्या जन्मतिथीचा हा वाद १०० वर्षांहून अधिक काळ सुरू होता अखेर महाराष्ट्र शासनाने शिवजयंतीची तारीख निश्चित करण्यासाठी एक समिती स्थापन केली. २००१ साली या समितीने इतिहासकालीन दस्तावेज आणि इतिहासतज्ज्ञांचे मत विचारात घेऊन शिवाजी महाराजांची जयंती म्हणून फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ म्हणजेच १९ फेब्रुवारी १६३० या तारखेवर शिक्कामोर्तब केले. या तारखेबाबतही एक घोळ झाला आहे. फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ या तिथीला अनुसरून निश्चित केलेली १९ फेब्रुवारी ही तारीख ज्युलियन कॅलेंडरनुसार आहे. ज्युलियन कॅलेंडर आता कालबाह्य झाले असून, सध्याची इंग्रजी कालगणना ही ग्रेगेरिअन कॅलेंडरनुसार प्रचलित आहे. ग्रेगेरिअन कॅलेंडरनुसार फाल्गुन वद्य

**दृष्टिक्षेप**
**जगन घाणेकर**
**९६६४५५९७८०**

तृतीया शके १५५१ या तिथीला १ मार्च १६३० ही इंग्रजी तारीख येते. १९ फेब्रुवारी ही तारीख राज्य शासनाने गठित केलेल्या समितीने निश्चित केल्यामुळे सध्या शासकीय शिवजयंती १९ फेब्रुवारीलाच साजरी केली जाते.

शासनाने जरी शिवजयंती १९ फेब्रुवारीला साजरी करण्याचे निश्चित केले असले, तरी राज्यातील बहुतांश भागात आजही शिवजयंती तिथीनुसार साजरी केली जाते. छत्रपती शिवाजी महाराज भारतातील असे एकमेव राजे असावेत ज्यांची जयंती दरवर्षी इंग्रजी तारखेप्रमाणे आणि हिंदू कालगणनेनुसार तितक्याच जल्लोषात साजरी केली जाते. ज्या शिवरायांनी आपले अखंड आयुष्य हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी वेचले त्यांची जयंती ख्रिस्ती कालगणनेनुसार साजरी व्हावी हे खरेतर मनाला खटकणारे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करताना परकीय कालगणना झिडकारून 'राज्याभिषेक शक' ही स्वकीय कालगणना चालू केली. परकीय चलनाचा वापर थांबवून स्वकीय चलनाची निर्मिती केली. इतकेच नव्हे, तर परकीय भाषा, संस्कृती आणि तिची प्रतीके झुगारून स्वकीय भाषेत राज्यकारभार केला, स्वसंस्कृतीचे रक्षण केले. मराठी भाषेच्या शुद्धीकरणासाठी शिवरायांनी केलेल्या प्रयत्नांची इतिहासात सविस्तर नोंद आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे प्रत्यक्ष देव किंवा अवतार नसले, तरी त्यांच्यामुळे हिंदूंच्या मंदिरातील देव शाबूत राहिले. त्यामुळे हिंदूंना ते देवाच्या स्थानी आहेत. प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी दाखवलेले अफाट शौर्य हे अवतारी कार्याहून कमी नाही. त्यामुळे हिंदूंना ते रामकृष्णादी अवतारांप्रमाणेच पूजनीय आहेत. शिवजयंती देव, अवतार आणि संत यांच्याप्रमाणे तिथीनुसार म्हणजेच फाल्गुन वद्य तृतीयेला साजरी केली जावी, ही मागणी गेली अनेक वर्षे शिवप्रेमींकडून लावून धरली जात आहे. आजमितीला शिवजयंती केवळ राज्याच्या सीमेपुरती मर्यादित राहिलेली नाही. सातासमुद्रापार ज्या ज्या ठिकाणी मराठी नागरिक बहुसंख्येने आहेत, त्या ठिकाणी शिवजयंती जल्लोषात साजरी केली जाते. त्यामुळे ती इंग्रजी तारखेनुसार साजरी व्हायला हवी, असे मत राज्याने गठित केलेल्या समितीतील काही सदस्यांनी व्यक्त केले होते. खरेतर केवळ शिवजयंतीच नव्हे तर गणेशोत्सव, दिवाळी, होळी यांसारखे सण आणि उत्सव भारतीय नागरिक ज्या ज्या देशांत आहेत. त्या त्या ठिकाणी प्रतिवर्षी उत्साहाने साजरे केले जातात. हे सारे सण तिथीनुसार साजरे होऊ शकतात. मग शिवजयंतीच्या बाबतीत इंग्रजी तारखेचा अट्टहास संयुक्तिक वाटत नाही.

आज राज्यावर शिवसेना आणि भाजप या शिवप्रेमी आणि हिंदुत्ववादी पक्षांचे शासन आहे. शिवसेनेच्या स्थापनेपासून पक्षाच्या शाखाशाखांतून शिवजयंती उत्सव हे तिथीनुसारच साजरे करण्यात आले आणि यापुढेही ते तिथीप्रमाणेच साजरे केले जातील यात शंका नाही. याआधीही भाजपसोबत सत्तेत असताना शिवजयंती तिथीप्रमाणे साजरी करण्याचा आग्रह शिवसेनेने धरला होता. शिवप्रेमींच्या मागणीखातर गडकिल्ल्यांवरील अतिक्रमणाच्या विरोधात कठोर भूमिका घेणाऱ्या माननीय मुख्यमंत्र्यांनी शिवप्रेमींची अनेक वर्षे प्रलंबित असलेली ही मागाणीसुद्धा पूर्ण करावी.

# क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे


**आज १७ फेब्रुवारी, स्वातंत्र्यसंग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात -अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले. त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.**

वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले, त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती. मात्र, दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकारांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे (राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावांच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्धकलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्धकलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली, मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात

**स्मृतिदिन**
**श्याम ठाणेदार**
**९९२२५४६२९५**

स्वातंत्र्यप्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शहीद झाले. त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्धकलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यातील रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्धकौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र, बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले, मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले. हे दोघेही लहुजींचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतिकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांना चुकवण्यासाठी लहुजी हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले. या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. यातून त्यांनी क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात लहुजींची प्राणज्योत मालवली.

# नोकरी, शिक्षणाकरिता कॅनडात जाणे कठीण झाले



अमेरिका, इंग्लंड यांनी अनधिकृतपणे निवास करणाऱ्या विदेशी नागरिकांना देशाबाहेर काढण्याच्या मोहिमा सुरू केल्यानंतर कॅनडा या देशानेही आपले इमिग्रेशन नियम अधिक कडक केले आहेत. कॅनडा गॅझेट २ मध्ये प्रकाशित होणाऱ्या नियमांनुसार इमिग्रेशन अधिकारी यापुढे अभ्यास आणि कामाच्या परवान्यांनुसार तात्पुरते निवासी कागदपत्रे रद्द करू शकतील. त्यांना तसे नवे अधिकार देण्यात आले आहेत. खोटी माहिती देणे, गुन्हेगारी स्वरूप, विदेशी नागरिकांची बदललेली परिस्थिती यांसारख्या कारणांनी प्रवास आणि तात्पुरता दिलेला निवास व्हिसा इमिग्रेशन अधिकारी रद्द करू शकतात. एखादा परवानाधारक कायमचा रहिवासी झाला आणि त्याचा मृत्यू झाला किंवा प्रशासकीय चुकीमुळे कागदपत्रे जारी केली गेल्यास त्याला अभ्यास आणि कामासाठी दिलेले परवाने रद्द केले जाऊ शकतात. तिथे दिलेल्या अभ्यास परवान्यांच्या गैरवापराच्या प्रकारांचे प्रमाण कमी करण्यासाठी हे बदल करण्यात येत असल्याचे सांगितले जाते. कॅनडातील इमिग्रेशन प्रणालीची विश्वासार्हता चांगल्या पद्धतीने टिकून राहावी आणि तात्पुरते निवासी व्हिसा मिळालेले लोक व्हिसांच्या अटींचे योग्यरीत्या पालन करतात याची पुरेशी खात्री करून घेण्यासाठी हे उद्देश असल्याचे म्हटले जात आहे. कॅनडातील इमिग्रेशन नियमांत सातत्याने बदल केले जातात. त्याचा भारतातून नोकरी किंवा कामांनिमित्त जाणाऱ्या लोकांची छाननी, पूर्ण तपासणी करण्याच्या निर्णयांनी दडपण आणणारे परिणाम होतील असे अंदाज वर्तवण्यात येत आहेत. आयआरसीसी सीमा सुरक्षित करण्यासाठी आणि कॅनडाच्या इमिग्रेशन प्रणालीचे संरक्षण करण्यासाठी विविध प्रक्रिया आणि साधनांमध्ये आयआरसीसी सुधारणा करीत राहील असे सांगण्यात येत आहे. त्यामुळे कॅनडात जाणाऱ्या लोकांच्या परवान्यांवर लादली जाणारी बंधने चिंता वाढविणारी आहेत असे म्हणता येईल. उच्च शिक्षण घेऊनही देशात नोकरी मिळू शकत नाही. ज्या देशांत पूर्वी पदव्युत्तर उच्च शिक्षण घेऊन हजारो तरुण-तरुणी यांनी आपले जीवन स्थिरावले होते. त्याच देशांनी नव्याने लादलेल्या नियमनांमुळे तिथे नोकरी-व्यवसाय मिळविण्यासाठी प्रयाण करणे कठीण करून ठेवले आहे.

**-राजन पांजरी, जोगेश्वरी**

## जनमनाचे प्रतिध्वनी

### 'लव्ह जिहाद'विरोधी कायद्याचे स्वागत!

राज्यात लवकरच लव्ह जिहादविरोधी कायदा करण्याचे सूतोवाच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. देशभरातील ८ राज्यांत हा कायदा याआधीच लागू करण्यात आला आहे. तथाकथित शांतीप्रिय समाजातील तरुणांकडून हिंदू मुलींना फूस लावून त्यांचे धर्मांतर केले जाते, त्यांचा उपभोग घेऊन मुले जन्माला घातली जातात. नंतर त्यांना वाऱ्यावर सोडले जाते अथवा आखाती देशांत त्यांची विक्री केली जाते. या सर्वांना विरोध करणाऱ्या मुलींची हत्या केली जाते. त्यांची प्रेते रस्त्यालगत गोण्यांमध्ये, सुटकेसमध्ये अथवा फ्रीजमध्ये भरली जातात. एकामागोमाग अशी अनेक प्रकरणे उघडकीस आल्याने अनेक हिंदुत्ववादी संघटना याविरोधात जागृत झाल्या. या सर्वांमागे मोठे षडयंत्र कार्यरत असून, हिंदू मुलींना प्रेमाच्या जाळ्यात अडकवण्यासाठी या समाजातील तरुणांना बाइक, पैसे, महागड्या वस्तू पुरवण्यासाठी अर्थसहाय्य मिळते हेही चौकशीतून सिद्ध झाले आहे. हे षडयंत्र संपूर्ण देशभरात कार्यान्वित असून, समाजाचे संख्याबळ वाढवणे. हिंदूंचा वंशविच्छेद करणे हाच उद्देश या षडयंत्रामागे असल्याचेही उघड झाले आहे. हिंदूंच्या मुळावर उठलेल्या या षडयंत्राविरोधात कायदा व्हावा यासाठी राज्यातील अनेक संघटना मागील काही वर्षांपासून आंदोलने करत आहेत. शासनदरबारी निवेदने आहेत. या संघटनांच्या लढ्याला अखेर यश येण्याची चिन्हे दिसून येत असून, लवकरच लव्ह जिहादविरोधी कायदा महाराष्ट्रातही लागू होणार आहे.

**- मोक्षदा घाणेकर, मुंबई**

### शिंदेंचा सुखद धक्का

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या वाढदिवशी, चालक आणि वाहक जिथे विश्रांती घेतात. त्या ठाण्यातील खोपट येथील वातानुकूलित विश्रांतीगृहाचे उद्घाटन करून, त्यांनी चालक आणि वाहक यांना सुखद धक्काच दिला, असे म्हणावयास हवे. याचे कारण आपले कर्तव्य करून दमलेल्या, उन्हाने घामाच्या धारा लागलेल्या, चालक आणि वाहकांना निदान घटकाभर तरी गारव्याचा सुखद अनुभव घेता आल्यामुळे त्यांना ताजेतवाने झाल्यासारखे वाटेल. एक अनाकलनीय गोष्ट म्हणजे, शिंदे म्हणतात की, एसटी आगारे ही विमानतळाप्रमाणे तयार करणार. यावर शिंदे एवढेच सांगावेसे वाटते की, एसटी आगारे ही खड्डेमुक्त असावीत. त्यावर चांगले सिमेंट काँक्रिटीकरण केलेले असावे. प्रवाशांना बसण्यासाठी उत्तम आसनाची व्यवस्था असावी. तसेच एसटीवर धुळीचे जे थर साचलेले असतात. तसेच एसटी गाड्यांची अवस्था बिकट असते. चेपलेले पत्रे, खिळखिळी झालेली दारे, मोडकळीस आलेल्या खिडक्या याची डागडुजी करणे गरजेचे आहे. आगारातील प्रसाधनगृहे, कॅन्टीन सेवेमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. एसटीला निश्चितच सुगीचे दिवस येतील. **- गुरुनाथ मराठे**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टॅंडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### ऑनलाइन घोटाळ्यापासून सावध करणाऱ्या 'फ्रॉम चायना विथ लव्ह'चा ट्रेलर समोर




**मुंबई :** सध्या ऑनलाइन घोटाळ्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. घोटाळेबाज फसवणुकीसाठी नवनवीन युक्त्या वापरत आहेत. ऑनलाइन खरेदीकडे लोकांचा वाढता कल बघता, घोटाळेबाज ऑनलाइन ग्राहकांची फसवणूक करण्यासाठी नवनवीन युक्त्या शोधत आहेत. या घोटाळ्यांमुळे अनेकांची बँक खातीदेखील रिकामी झाली आहेत. हे सायबर चोरटे लोकांचा पैसा लुटण्यासाठी वेगवेगळी तंत्रे अवलंबताना दिसतात. सायबर चोरट्यांच्या यूपीआय घोटाळ्याने नागरिकांची डोकेदुखी वाढवली आहे. अनेकांची घरं उद्ध्वस्त झाली आहेत. या सर्व प्रकारात जेव्हा सर्वसामान्य नागरिक अडकतो तेव्हा तो याचा नेमका कसा सामना करतो याचं उत्तम उदाहरण म्हणजे फ्रॉम चायना विथ लव्ह हा चित्रपट होय. नुकताच 'फ्रॉम चायना विथ लव्ह या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा पुण्यात अगदी दणक्यात साजरा झाला. यावेळी चित्रपटाची संपूर्ण टीम उपस्थित होती. हा सिनेमा आजपर्यंत भारतातील कुठल्याच भाषेतील फिल्म इंडस्ट्री बोलू शकली नाही अशा विषयावर भाष्य करतो. online money fraud सध्याचं एक अदृश्य चक्रव्यूह आहे. ज्यात माणूस खूप सहजतेने अडकतो पण त्यातून बाहेर येण्याचा मार्ग काही त्याला सापडत नाही. एखादी सर्वसामान्य व्यक्ती जेव्हा या सगळ्यात अडकते तेव्हा काय काय घडतं आणि ते तुमच्या सोबत घडू नये असं वाटत असेल तर हा सिनेमा आवर्जून पाहायला हवा. 'अनिकेत वाघ क्रिएशन' अंतर्गत बनलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन,अभिनय,लेखन आणि निर्माता अशी चौफेर धुरा अनिकेत वाघ यानी उत्तमरित्या सांभाळली आहे. अनिकेत वाघसह चित्रपटात अंकुश मांडेकर,सिद्धेश्वर झाडबुके, गायत्री बनसोडे, सोनाली भांगे, निलेश होले, प्रसाद खेडकर ही कलाकारांची फौज पाहायला मिळतेय. तर चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी प्रशांत फासगे यांनी सांभाळली आहे. तसेच चित्रपटाचे शीर्षक गीत कश्मिरा खोत हिने स्वरबद्ध केले आहे. तुम्हाला या ऑनलाइन फ्रॉडमध्ये अडकायचे नसल्यास नेमक काय करावं हे पाहण्यासाठी येत्या २८ फेब्रुवारी २०२५ ला जवळच्या चित्रपटगृहात जाऊन नक्की पाहा फ्रॉम चायना विथ लव्ह.

### 'प्रेमाची गोष्ट २' चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला




**मुंबई :** व्हॅलेंटाइन डेला एव्हरेस्ट एंटरटेनमेंटने चित्रपटप्रेमींना एक खास भेट दिली आहे. 'प्रेमाची गोष्ट २' या बहुप्रतीक्षित चित्रपटाची पहिली वहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आली असून एव्हरेस्ट एंटरटेनमेंटकडून सर्व चित्रपटप्रेमींसाठी व्हॅलेंटाईनची ही खास भेट ठरली आहे. 'मुंबई-पुणे-मुंबई', 'प्रेमाची गोष्ट', 'ती सध्या काय करते', 'ऑटोग्राफ' अशा सुपरहिट प्रेमकथा सादर करणारे प्रख्यात दिग्दर्शक सतीश राजवाडे एक नवीन प्रेमकथा निर्माते संजय छाब्रिया यांच्यासह घेऊन येत आहेत. लग्नाच्या गाठी स्वर्गात जुळतात असं म्हणतात, पण जेव्हा प्रेम आणि नशीब आपल्या प्लॅनिंगनुसार ठरेल तेव्हा आयुष्यात काय घडेल? असंच काही या चित्रपटात ललितच्या बाबतीत घडणार आहे. प्रेम आणि नशीबाची ही जादुई सफर पाहाणं नक्कीच मनोरंजक ठरेल. या चित्रपटात महाराष्ट्राचा लाडका अभिनेता ललित प्रभाकर प्रमुख भूमिका साकारत आहे. अभिनेत्री ऋचा वैद्यसह हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीत आपली छाप सोडणारी अभिनेत्री रिधिमा पंडित ही चित्रपटात दिसेल. प्रेक्षकांना या तिन्ही कलाकारांची कमाल केमिस्ट्री पाहायला मिळेल. निर्माते संजय छाब्रिया म्हणतात, प्रेमाचा दिवस म्हणून ओळखला जाणाऱ्या व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने 'प्रेमाची गोष्ट २' या चित्रपटाची झलक प्रेक्षकांच्या भेटीला आणणं आमच्यासाठी खूप खास आहे. दिग्दर्शक सतीश राजवाडे म्हणतात, प्रेमकथा सर्वांच्याच आठवणीतल्या असतात. त्या काळाच्या पलीकडे ही टिकतात. मी याआधी ही काही प्रेमकथा सादर केल्या आहेत. 'प्रेमाची गोष्ट २' ही माझी सातवी प्रेमकथा असून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सादर केलेली अतिशय आधुनिक प्रेमकथा आजच्या पिढीला नक्कीच आवडेल. एव्हरेस्ट एंटरटेनमेंट प्रस्तुत 'प्रेमाची गोष्ट २' या चित्रपटाचे दिग्दर्शन सतीश राजवाडे यांनी केले असून निर्माते संजय छाब्रिया आहेत तर सह निर्माते अमित भानुशाली आहेत. प्रेक्षकांसाठी गाजलेल्या प्रेमकथा घेऊन येणारे सतीश राजवाडे आणि एव्हरेस्ट एंटरटेनमेंट आता आणखी एक प्रेमकथा घेऊन येत असल्याने प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. प्रेम आणि नशीबाचा हा जादुई प्रवास येत्या जून २०२५ मध्ये अनुभवायला मिळेल.

### 'मनमोही' गाण्यातील सावनी आणि अभिजितच्या अभिनयाची झलक समोर

**मुंबई :** सर्वत्र व्हॅलेंटाइन वीक सुरू असल्याचं पाहायला मिळतंय.



आणि या व्हॅलेंटाइन वीक दरम्यान अनेक नवनवीन प्रेमगीत प्रेक्षकांच्या भेटीस येत आहेत. अशातच सर्वांची लाडकी, राष्ट्रीय पुरस्कार विजेती गायिका सावनी रवींद्र हिच्यासुद्धा एका सुंदर अशा गाण्याने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलं आहे. सावनीने आजवर अनेक भाषांमध्ये गायन केले आहे. तसेच मराठी आणि इतर भाषिक चित्रपटांसाठी अनेक सुमधुर गाणी गायली आहेत. 'मनमोही' असे या गाण्याचे नाव असून या गाण्यात सावनी रवींद्रसह सुप्रसिद्ध अभिनेता अभिजित खांडकेकरने मध्यवर्ती भूमिका साकारली आहे. तसेच लोकप्रिय बालकलाकार केया इंगळे हिने साकारलेली भूमिका ही लक्षवेधी ठरली आहे. मनमोहीचं सुंदर संगीत प्रणव हरिदास याचे असून, वलय मुळगुंद याचे शब्द मनाला भावणारे आहेत. सावनी बरोबर या गाण्यात सुप्रसिद्ध गायक अभय जोधपुरकर याच्या आवाजाची जादू अनुभवायला मिळते. गाण्याबद्दल बोलताना सावनी म्हणाली, या गाण्याला अल्पावधीतच प्रेक्षकांचा मिळालेला पाठिंबा पाहून खूप छान वाटतंय. सावनी ओरिजनलचं हे पहिलं असं मराठी गाणं आहे ज्यात मी गायन आणि अभिनयाच्या दोन्ही भूमिका साकारल्या आहेत. आजवर 'सावनी ओरिजनल'मध्ये मी तामिळ, तेलगू, मल्याळम, बंगाली, गुजराती अशा विविध भाषांमध्ये गाणी गायली होती पण आज मी पण मराठी गाण्यातून पहिल्यांदाच प्रेक्षकांच्या भेटीसाठी येत आहे. यंदाच्या लग्नसराईमध्ये हे गाणं धुमाकूळ घालेल यात शंका नाही.

# म्युच्युअल फंड योजनांचे वर्धापन दिवस

| | | |
|---|---|---|
| १) | एच.डी.एफ.सी. लार्ज कॅप ॲण्ड मिड कॅप फंड | १८.०२.१९९४ |
| २) | ॲक्सिस मिड कॅप फंड | १८.०२.२०११ |
| ३) | फ्रँकलिन इंडिया अपॉच्युनिटीज फंड | २१.०२.२००० |
| ४) | एस.बी.आय. मॅग्नम चिल्ड्रन्स फंड | २१.०२.२००० |
| ५) | कोटक मॅन्युफॅक्चर इन इंडिया फंड | २२.०२.२०२२ |
| ६) | ॲक्सिस बिझनेस सायकल फंड | २२.०२.२०२३ |




वरील योजनांसंबंधी लिहिण्याअगोदर गेल्या आठवड्यात प्रसार माध्यमांमध्ये म्युच्युअल फंड उद्योगाशी संबंधित एक विषयावर खूप मोठे रणकंदन झाले. ज्या व्यक्तीने या विषयाला सुरुवात केली त्या व्यक्तीचे या क्षेत्रातले योगदान खूप मोठे आहे. परंतु तरीसुध्दा विषयाची मांडणी चुकली आणि नेमके त्यामुळे वादाला सुरुवात झाली.

नियमित गुंतवणूक योजना आणि एकरकमी गुंतवणूक या दोन पध्दती एकमेकांच्या विरोधात नाही तर त्या एकमेकांना पूरक आहेत आणि नियमित गुंतवणूक योजना एका प्रकारात चांगली आणि दुसऱ्या प्रकारात वाईट असे कधीच होत नाही. म्युच्युअल फंडाच्या योजना वाजवीपेक्षा जास्त माहितीचा आकडेवारीचा मारा करतात. खरोखर एवढ्या माहितीची आवश्यकता आहे का हा प्रश्न निर्माण होतो. अति माहिती देण्याच्या नादात मूलभूत प्रश्न बाजूला टाकले जाते.

या ठिकाणी दुसरे एक उदाहरण वापरले पाहिजे म्हणजे मुद्दा स्पष्ट होण्यास मदत होईल. नियमित गुंतवणूक पध्दत ही म्युच्युअल फंड उद्योगाने आणली हेच मुळात चुकीचे विधान आहे. दर महिन्यात नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेट घेणारे अनेक गुंतवणूकदार नाशिकमध्ये होते. ६ वर्षात दामदुप्पट रक्कम व्हायची म्हणून दरमहा ठराविक रक्कम गुंतवायची ६ वर्षे झाले की पुन्हा गुंतवणूक रक्कम वाढायची. कारण पैसे वाढलेले असायचे. अशाप्रकारे वर्षानुवर्षे गुंतवणूक करून अनेक गुंतवणूकदारांनी संपत्तीची निर्मिती केलेली आहे.

आता आपण दुसरे उदाहरण विचारात घेऊ. दर महिन्यात एक ग्रॅम, दोन ग्रॅम, दहा ग्रॅम अशा पध्दतीने सोन्याचे वेढे खरेदी करणारे अनेक गुंतवणूकदार आहेत. खरेदी करताना किती ग्रॅमस आतापर्यंत जमा केले असा विचार केला जातो. मग तसाच विचार म्युच्युअल फंड गुंतवणुकीच्याबाबत इतके युनिटस् गोळा केले असा विचार व्हायला हवा. परंतु असे होणार नाही आणि म्हणून काही वेळा नियमित गुंतवणूक योजना बंद पडणे असे घडते.

स्मॉल कॅप या शब्दामध्ये जी भीती निर्माण होते ती भीती काढून टाकली पाहिजे. आजची सर्वात मोठी कंपनी रिलायन्स ही सुध्दा एक काळ स्मॉल कॅप कंपनी होती. सेबीने जी वर्गवारी केली आहे त्या वर्गवारीचा सुध्दा फेरविचार झाला पाहिजे. फक्त १ ते १०० लार्ज कॅप




१०१ ते २५० मिडकॅप आणि २५१ च्या पुढे स्मॉल कॅप ही वर्गवारीच चुकीची आहे. या वर्गवारीत पुन्हा मायक्रो कॅप ही वर्गवारी तयार केलेलीच नाही. १ ते ५०० लार्ज कॅप ५०० ते १५०० मिडकॅप १५०० ते ३००० स्मॉल कॅप आणि ३००० च्या पुढे मायक्रो कॅप अशी जर विभागणी केली तर ते जास्त चांगले होईल.

नियमित गुंतवणूक योजना २० वर्षे असावी असे आता घडू शकणार नाही. कारण माहितीचा प्रचंड मारा म्युच्युअल फंड्स योजना करत असता आणि प्रसार माध्यमे सुध्दा हा विषय फारच मोठा आहे. म्हणून अगदी थोडक्यात स्पष्टीकरण केले.

**एच.डी.एफ.सी. लार्ज ॲण्ड मिड कॅप**

अत्यंत चांगली योजना गुंतवणूकदारांना अत्यंत चांगली भांडवलवृध्दी मिळाली असून योजनेची मालमत्ता २४ हजार कोटी रुपये आहे. योजनेत गुंतवणूक कायमस्वरुपी असावी.

**ॲक्सिस मिडकॅप फंड**

योजनेला १४ वर्षे पूर्ण होऊन १५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. ३१ हजार कोटीची मालमत्ता व्यवस्थापनासाठी आहे. चक्रवाढीने वार्षिक सरासरी वाढ चांगली आहे. ॲक्सिसच्या सर्व योजना चांगली कामगिरी करू लागल्या आहेत.

**फ्रँकलिन इंडिया अपॉर्च्युनिटीज फंड**

२००० ला सुरू झालेली योजना २५ वर्षे पूर्ण करून २६ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. योजनेकडे ६ हजार कोटींची मालमत्ता व्यवस्थापनासाठी आहे. योजनेचे उद्दिष्ट गुंतवणूकदाराने समजून घेतले पाहिजे आणि त्यानुसार गुंतवणुकीत काय बदल होत आहे. याची माहिती करून घेतली पाहिजे. या योजनेत गुंतवणूक करणे योग्य राहील.

**एस.बी.आय. मॅग्नम चिल्ड्रन्स फंड**

मुलांसाठी ज्या गुंतवणूक योजना आहेत त्याचा विचार करता वर्षानुवर्षे एच.डी.एफ.सी.ने अत्यंत चांगली कामगिरी करून दाखविली आहे. एस.बी.आय. म्युच्युअल फंडाने आणलेल्या योजनेला २३ वर्षे पूर्ण झाली. योजनेकडे मालमत्ता फारशी वाढलेली नाही.

**कोटक मॅन्युफॅक्चर इन इंडिया फंड**

योजनेला फक्त ३ वर्षे पूर्ण झालेली आहेत. २५०० कोटी रुपयांची मालमत्ता व्यवस्थापन करण्यासाठी आहे. आणखी काही कालावधी द्यायला हवा.

**ॲक्सिस बिझनेस सायकल फंड**

योजनेला फक्त २ वर्षे पूर्ण होत असल्याने आणखी काही कालावधी द्यायला हवा.

**शेअर बाजार साप्ताहिक समालोचन**

मुंबई शेअर बाजाराचा ३० शेअर्सचा संवेदनशील निर्देशांक शुक्रवा ७५९३९ ला बंद झाला. घट २०० अंश वार्षिक वाढ ५.७ टक्के राष्ट्रीय शेअर बाजाराचा ५० शेअरचा निफ्टी निर्देशांक २२९२९ ला बंद झाला. घट १०२ अंश एक वर्षाची वाढ ५ टक्के या पार्श्वभूमीवर कोणत्या क्षेत्रिय निर्देशांकाने आकर्षक वार्षिक वाढ दाखवली याची आकडेवारी वाचलीच पाहिजे. हेल्थ इंडेक्स वार्षिक वाढ १३.७ टक्के टेलिकम्युनिकेशन वार्षिक वाढ १३ टक्के, टेक ११.५ टक्के ऑटो ८.७ टक्के आणि सर्व्हिसे ६.७ टक्के अशी निर्देशांकाची आकडेवारी आहे. कोणत्या क्षेत्रिय निर्देशांकात सर्वात जास्त घट झाली याची आकडेवारी बघितल्यास एनजीमध्ये वार्षिक घट १७.९ टक्के आहे. त्यानंतर मग ऑइल १७.७ टक्के पी.एस.यू. १०.९ टक्के अशी ही आकडेवारी आहे. यात टेलिकम्यनिकेशन इंडेक्स १३ टक्क्याने वाढला. त्याची काही कारणे आहेत. ही झाली मागील वर्षाची आकडेवारी यावरुन पुढील वर्षी कोणते क्षेत्र जास्त भांडवलवृद्धी देऊ शकेल. याचा अंदाज करता आला पाहिजे. जोखीम घेण्याची आर्थिक आणि मानसिक ताकद असणारे गुंतवणूकदार ऑईल क्षेत्र आणि एनर्जी क्षेत्र वार्षिक घट अकारण १८ टक्के दाखवत आहे, म्हणून या क्षेत्रातल्या कंपन्या गुंतवणुकीसाठी विचारात घेतील. एफ.एम.सी.जी. निर्देशांकाची वार्षिक घट १ टक्के आहे. त्यामध्ये पुढच्या वर्षी चांगली वाढ होईल, अशी अपेक्षा आहे. म्हणून या क्षेत्रात गुंतवणूक करायला पाहिजे. दीर्घकालिन गुंतवणुकीसाठी आय.टी.सी. हॉटेल्स हा एक चांगला शेअर आहे. त्याचबरोबर इंडियन हॉटेल्स या शेअरकडे सुध्दा लक्ष दिले पाहिजे.

## महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धेची अंतिम फेरी १७ फेब्रुवारी ते १५ मार्चदरम्यान

**मुंबई :**

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धा २०२४-२५ ची अंतिम फेरी मुंबई येथे आयोजित होणार आहे. दिनांक १७ फेब्रुवारी ते १५ मार्च २०२५ या कालावधीत बांद्रा येथील रंगशारदा नाट्यगृहात ही स्पर्धा पार पडणार आहे.





महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या पुढाकाराने ही स्पर्धा संपन्न होणार आहे. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

या स्पर्धेत सादर होणारी ४५ नाटके रसिकांना विनामूल्य पाहता येतील. विनामुल्य प्रवेशिका श्री शिवाजी मंदीर, दादर येथे उपलब्ध आहेत. ६३ व्या राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीतील पहिल नाटक दिनांक १७ फेब्रुवारीला सायंकाळी ७.०० वाजता 'पंचमवेद' हे नाटक रंगशारदा नाट्यगृह येथे सादर होणार आहे. यानंतर दररोज सकाळी ११.३० वा. आणि सायंकाळी ७.०० वाजता नाटकांचे प्रयोग सादर होतील. या राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीमध्ये सुमारे १२०० पेक्षाहून अधिक हौशी कलाकार आपली कला सादर करणार आहेत.

राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीमधील स्पर्धक संघाचे मनोधैर्य वाढवण्याकरिता त्यांना शुभेच्छा देण्याकरिता आणि विविध विषयांवरची विविध अंगी नाटके पाहण्याकरिता जास्तीत जास्त रसिक प्रेक्षकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे.

## 'वागले की दुनिया' मालिकेत डीपफेक सापळ्यात अडकली सखी

**मुंबई :** सोनी सबवरील 'वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से'



मालिका त्यातील वेधक कौटुंबिक क्षणांमुळे प्रेक्षकांना नेहमी आपलीशी वाटते. प्रेक्षकांनी पाहिले आहे की, विद्या (सुकन्या सुर्वे) आपल्या जुळ्या मुलांना सांभाळण्याचे आव्हान पेलताना तारेवरची कसरत करताना वंदनाकडे (परिवा प्रणती) मन मोकळे करते. पण, त्यात एक गैरसमज होतो. त्यांचे संभाषण राधिका (भारती आचरेकर) च्या कानावर पडते आणि तिला ते श्रीनिवास (अंजन श्रीवास्तव) आणि तिच्याबद्दल आहे असेच वाटते. त्यामुळे वागले कुटुंबात एक भावनिक उलथापालथ होते. या गोंधळाच्या परिणामांना हे कुटुंब तोंड देत असते, तेव्हाच एक धक्कादायक गोष्ट घडते आणि सखी (चिन्मयी साळवी) भयंकर संकटात सापडते. प्रेक्षकांच्या मनातील उत्कंठा वाढू लागते. यापेक्षा भयंकर ट्विस्ट? हा इसम विवानचा डीपफेक व्हिडिओ वापरुन तिला फसवतो. वागले कुटुंबियांना धडकी भरते. सखीला वाचवण्यासाठी राजेश आणि विवान यांना परस्परांतील मतभेद बाजूला ठेवून एकमेकांच्या साथीने पावले उचलण्याची वेळ येते. बघत रहा, 'वागले की दुनिया : नई पीढी नए किस्से' फक्त सोनी सबवर सोमवार ते शनिवार रात्री ९ वाजता.

## एचडीएफसी बँकेतर्फे व्हॅलेंटाइन्स डे साजरा

**मुंबई :** व्हॅलेंटाइन्स डेच्या निमित्ताने एचडीएफसी बँक या देशातील खासगी क्षेत्रातील आघाडीच्या बँकेने जोडप्यांना आर्थिक गोष्टींबाबत शिक्षित करण्यासाठी फायनान्शिअली एव्हरआफ्टर हे एक अनोखे अभियान सुरू केले आहे. हे अभियान जोडप्यांना दोघांनी मिळून आपले अर्थ-व्यवस्थापन करण्याची कल्पना देते, जो आजकालच्या नात्यांमधला एक महत्त्वाचा पण काहीसा दुर्लक्षित पैलू आहे. हे अभियान जेन झेड आणि तरुण मिलेनियल जोडप्यांना दोघांनी मिळून एकत्रितपणे आर्थिक बाबी हातळण्यासाठी ज्ञान आणि साधने देऊन सक्षम करण्याचा प्रयत्न करते. या बँकेने या उद्देशासाठी समर्पित https://www.moneymadeeasy.org/ ही एक मायक्रोसाइट तयार केली आहे, ज्यामध्ये एक परस्परसंवादी 'फायनॅनष्यली एव्हर आफ्टर' क्विझ आहे, जे मजेदार आणि माहितीपूर्ण पद्धतीने जोडप्यांना त्यांच्यातील आर्थिक अनुरूपता जोखण्याची संधी देते. हे क्विझ आर्थिक निर्णयांच्या बाबतीतील त्यांची वृत्ती कशी आहे हे दर्शविते आणि कोणत्या बाबतीत त्यांच्यात सहमती आहे आणि कोणत्या बाबतीत मतभेद आहेत हे देखील उघड करते.या वेबसाइटमध्ये काही माहितीपूर्ण व्हिडिओ आणि लेख देखील आहेत, आर्थिक व्यवस्थापन कसे करावे याचे व्यावहारिक मार्गदर्शन देतात. यामध्ये बँकेच्या जॉकी एफ. जे. मोनिशा यांनी संकल्पना समजावून दिल्या आहेत.

## बीएसएनएलकडून २६२ कोटी रुपयांच्या नफ्याची व नवप्रवर्तनाची घोषणा

**मुंबई :**

भारत डिजिटल क्रांतीचे नेतृत्व करत असून बीएसएनएलने १७ वर्षांनंतर २६२ कोटी रुपयांचा नफा कमावला आहे, अशी घोषणा भारताचे ईशान्य प्रदेशाचे जनसंपर्क व विकास मंत्री ज्योतिरादित्य एम. सिंधिया यांनी बिझनेस समिट २०२५ मध्ये केली.

नवी दिल्ली येथील ताज पॅलेसमध्ये आयोजित उद्घाटनाच्या सत्रात बोलताना ज्योतिरादित्य सिंधिया म्हणाले की, आज डिजिटल पायाभूत सुविधांनी प्रत्यक्ष पायाभूत सुविधांची जागा घेतली आहे आणि जगातील डिजिटल व्यवहारांच्या तब्बल ४६ टक्के व्यवहार भारतात होत असल्यामुळे सर्वाधिक अद्ययावत डिजिटल वातावरणासह भारताने जगात आघाडी घेतली आहे. या प्रगतीचे चमकदार उदाहरण बीएसएनएल आहे. या कंपनीने १७ वर्षांत प्रथमच नफा कमावला आहे.

मंत्री पुढे म्हणाले की, नवप्रवर्तन हे राष्ट्रीय वाढीचे इंजिन आहे. भारतात भांडवल हे नावीन्यपूर्णतेचे प्रमुख चालक आहे आणि ते साधन ठरले आहे. सरकार व खासगी क्षेत्रातील समन्वय



जगभरात अद्वितीय आहे.

भारताची आर्थिक वाढ स्वयंपूर्ण तसेच आपल्या समृद्ध वारशात रुजलेली असली पाहिजे, असे मत भारताचे कामगार व रोजगार, युवा कामकाज व क्रीडा मंत्री मनसुख एल. मांडवीय यांनी व्यक्त केले. मांडवीय यांनी देशाची आपल्या समृद्ध ऐतिहासिक ज्ञानाला नावीन्यपूर्णतेशी जोडून जागतिक स्तरावरील स्पर्धात्मक व टिकाऊ अर्थव्यवस्था बनवण्याची गरज व्यक्त केली. उद्योजकतेच्या महत्त्वावर भर देताना मांडवीय यांनी सांगितले की, उद्योजकता हे कौशल्य आहे. तुम्ही उत्पन्न मिळवत असाल तर रोजगार निर्माण करून करांद्वारे अर्थव्यवस्थेत योगदान देऊ शकता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाअंतर्गत भारताच्या नवप्रवर्तनाबाबत बोलताना मांडवीय यांनी स्टार्ट अप इंडिया व मेक इन इंडिया यांसारख्या उपक्रमांचे कौतुक केले. त्यांनी देशाच्या स्टार्टअप वातावरणाचा विस्तार केला आहे. एक दशकापूर्वी आपल्याकडे फक्त चार युनिकॉर्न होते. आज आपल्याकडे ११८ आहेत. यातून बुद्धिमत्ता आणि नावीन्यपूर्णतेला चालना दिल्याने आपल्या अर्थव्यवस्थेचा चेहरा बदलतो हे दिसून येते, असे ते म्हणाले. मांडवीय यांनी आधुनिक अर्थव्यवस्थेत नावीन्यपूर्णतेची गरजही स्पष्ट केली.

## सस्टेनेबल कॅस्टर असोसिएशनतर्फे कॅस्टरसाठी लाइफ सायकल असेसमेंटमध्ये सुधारणा

**मुंबई :**

आंतरराष्ट्रीय राउंड टेबल इव्हेंट दरम्यान, जो मुंबईत आयोजित करण्यात आला होता, स्फेरा सोल्यूशन्सने भारताच्या कॅस्टर क्षेत्रातील १०,००० शेतकऱ्यांच्या व्यापक फील्ड अभ्यासाचा सारांश सादर केला. प्रादेशिक सरासरीच्या तुलनेत, SuCCESS शाश्वत शेती कोड अंतर्गत शिक्षण व प्रमाणपत्र मिळालेल्या शेतकऱ्यांनी सर्व प्रमुख LCA प्रभाव श्रेणींमध्ये सुमारे ३०% सुधारणा दर्शवली.

या इव्हेंटमध्ये जगभरातील विविध देशांतील १०० हून अधिक प्रतिनिधींनी सहभाग घेतला. या कार्यक्रमापूर्वी, त्याच्या ३० सदस्य कंपन्यांसाठी गुजरातमधील शेतांवर एक फील्ड ट्रिप आयोजित करण्यात आली होती, जिथे उपस्थित पाहुण्यांना SuCCESS शेती कोडच्या प्रभावाचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. कार्यक्रमादरम्यान, स्फेरा सोल्यूशन्सने २०२२-२०२३ च्या फील्ड मूल्यांकनाचे प्रमाणिक निकाल सादर केले, ज्यात प्रमाणित आणि अप्रमाणित शेतकऱ्यांची तुलना करण्यात आली. SuCCESS प्रमाणित शेतांनी ISO 14040/44 मानक आणि एण PEF श्रेणींनुसार GWP/ हवामान बदल, संसाधन वापर (इंधन संपत्ती) आणि थडक्र (पाणी टंचाई पदचिन्ह) मध्ये सुमारे ३०% सुधारणा दर्शवली. हे सविस्तर निकाल सदस्य कंपन्यांसोबत सामायिक केले जातील, जेणेकरून त्यांच्या शाश्वत कॅस्टर मूल्य साखळीवर परिणाम दृढ करता येईल.

याव्यतिरिक्त, TTC द्वारे सादर केलेल्या प्रभाव मूल्यांकन




अहवालात असे दिसून आले की SuCCESS प्रशिक्षण व प्रमाणपत्रामुळे शेतकऱ्यांना मोठे फायदे मिळाले, जसे की १५% खर्च कपात, २५% उत्पादनवाढ आणि पारंपरिक शेतीच्या तुलनेत शेतकऱ्यांचे एकूण उत्पन्न ३०% वाढले. B-SF च्या ग्लोबल कॅटेगरी मॅनेजर (डायरेक्ट प्रोक्योरमेंट) आणि सस्टेनेबल कॅस्टर असोसिएशनच्या अध्यक्षा करिन वॅगनर म्हणाल्या: आमच्या सदस्यांसोबत आणि डाउनस्ट्रीम भागधारकांसोबत हे रोमांचक परिणाम सामायिक करताना आम्हाला आनंद होत आहे. हे सिद्ध फायदे आहेत - शेतकऱ्यांसाठी, उद्योगासाठी आणि विशेषतः पर्यावरणासाठी.

जयंत ॲग्रोचे अध्यक्ष आणि सस्टेनेबल कॅस्टर असोसिएशनचे संचालक, अभय उदेशी म्हणाले: आमच्या सदस्यांकडून मिळणारा उत्साही प्रतिसाद पाहून आम्हाला अभिमान वाटतो. या पातळीपर्यंत पोहोचण्यासाठी आम्हाला ८ वर्षांहून अधिक वेळ लागला आहे.

सस्टेनेबल कॅस्टर असोसिएशनचे संचालक आणि सॉलिडरिडाड एशियाचे प्रमुख, प्रशांत पास्तोरे म्हणाले: SuCCESS कोडचे परिणाम दर्शवतात की लघु शेतकऱ्यांची हवामान प्रभावांविरुद्ध सहनशक्ती वाढवणे, मातीचे आरोग्य सुधारणे आणि दीर्घकालीन उपजीविका सुरक्षित करणे हे समाज आणि उद्योगाच्या योग्य हेतूने केलेल्या सहकार्याने शक्य आहे.

आर्केमाचे संचालक ग्विडो एम. डोना म्हणाले: आम्ही कॅस्टरच्या शाश्वततेच्या सुधारणेसाठी एकात्मिक दृष्टिकोन मानतो. अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे आणि आता आमच्याकडे यासाठी ठोस पुरावे आहेत. हे डाउनस्ट्रीम वापरकर्त्यांना सूचित करण्याचे योग्य वेळ आहे.

अल्नोर ऑईल कंपनी इंक चे सह-अध्यक्ष आणि सस्टेनेबल कॅस्टर असोसिएशनचे संचालक, जोनाथन कापलान म्हणाले: संयुक्त राज्यांमध्ये शाश्वततेचा विषय वेगाने वाढत आहे, आणि आम्ही कॅस्टर उद्योगात जबाबदार स्त्रोतसाधनांचा अवलंब करणारे अग्रगण्य बनण्यास उत्साहित आहोत. औरोरियम चे उपाध्यक्ष आणि सस्टेनेबल कॅस्टर असोसिएशनचे संचालक, स्टीव टॅटम म्हणाले : आम्ही सस्टेनेबल कॅस्टर असोसिएशनच्या राउंड टेबलमध्ये भाग घेतल्याने आनंदित आहोत. या बैठकीत मौल्यवान अंतर्दृष्टी मिळाली आणि कॅस्टर उद्योगातील शाश्वत पद्धतींना चालना देण्यासाठी अर्थपूर्ण चर्चा झाल्या.

# फाटक्या कपड्यांवर बंदी आणावी !

**साधारणत: दोन-अडीच दशकापूर्वी परिधान केलेल्या कपड्याला छिद्र असणे किंवा कुठेतरी थोडेसे फाटलेले असणे असभ्यपणाचे लक्षण मानले जात असे. कपडे परिधान करणार्याला सुद्धा याविषयी लज्जा उत्पन्न होत असे. त्यामुळे कपडे जुने असले, तरी ते कुठे फाटलेले नाहीत ना, याविषयी विशेष सतर्कता घेतली जात असे. मुलींच्या आणि महिलांच्या कपड्याच्या बाबतीत तर यासंदर्भात विशेष काळजी घेतली जात असे. परंतु गेल्या काही वर्षांत मात्र भारतात फाटक्या कपड्यांच्या फॅशनने चांगलाच जोर धरला आहे. जीन्स पॅन्ट खरेदी करताना तिच्यावर ठिकठिकाणी छिद्र असलेली जीन्स विकत घेण्यामध्ये हल्लीच्या तरुण-तरुणींचा कल वाढताना दिसत आहे.**

गेल्या काही वर्षांत मात्र भारतात फाटक्या कपड्यांच्या फॅशनने चांगलाच जोर धरला आहे. जीन्स पॅन्ट खरेदी करताना तिच्यावर ठिकठिकाणी छिद्र असलेली जीन्स विकत घेण्यामध्ये हल्लीच्या तरुण तरुणींचा कल वाढताना दिसत आहे. पॅन्टनंतर आता जीन्स शर्ट आणि जॅकेट्स सुद्धा छिद्र असलेली. बाजारात मिळू लागली आहेत. तरुणवर्गाकडून अशा फाटक्या कपड्यानाच अधिक पसंती असल्याने समस्त कपड्यांच्या दुकानात आणि ऑनलाइन खरेदीच्या संकेतस्थळांवर हे फाटके कपडे सहजपणे उपलब्ध होऊ लागले आहेत. नेहमीच्या कपड्यांपेक्षा या कपड्यांना अधिक मागणी असल्यामुळे हे फाटके कपडे चढ्या दराने विकले जात आहेत. युथ आयकॉन असलेले सिने कलाकार, खेळाडू हे सुद्धा अशा प्रकारचे फाटके कपडे वापरत असल्याने तरुणांमध्ये या कपड्यांचे विशेष आकर्षण निर्माण झाले आहे. पाश्चात्य देशातून आलेल्या या फॅशनचा तरुण तरुणींनी सहजपणे स्वीकार केल्याने फाटके कपडे वापरणे आता सर्वत्र नॉर्मल झाले आहे. ही फॅशन भारतात नव्यानेच आली तेव्हा आरंभी महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना, शासकीय आणि खासगी कार्यलयांमध्ये कर्मचार्यांना अशा प्रकारचे फाटके कपडे परिधान करून येण्यास मज्जाव कारण्यात आला होतो आता मात्र ही फॅशन सर्वत्र रुजल्याने अनेक ठिकाणांहून ही बंदी उठवण्यात आली आहे. पाल्यांनी फाटके कपडे परिधान करण्यामध्ये पालकांनाही काही अनुचित वाटत नसल्याने त्यांच्या मागणीनुसार पालकसुद्धा त्यांना असले फाटलेले कपडे आणून देऊ लागले आहेत. असे फाटके कपडे परिधान करणे म्हणजे कुठेतरी आपण सध्याच्या जीवनमानासोबत जात आहोत असे आजच्या तरुणवर्गाला वाटत आहे.

भारतात व्यक्ती स्वातंत्र्य आहे त्यामुळे कोणी कोणते कपडे घालावेत यावर बंधने नसली तरी फॅशनच्या नावाखाली अशा प्रकारे फाटके कपडे घालणे खरंच योग्य आहे का? फाटक्या जीन्स घालून तरुणी सार्वजनिक ठिकाणी सहजपणे वावरत असतात. या जीन्सवर नको नको त्या ठिकाणी छिद्र पाडलेली असतात. ज्याकडे







आंबट शौकिनांचे विशेष लक्ष असते. भारतासारख्या संस्कृतीप्रिय देशात महिलांवरील अत्याचाराचा आलेख दिवसागणिक वाढत आहेत हल्लीच्या वेब सिरीज, चित्रपट आणि मालिकांतून खुलेपणाने दाखवली जाणारी प्रणयदृश्ये, यातील तरुण नायिकांचा तोकड्या कपड्यांतील मुक्त वावर, प्रत्येकाच्या हातात असलेल्या मोबाइलमध्ये सहजपणे उपलब्ध होणारे पॉर्न चित्रपट हे जसे या वाढत्या महिला अत्याचाराला कारणीभूत ठरत आहेत तसे तरुणींचा फाटक्या कपड्यांतील सार्वजनिक ठिकाणचा मुक्त वावर हासुद्धा या गोष्टीला खतपाणी घालत आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अशा प्रकारच्या कपड्यांच्या माध्यमातून अंगप्रदर्शन करणे आपल्या सभ्य संस्कृतीला नक्कीच साजेसे नाही. स्पंदनशास्त्रानुसार मोडक्या वस्तू आणि फाटलेले कपडे यांतून प्रचंड प्रमाणात नकारात्मक स्पंदने प्रक्षेपित होत असतात. या वस्तूंचा वापर करणाऱ्याच्या मनावरही त्याचा नकारात्मक परिणाम होतो त्यामुळे अशा वस्तू आणि कपडे वापरणे आणि त्या घरात ठेवणे योग्य नसते. त्यामुळेच पूर्वी फुटक्या बशा, मोडकी भांडी तत्परतेने घराबाहेर काढली जात असत. फाटलेले कपडे तत्परतेने शिवले जात असत. काळ बदलला तसा विभक्त कुटुंब पद्धती भारतात प्रचलित होऊ लागली. घरातील आजी -आजोबा गावाकडे राहू लागली. कर्ता पुरुष आणि स्त्रिया शहराकडे वळल्या. परिणामी, पुढच्या पिढीला परंपरागत शास्त्र सांगणारे, काय बरोबर आणि काय चुकीचे सांगणारे घरात कुणीच उरले नाही. त्याचा परिणाम आज आपल्याला घरोघरी दिसत आहे.

**मंथन**

**जगन घाणेकर**
**९६६४५५९७८०**

पाश्चात्यांकडून काय घ्यावे आणि काय घेऊ नये याची जाण नसलेली आजची पिढी फॅशनच्या नावाखाली कुठेतरी विकृतीला बळी पडू लागली आहे हे सत्य नाकारून चालणार नाही. सात्त्विक वेशभूषा कशी असावी याबाबतची सविस्तर माहिती आपल्या ऋषी मुनींनी प्राचीन ग्रंथांतून मांडून ठेवली आहे. त्याचे आचरण आजची पिढी केवळ सण उत्सवांच्या वेळी फोटोसेशनसाठीच करताना दिसते. भारतीय सात्त्विक वेशभूषेची भुरळ आज विदेशींनाही आहे. त्यामुळे पर्यटनासाठी जेव्हा ते भारतात येत्तात तेव्हा येथील वेशभूषा परिधान करतात. येथील प्रथा परंपरा जाणून घेतात, येथील धार्मिक उत्सवांत आणि कार्यक्रमांत सहभागी होतात. आपण मात्र त्यांनी त्यागलेल्या गोष्टी अंगीकारून स्वतःला आधुनिक म्हणवून घेण्याचा प्रयत्न करत आहोत. भारतीय संस्कृतीला न शोभणारे असे विकृत कपडे परिधान करून सार्वजनिक ठिकाणी वावरण्यावर खरेतर बंदी आणायला हवी.

# आचरणात आणण्यासारखे खूप काही

माणसाच्या जीवनाबाबत विचार करावयाचा झाल्यास शत्रू मित्रता आणि त्यातून उद्भवणारे राग, द्वेष आणि प्रीती हे त्रांगड म्हणजे सध्याच्या माणसाचं जीवन आहे, असं म्हटलं तरी वावगं होणार नाही. अशा या मानवी शत्रू मित्रत्वाचा अभ्यास ज्योतिषशास्त्र करतं. माणसाला जीवनी आपल्या मित्रत्वापेक्षा त्याच्या शत्रूचं अधिक भान असतं. त्यामुळे, सध्याचा माणूस हे एक भलंमोठं प्रदूषणच होऊन बसलं आहे. आणि या प्रदूषणात डोकं खुपसून डोकं खाजवणारा रुप त्यांच्या हृदयाचा ठाव घेत नाही. कारण, सध्या माणसाची अंतर्बाह्य दृष्टीच बदललेली आहे. सात्विक संवेदनांची जाणीवच माणसाची कमी झालेली आहे, पण, भांडणं, मारामारीकडे लगेच माणसांचे कान टवकारले जातात. हाच आजकालचा कलिधर्म झाला आहे.

आजकालच्या या वातावरणात आसुसलेली आजूबाजूची पिशाच्च कान टवकारुन भांडणं, वादविवाद ऐकण्याच्याच तयारीत असतात. या वातावरणात



ज्योतिषीसुध्दा या प्रदूषणाचाच एक भाग होतो.

माणसाच्या जीवनात प्रेमाचे, लाभाचे, लोभाचे व जिव्हाळ्याचे अनेक स्पंदने असतात. तसेच, श्रावण महिना म्हणजे, सुध्दा वातावरणातील एक स्पंदनच आहे. मात्र हे स्पंदन जाणून घेता यावे यासाठी माणसाच्या अंतरंगात शुध्द सत्त्व तत्त्व जागे व्हावे लागतात. तरच, श्रावणातील स्पंदनांची अनुभूती माणसाला अनुभवता येते आजूबाजूच्या वातावरणातील नाजूक, प्रेमळ अशा संभाषणाच्या संवादाकडे माणसाचे कान टवकारले जात नाहीत. पण, कुठे भांडण झाले, हाणामारी झाली किंवा ॲक्सिडेंट झाला की, लगेच माणसांचे कान त्या दिशेकडे टवकारले जातात.लगेच माणसे त्या ठिकाणी धाव घेतात. पण, प्रत्यक्ष त्या ठिकाणी ती माणसे योग्य मदत करण्यापासून दूर राहतात. याचं कारण, म्हणजे या कलियुगी सध्याच्या काळात त्यांच्या अंगात मानवी स्पंदने निर्माण न होता राक्षसी स्पंदने निर्माण झाली आहेत. त्यामुळे,निसर्गाचं श्रावण महिन्यातील गोंडस, मनमोहक, लाघवी तसेच, नयनमनोहर असं हल्ली देवदेवतांचा वास कमीच असतो. कारण, घराघरांतून श्रावणाचं स्वागत करणारा, श्रावण महिन्यात स्वतःच्या घराचं, आजूबाजूच्या परिसराचं वातावरण प्रसन्न करणारा माणसाचा संवाद, कोमल व मधूर सूर आता सहसा कुठेही दिसून येत नाही.

श्रावण महिना कसा असतो याचं सुरेख, मनमोहक असं वर्णन सुप्रसिद्ध कवी मंगेश पाडगावकर यांनी त्यांच्या भावगीतात ५० वर्षांपूर्वीच केलं आहे. ती खरी श्रावण महिन्याची अनुभूती आहे. तशी अनुभूती घराचं तसेच, सामाजिक वातावरण प्रसन्न ठेवून तुम्हीही घेवू शकता. त्यामुळे, सद्गृहस्थांनो, मित्रांनो अशा पिशाच्च शक्तींना, पिशाच्च विचारांना कदापिही जवळ फिरकू देवू नका. त्यासाठी श्रावणी पौर्णिमेच्या श्रीगुरुला छान साद घालत गुरुभक्तीच्या तेज:पुंज प्रांगणात नादमधुर श्रवणभक्तीचा मनसोक्त आनंद प्रकाश आणि दीपदर्शनातून अनुभवत वातावरणातील संशय पिशाच्चांना हद्दपार करूया! तसेच, सदैव निरोगी प्रसन्न वातावरणात समृद्ध जीवन जगूया!

**दृष्टिक्षेप**

**मधुकर निलेगावकर**
**९४२१३७५६९१**

# जनगणनेची सुरुवात आणि महत्त्व

लोकांची मोजणी करण्याची प्रथा शासनव्यवस्थेच्या स्थापने इतकीच जुनी आहे. इजिप्शियन, ग्रीक, रोमन, हिब्रू, पर्शियन, या लोकांनी लोकसंख्येची मोजणी वेळोवेळी केल्याचे इतिहासात नमूद आहे. चीन-जपानमध्येही पुरातन काळापासून अशी मोजणी होत असे. साधारणतः अशी मोजणी सैन्यभरतीस योग्य वय असलेल्या नागरिकांची किंवा करपात्र लोकांची संख्या समजण्यासाठी जरूर तेव्हा होत असे. सबंध शहराची लोकसंख्या मोजण्यास यूरोपमध्ये पंधराव्या व सोळाव्या शतकांत सुरुवात झाली. मद्रास शहराची अशी लोकसंख्या मोजणी सन १६८७ मध्ये झाल्याचे नमूद आहे. त्यानंतर राष्ट्रीय स्वरूपाची जनगणना सुरू झाली.

स्वीडनमधील पहिली जनगणना सन १७५०मध्ये झाली. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात १७९० पासून व ग्रेट ब्रिटनमध्ये १८०१ पासून दर दहा वर्षांनी जनगणना घेण्यात येतात. भारतात पहिली जनगणना दि.९ फेब्रुवारी १८७२ रोजी सुरू करून ती काही महिन्यांती पार पडली व त्यानंतर सन १८८१पासून दर दहा वर्षांनी जनगणना घेण्यात आल्या. काही राष्ट्रे जनगणना दर पाच वर्षांनी घेतात, तर काही त्यांना जरूर वाटेल तेव्हा जनगणना करतात. हे काम बरेच खर्चाचे असल्यामुळे बहुतेक राष्ट्रांत दर दहा वर्षांनी जनगणना करण्याची प्रथा आहे. सुरुवातीस जनगणनेच्या वेळी प्रत्येक कुटुंबाविषयीची माहिती गोळा करीत, परंतु नंतर प्रत्येक व्यक्तीबद्दल माहिती गोळा करण्यात येऊ लागली. पुढे पुढे गरीब, दुर्बल, मागास समाज घटकांची माहिती घेतली जाऊ लागली. व्यक्तिगत स्वरूपाची राष्ट्रीय जनगणना सर्व प्रथम बेल्जियममध्ये सन १८४६मध्ये व अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात सन १८५०मध्ये घेण्यात आली. हळूहळू सर्वच राष्ट्रांनी अशा प्रकारची जनगणना घेण्यास सुरुवात केली. सन १९६०च्या सुमारास सबंध जगात एकूण १८०हून अधिक जनगणना घेण्यात आल्या आहेत. त्यात लोककल्याणाच्या उदयोन्मुख समस्या व प्रश्नांना प्राधान्याने घेऊन त्यासाठी विकासात्मक धोरण अवलंबिले आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळात आठ व स्वातंत्र्योत्तर काळात तीन वेळा जनगणना या भारतात झाल्या. वेळोवेळी जनगणना अधिनियम संमत करण्यात येऊन त्यांनुसार जनगणना घेतली जाते. त्यासाठी आयुक्त, संचालक, पर्यवेक्षक वगैरे अधिकारी नेमण्यात येतात. त्यांना इतर अधिकाऱ्यांची मदत होते. प्रत्यक्ष गणनेचे काम प्रगणकांकडे सोपविण्यात येते. शिक्षक, पोलीस, जिल्हा परिषदांचे व नगरपालिकांचे कर्मचारी या सर्वांची मदत गणनेसाठी घ्यावी लागते. त्यांची निवड झाल्यावर जनगणना कशी घ्यावी? निरनिराळ्या याद्या व अनुसूच्या कशा वापराव्यात? प्रश्नांवलीतील प्रश्नांची उत्तरे कशी लिहून घ्यावीत? आदी बाबींचे त्यांना प्रशिक्षण द्यावे लागते. त्यांच्याकडून नमुन्यादाखल काही




माहितीही गोळा करून घ्यावी लागते. सन १९७१ मध्ये झालेल्या जनगणनेच्या वेळी प्रगणकाला चार प्रकारच्या याद्या तयार कराव्या लागल्या होत्या. आज इतर मागासवर्ग आपली जनसंख्या जाणून घेण्याच्या मनस्थितीत आहे, तेव्हा त्यांचीही माहिती वेगळ्या रकान्यातून करणे प्रशासनाला अत्यंत निकडीचे आहे, आढेवेढे घेऊन ते टाळणे महागात पडू शकते. कारण व्यक्तिगत पट्टीद्वारा गोळा केलेली सर्व माहिती गोपनीय मानली जाते. देशाच्या काही भागांत स्थानिक वा राजकीय अडचणींमुळे गणनेच्या कालखंडात आवश्यक ते फेरफार करावे लागतात. जनगणनेत गोळा झालेल्या माहितीचे जिल्हागणिक आणि राज्यागणिक संकलन करून तात्पुरत्या स्वरूपाचे आकडे जनगणनेचे काम संपल्यापासून पाच दिवसांच्या आतच मध्यवर्ती जनगणना कार्यालयाकडे उपलब्ध होऊ शकतात. यावरूनच या अवाढव्य प्रशासकीय प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या संघटनात्मक प्रयत्नांची व भारतीय जनतेने दिलेल्या उत्स्फूर्त सहकार्याची काहीशी कल्पना येऊ शकते.

राष्ट्राची लोकसंख्या किती? त्यातील लोकांची सामाजिक व आर्थिक वैशिष्ट्ये कोणती? त्यांचे राष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत वितरण कसे झाले आहे? सामाजिक व जीवशास्त्रीय फेरफारांचे त्यांच्यावर कसकसे परिणाम होतात? आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक किती? सामाजिक घटक कोणते? त्या त्या सामाजिक घटकांतील लोकसंख्या किती? आदी अनेक प्रश्न दैनंदिन प्रशासनासाठी महत्त्वाचे ठरतात. त्यांना यशस्वीरित्या हाताळण्यासाठी आवश्यक असलेली माहिती जनगणनेद्वारा उपलब्ध होते. शासनाला केवळ जनगणनाच नव्हे, तर प्रसंगोपात इतर अनेक प्रकारच्या गणना करण्याची आवश्यक भासत असते. उदा. कृषिगणना, पशुधनगणना, उत्पादनगणना, घरांची मोजणी, जनगणना इत्यादी. मग ओबीसी जनगणना का बरे होऊ नये? अशा सर्व गणनांतून उपलब्ध होणारी आकडेवारी राष्ट्रीय प्रगती दर्शविते व राष्ट्राच्या अनेक समस्यांचा उलगडा करण्यास उपयोगी पडते. विशेष करून जनगणनेद्वारे मिळणाऱ्या माहितीतून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप व राष्ट्राचे मानवी भांडवलरूपी सामर्थ्य यांवर यथोचित प्रकाश टाकला जाऊ शकतो. जनगणना म्हणजे विशिष्ट काळी एखाद्या राष्ट्रातील किंवा प्रदेशातील सर्व लोकांबद्दलची जनांकिकीय, आर्थिक व सामाजिक आकडेवारी गोळा करणे आणि तिचे योग्य संकलन करून तिला प्रसिद्धी देण्याची संपूर्ण प्रक्रिया होय. जनगणनेच्या वेळी व्यक्तीची स्थाननिश्चिती व नेहमीचे राहण्याचे ठिकाण, कुटुंबप्रमुखाशी नाते, लिंग, वय, वैवाहिक स्थिती, जन्मस्थळ, नागरिकत्व, आर्थिक व्यवसाय, उद्योग, हुद्दा, भाषा, वंशत्व व राष्ट्रीयत्व, साक्षरता, शैक्षणिक पातळी, शालेय हजेरी व प्रत्येक स्त्रीला किती अपत्ये झाली त्यांची संख्या नोंद करावी. ज्या राष्ट्रांना या सर्व बाबींचा जनगणनेत समावेश करता येणे शक्य नसेल, त्यांनी किमानपक्षी लिंग, वय, वैवाहिक स्थिती व आर्थिक व्यवसाय या बाबींची माहिती तरी गोळा केलीच पाहिजे.

# मुलांमध्ये वाढती गुन्हेगारी प्रवृत्ती चिंतेची बाब

नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोच्या दरवर्षीच्या अहवालांमधून एक गोष्ट सातत्याने समोर येत आहे. अल्पवयीन मुलांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत आहे. सांगलीत मोबाइलला स्क्रीन गार्ड बसविण्याच्या कारणावरून चार अल्पवयीन मुलांनी मोबाइल शॉपी मालकाचा खून केला. या अल्पवयीन शाळकरी मुलांच्या दप्तरात हत्यारे मिळून आली आहेत. दुसरी घटना पुण्यातील आहे. एका सातवीतील विद्यार्थ्याने आपल्या सहाध्यायी मुलीवर बलात्कार करून तिची हत्या करण्यासाठी दुसऱ्या मित्राला अवघ्या शंभर रुपयांची सुपारी दिली, ही घटना धक्कादायक आहे. त्या विद्यार्थिनीचा गुन्हा एवढाच होता की, तिने गुणपत्रिकेवर पालकांचे बनावट स्वाक्षरी केल्याची तक्रार शिक्षकांकडे केली होती.



आश्चर्याची गोष्ट म्हणजे, शाळेच्या प्रशासनानेही ही गंभीर बाब दडपण्याचा प्रयत्न केला. पीडित मुलीच्या वडिलांनी तक्रार केल्यानंतर पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे. मात्र, या घटनेने लहान मुलांमध्ये वाढणाऱ्या गुन्हेगारी मानसिकतेचे गंभीर संकेत दिले आहेत. ही प्रवृत्ती केवळ समाजाच्या रचनेवर परिणाम करत नाही तर आपल्या मुलांच्या भविष्यासाठीही मोठे संकट निर्माण करते.

या समस्येची मुळे नेमकी कुठे आहेत?:

बदलत चाललेले पारिवारिक आणि सामाजिक वातावरण, मानसिक तणाव, सहनशीलतेचा अभाव, इंटरनेट व सोशल मीडियाची वाढती सवय हे काही महत्त्वाचे घटक या समस्येमागे आहेत. ही घटना उघडकीस आली असली तरी अनेक प्रश्न निर्माण करून गेली आहे. शाळा म्हणजे संस्कार केंद्र मानले जातात. मग अशा वर्तनाच्या मुलांवर योग्य लक्ष दिले जात नाही का? एवढ्या गंभीर प्रकरणात शाळा प्रशासनाने सत्य दडवण्याचा प्रयत्न का केला?

अनेकदा प्रतिष्ठेच्या भीतीपोटी अशा गुन्ह्यांकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र, हे समजून घेतले पाहिजे की असे करून संबंधित संस्था आणि लोक अशा मुलांना अप्रत्यक्षरित्या संरक्षण देतात. कौटुंबिक व सामाजिक अस्थिरतेमुळे मुलांमध्ये मानसिक तणाव आणि नैराश्य वाढत आहे. पाश्चात्य देशांमध्ये शाळांमध्ये हिंसक वर्तनाच्या घटना सातत्याने समोर येतात, पण आता भारतातही अशा घटना घडत आहेत, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

पालक व शिक्षकांची जबाबदारी :

लहान मुलांना सहनशीलता आणि नैतिकतेचे धडे देण्याची गरज आहे. घर आणि शाळेत त्यांच्यासोबत मोकळा संवाद साधला गेला पाहिजे. त्यांच्या मानसिक आरोग्याची वेळोवेळी तपासणी केली पाहिजे. मुलांना असे चांगले सामाजिक आणि कौटुंबिक वातावरण मिळाले पाहिजे की जेणेकरून ते योग्य मार्गाने पुढे जातील. यासाठी शिक्षक, पालक आणि समाजासोबतच सरकारचीही महत्त्वपूर्ण भूमिका आहे. यासाठी आता वेळ दवडून चालणार नाही.

बॉलीवूड अभिनेता आमिर खान एका मुलाखतीत म्हणतो, 'शाळेत आपल्याला रसायन, भौतिकशास्त्र, इतिहास, भूगोल शिकवले जाते पण जीवन कसे जगायचे हे शिकवले जात नाही...' आमिर पुढे म्हणतो, वयस्कर होताना नाते कसे टिकवायचे? शिक्षक, मित्र, नातेवाईक आणि पालकांशी सुसंवाद कसा राखायचा... ते सांगत नाहीत. आज तुम्ही बीजगणितात जे शिकलात ते उपयुक्त आहे का ? नातेसंबंध, विश्वास, प्रामाणिकपणा यासारख्या गोष्टी माणसाला पुढे घेऊन जातात, मुलांना शाळांमध्ये या जबाबदाऱ्यांबद्दलही शिकवले पाहिजे. शाळेत आता नव्याने अभ्यासक्रम शिकवण्याची गरज आहे. माणूस म्हणून कसे जगावे, हे सांगण्याची गरज आहे.

# क्रांतिकारकांचे गुरु लहुजी वस्ताद



**भारतमातेला इंग्रजांपासून वाचविण्यासाठी राघोजी साळवे शहीद झाले. त्याच ठिकाणी क्रांतिवीर लहुजींनी दि.१७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण केली. श्रद्धांजली अर्पण करतानाच त्यांनी मरेन तर देशासाठी आणि जगेन तरीही देशासाठीच अशी क्रांतिकारी प्रतिज्ञाही केली होती. त्यांनी अनेक देशभक्तांना आपल्यातील युद्धकला शिकवली.**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात लहुजींचे पूर्वज पराक्रम गाजवीत. साळवे घराणे सशस्त्र विद्येमध्ये निपुण व तरबेज होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कार्यकाळात लहुजींच्या पूर्वजांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या कार्यकाळात साळवे घराण्याची योग्यता ओळखून पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी लहुजी साळवे यांच्या आजोबांकडे सोपवली होती. पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणासाठी साळवे घराण्यातील अनेक वीरपुरुषांनी आपल्या प्राणांची आहुती दिली होती. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरींमुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी लहुजींच्या पूर्वजांना राऊत या पदवीने गौरविले होते. वस्ताद लहुजी राघोजी साळवे हे खरेतर लहुजी वस्ताद नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म दि.१४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावातील एका कुटुंबात झाला. मातंग समाजात जन्माला आलेल्या लहुजींना युद्धकलेचे प्रशिक्षण त्यांच्या घरातील वीर पुरुषांकडून मिळाले होते. लहुजींच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे व आईचे नाव विठाबाई होते. लहुजी साळवे यांचे वडील राघोजी साळवे अतिशय पराकर्मी पुरुष होते. युद्धकलेमध्ये त्यांचा कोणीही हात धरू शकत नसे. वाघाबरोबर लढाई करण्याच्या पराक्रमामुळे लहुजी साळवे यांचे वडील राघोजी साळवे त्याकाळी प्रसिद्ध होते. एकदा त्यांनी वाघाबरोबर युद्ध केले आणि जिवंत वाघाला खांद्यावर घेऊन पेशव्यांच्या राजदरबारी सादर केले होते. असे त्यांनी आपल्या प्रचंड शक्तीचे प्रदर्शन केले होते.

पुढे दि.५ नोव्हेंबर १८१७ला पेशव्यांचे इंग्रजांसोबत खडकी येथे तुंबळ युद्ध झाले. तब्बल १२ दिवसांपर्यंत राघोजी व २३ वर्षे वयाच्या लहुजी यांनी आपल्या मावळ्यांना सोबत घेऊन इंग्रजांविरुद्ध निकराचा लढा दिला. लहुजींचे वडील राघोजी साळवे वाऱ्याच्या वेगाप्रमाणे शत्रूवर तुटून पडले होते. इंग्रजांनी एकत्रित वार करून राघोजींना धारातीर्थी पाडले. राघोजी या युद्धात इंग्रजांच्या हातून लहुजींच्या समोरच शहीद झाले. त्यावेळी पेशव्यांचा पराभव झाला. पुढे इ.स.१८१८ मध्ये मराठा साम्राज्याचा भगवा ध्वज शनिवारवाड्यावरून हटवून तेथे इंग्रजांचा युनियन जॅक फडकला. या पराभवाने लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्यप्राप्तीची ज्वाला भडकली. स्वातंत्र्यप्रेम, देशभक्ती, देशप्रेम यांनी झपाटलेले लहुजी आपल्या वडिलांच्या मृत्यूच्या दुःखातून सावरले. आपल्या वडिलांना आपल्या डोळ्यादेखतच शहीद झालेले पाहून त्यांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. भारतमातेला इंग्रजांपासून वाचविण्यासाठी राघोजी साळवे शहीद झाले. त्याच ठिकाणी क्रांतिवीर लहुजींनी दि.१७ नोव्हेंबर १८१७ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण केली. श्रद्धांजली अर्पण करतानाच त्यांनी मरेन तर देशासाठी आणि जगेन तरीही देशासाठी अशी क्रांतिकारी प्रतिज्ञाही केली होती. त्यांनी आपल्या वडिलांची समाधी उभारली. ही समाधी अजूनही पुणे-शिवाजीनगरजवळच्या वाकडेवाडी येथे आहे. क्रांतिगुरू लहुजी हे दांडपट्टा चालवणे, तलवारबाजी, घोडेस्वारी, बंदूक चालवणे व निशाणेबाजी अशा सर्व युद्धकला कौशल्यांमध्ये निपुण होते. त्यांचे पिळदार शरीर व उभारलेली छाती पाहून शत्रूला सुद्धा घाम फुटत असे. जीवघेण्या शस्त्रांबरोबर ते अगदी एखाद्या खेळण्याप्रमाणे खेळत असत. आपल्या वडिलांचा मृत्यू व इंग्रजांनी केलेला पराभव त्यांना असह्य झाला. पराक्रमी घराण्यातील लहुजींनी इंग्रजांवर मात करण्यासाठी म्हणजे पर्यायाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी मवाळपंथी नव्हे तर जहाल क्रांतिकारक निर्माण करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी आपल्या अंगी असलेले युद्धकलेचे शिक्षण तरुणांना देण्याचे ठरविले. म्हणून त्यांनी इ.स.१८२२मध्ये पुण्यातील रास्ता पेठ येथे देशातील पहिले युद्ध कलाकौशल्य तालीमकेंद्र उघडले. यात प्रामुख्याने बाळ गंगाधर टिळक, वासुदेव बळवंत फडके, महात्मा जोतिराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, चापेकर बंधू, क्रांतिभाऊ खरे, क्रांतिवीर नाना दरबारे, रावबहाद्दूर सदाशिवराव गोवंडे, नाना मोरोजी, क्रांतिवीर मोरो विठ्ठल बाळवेकर, क्रांतिवीर नाना छत्रे, महात्मा जोतिराव फुलेंचे सहकारी वाळवेकर आणि परांजपे हे देखील लहुजी साळवे यांच्या आखाड्यातच शिकले. म्हणून ते आद्य महाक्रांतिगुरू ठरतात, यात मुळीच शंका नाही.

**पुण्यतिथी**

**कृष्णकुमार निकोडे**
**७७७५०४१०८६**